
डॉ.बं.न.जाजू

# सुजनवाक्य



# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

## सुजनवाक्य

### हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

### तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# सुजनवाक्य

डॉ.बं.न.जाजू

# सुजनवाक्य

**लेखक : डॉ.बं.न.जाजू**

पत्ता : पत्ता: डॉ.बं.न.जाजू

ए2/402, शिवरंजन टावर्स

सोमेश्वरवाडी,पाषाण,पुणे 411008

सम्पर्क: व्हाट्सॅपँ क्र. 8668553115

ई मेल bnjajooin@yahoo.co.in

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

.his declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : १७ मार्च २०२२ (होळी पौर्णिमा शके १९४३)

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. बं. न. जाजू



जन्म २७ सप्टेंबर १९४३.

डॉक्टर बंकटलाल जाजू यांचा जन्म बुलढाणा जिल्ह्यातील एका शेती आणि व्यावसायिक पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबात. एका लहानशा खेड्यात झाला. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण ग्रामीण भा्गात झालं. पुढे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद येथून बी. ई. (मेक्यनिकल ) आणि नंतर आय. आय. टी, मुंबई येथून एम.टेक. आणि पीएच. डी.पदव्या प्राप्त केल्या. 1966 ते २००१ असे पस्तीस वर्ष, महाराष्ट्र सरकारच्या तांत्रिक शिक्षण विभागात, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती, पुणे, औरंगाबाद, जळगाव येथे प्राध्यापक,विभाग प्रमुख, प्राचार्य अशा अनेक पदांवर काम केलं. त्यानंतर, जी. एच. रायसोनी इंजीनीरिंग कॉलेज,नागपूर येथे पाच वर्ष प्राचार्य आणि पुढे ह.व्या.प्र.मंडळ,अमरावती ह्यांच्या इंजीनीरिंग कॉलेज मध्ये, पाच वर्ष प्राचार्य म्हणून काम केलं. एक ख्यातीप्राप्त,विद्यार्थिप्रिय आणि आदरणीय प्राध्यापक व प्राचार्य.

महाराष्ट्र सरकारचा आदर्श शिक्षक पुरस्कार तसेच इंडियन अचिव्हर्स फाऊंडेशन इंडिया चा शिक्षा भारती पुरस्कार प्राप्त. सी.वी.रमन अवॉर्ड फॉर एक्सलन्स इन इंजीनीरिंग अँड टेक्नॉलजी तसेच इंनस्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स इंडिया चा बेस्ट रिसर्च पेपर अवॉर्ड ही मिळाला. राष्ट्रीय आणि अंतरराष्ट्रीय स्तरावर ६५ टेक्निकल शोध प्रबंध प्रकाशित. युरोप,अमेरिका,ऑस्ट्रेलिया व पोर्तुगल मध्ये, शोध प्रबंध वाचन केलं तसेच काही सेशन ही चेअर केले.


इन्स्टिट्यूशन ऑफ इंजींनियर्स इंडिया चे फेलो तसेच Combustion इंस्टीट्यूट ऑफ इंडिया आणि ISTE इंडिया चे आजीवन सदस्य.

अमरावती,नागपूर,बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात मेंबर ऑफ सिनेट, डीन ऑफ फॅकल्टि, मेंबर ऑफ अॅकडमिक कौन्सिल, मेंबर ऑफ बी,यू,टी.आर., मेंबर ऑफ स्पेशल Examination कमिटी म्हणून काम केले。 जीवनातील सर्व क्षेत्राशी जवळीक. साहित्य, नाट्य, संगित ह्यात विशेष रुचि. एक ख्याती प्राप्त वक्ता. आतापर्यंत जवळ जवळ १८० इन्व्हायटेड टेक्निकल Talks दिले.

-----------------------------------

ईसाहित्य प्रकाशित पुस्तक

फ़क्त एकदा क्लिक करा. उघडेल. वाचा.



अनेक आठवणी मागे ठेवून गेलेली माझी पत्नी प्रिय प्रेम

आणि

माझी मुलं नितिन –प्राची, पराग-रचना,

व माझी नातवंड

अदिती, रचित, प्रणित

ह्यांना

# अनुक्रम

**मनोगत : गोळा बेरीज** **पान**


- कवितेचा जन्म १८
- सेंड ऑफ ३३
- अमरावतीची समृद्ध संस्कृती ४६
- मी आणि माझे विद्यार्थी ५७
- देव सर्वांचाच ६७
- दोन मित्र-दोन कवी ७५
- तगमग ८७
- आठ्वणींचा निळा पारवा १००
- रँगिंग १०९
- आनंद देण्यातला ११९
- एका प्रसन्न व्यक्तिमत्वाचा अंत १२७
- सुपरव्हिजन १३६
- तू असायला हवी होतीस १४५
- मी बसवलेली नाटकं १५४
- अभिव्यक्ति स्वातंत्र्याचा अतिरेक १६६

- गोल्डन ज्युबिली १७२
- नामजोशी सर १७९
- व्हायवा १८७
- सिनेसंगीताचे काही रोचक किस्से १९५

# मनोगत: गोळा बेरीज

प्रत्येक माणसाला बालपणापासून तर म्हातारपणापर्यंत किंवा मृत्यू होईपर्यंत आयुष्याची वाटचाल करावी लागते. ही वाटचाल करताना त्याला वाटेत अनेक माणसं अनेक व्यक्ति भेटतात. त्याला अनेक प्रसंगातून जावं लागत, त्याच्या जीवनात अनेक घटना घडतात.आयुश्यात भेटणाऱ्या या अनेक माणसांपैकी बरेच जण त्याच्या जीवनावर प्रभाव पाडून जातात. कधी कधी तो प्रभाव चांगला असतो तर कधी कधी वाईट असतो तसेच अनेक प्रसंगांपैकी, घटनांपैकी बऱ्याच कायम आठवणीत राहतात तर काही कायम विसरून जातात.काही विसरून जाव्यात असं सारखं वाटतं पण विसरता येत नाहीत.

माझ्या 75 वर्षाच्या वाढदिवसानंतर एक दिवस असाच या 75 वर्षांच्या आयुष्याचा मागोवा घेताना मला माझ्या जीवनावर प्रभाव पाडणाऱ्या अनेक व्यक्ती अनेक प्रसंग आठवले. चांगले की वाईट हा मनात विचार आला. त्यापैकी काही व्यक्ती काही प्रसंग लिहून चांगले प्रसंग मी निवडले. ज्यांच्याकडून मी काही शिकलो ज्या चांगल्या प्रसंगाने मला काही चांगली शिकवण दिली असेच मी निवडले कारण जे मलाच

विसरण्यासारखे वाटले त्यांची परत उजळणी कशाला करायची? साधारण पुस्तकांची पाच पानं किंवा वर्तमानपत्राचं हाप पेज लांबी होईल इतका प्रत्येक लेख लिहायचा हे मनात ठरवून सवड मिळेल तसं लिहायला लागलो. दोन-तीन महिन्यात माझे जवळ जवळ पस्तीस लेख लिहून झाले. माझं मलाच बरं आणि हलकं वाटायला लागलं. मग मनात विचार आला की आपण हे लेख प्रकाशित केले पाहिजेत, गेली पाच वर्षं मी पुण्याला राहतो, पण दर दोन अडीच महिन्यांनी अमरावतीला जातो. नातेवाईकांना आणि मित्रांना भेटतो. हे सर्व 35 लेख घेऊन एकदा अमरावतीला गेलो. तिथे गेलो कि मी एच. वि. पि. एम. म्हणजे हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाला आवर्जून जातो. त्यांच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य अनंत मराठे माझे मित्र आहेत. त्यांना नेहमी भेटतो.तास दोन तास चर्चा करतो. त्यांना लेखांची मी फाईल दिली, म्हटलं "सर हे वाचून पहा तुम्हाला बरे वाटले, आवडले तर दैनिक हिंदुस्थान ला द्या. ( डॉ० मराठे ही "दैनिक हिंदुस्तान" परीवारतले आहेत ) त्यांनी त्यांच्या सवडीने हे प्रकाशित करावेत अशी माझी इच्छा आहे." प्राचार्य मराठे हे जाणकार आहेत. त्यांना साहित्याची आवड आणि अंग आहे, म्हणून अन त्यांना जे वाटतं ते परखडपणे सांगणारे आहेत म्हणून,मी त्यांना परत म्हणालो सर वाचा अन फील फ्री टू से नो.खरं म्हणजे त्यांना एवढं सगळं वाचायला वेळ नसतो. पण मला माहित आहे की त्यांचं नुसतं चाळणं ही एखाद्या सुजाण वाचका

सारखा असतं.पुण्याला परत गेल्यानंतर मी काही दिवसांनी त्यांना फोनवर विचारलं," सर वाचले का लेख? कसे वाटले?" ते म्हणाले ' सर छानच लिहिलेतं तुम्ही. मला आवडले.आणि मी तुमच्या लेखांची फाईल दैनिक हिंदुस्थान कडे पाठवली आहे. मग मी एक दिवस दैनिक हिंदुस्थान चे डॉ. विलासराव मराठे यांच्याशी फोनवर बोललो. म्हणालो "विलासराव तुम्हाला आवडले तर," काही व्यक्ती काही प्रसंग " या मथळ्याखाली हे लेख एक एक करून तुमच्या सवडीने प्रकाशित करा अशी माझी विनंती आहे". मग त्यांनी ते हिंदुस्थानच्या रविवारच्या ' साहित्य मैफिल' या पुरवणी मध्ये ' स्वानुभव 'या मथळ्याखाली प्रकाशित करायला सुरुवात केली.. हे मी लिहितो आहे तोपर्यंत जवळजवळ सगळे लेख प्रकाशित झाले आहेत. त्याबद्दल मी मनापासून प्राचार्य डॉ. अनंत मराठे, डॉ. विलास मराठे, विवेक आणि मनिषा मराठे व सर्व हिंदुस्तान परिवाराचे आभार मानतो.. माझा प्रत्येक लेख प्रकाशित झाल्यावर, त्या किंवा दुसऱ्या दिवशी मला काही ओळखीचे, काही अनोळखी फोन यायला लागले',' छान लिहिलंय तुम्ही.' लेख आवडला.'असे, तर काही सविस्तर असे फोन मला आले. मला आनंद व्हायला लागला; आपण लिहिलेलं वाचल जातं आहे, कोणालातरी ते आवडतं आहे हे लिहिणाऱ्याला मिळणारं अतीव समाधान अन आनंद असतो.. मला आवर्जून नमूद करावंसं वाटतं की ह्या लेखांमध्ये लिहिलेले प्रसंग किंवा व्यक्ती काल्पनिक नाहीत. मी जसेच्या तसे ते लिहिले आहेत

अगदी 90 टक्के तर नावंही मूळचीच आहेत.. फार थोड्या ठिकाणी ती बदलली आहेत. व त्या त्या ठिकाणी तसा उल्लेखही मी केला आहे.. मला दोन-तीन वेळा विदर्भ महाविद्यालय अमरावतीच्या अर्थशास्त्र विभागाचे निवृत्त प्राध्यापक व विभाग प्रमुख श्री जाहागीरदार सर यांचे फोन आले.. ते माझ्यापेक्षा मोठे आहेत, दैनिक हिंदुस्थान मध्ये अर्थशास्त्रावर त्यांचे अभ्यासपूर्ण लेख नेहमी प्रकाशित होतात... सर एकदा मला म्हणाले " जाजू,, तुम्ही छानच लिहिता पण मला आश्चर्य ह्याचं वाटतं की चाळीस पन्नास वर्षांपूर्वी ची सर्व नावं तुम्हाला आठवतात. कौतुकास्पद आहे," मी म्हणालो सर परमेश्वराची कृपा आणि तुमचे आशीर्वाद आहेत." आता हे सर्व लेख एकत्र करून एखादे पुस्तक किंवा सर्व एकत्र करून एकाच ठिकाणी पीडीएफ मध्ये संग्रहित करून ते सर्वांना एकाच ठिकाणी उपलब्ध करून द्यावेत असा एक विचार डोकावतो आहे. आयुष्याची गोळाबेरीज करताना सर्वात आधी हे लक्षात आलं की परमेश्वराची आपल्यावर अनंत कृपा आहे. त्यानं आपल्याला नाही दिलं, त्यापेक्षा त्यानं जे दिलं ते फार जास्त आहे. त्यामुळे " ना तुमसे गिला कोई मुझको, न कोई शिकायत दुनिया से " असं त्या ईश्वराला म्हणावसं वाटतं. शेवटी सुख हे समाधान मानण्यात असतं. आपण आयुष्यभर सुख मिळवण्याचा प्रयत्न करत असतो. हे आपण सोयीस्करपणे विसरतो कि सुख हे मिळवायचं नसतं.मानायच असतं. समाधान हे सुख मानण्याचं मोठे साधन आहे. बराच वेळा ईश्वरानं

आपल्यावर अन्याय केला आहे असं प्रत्येकाला वाटतं. पण मागे वळून पाहिलं तर परमेश्वर ज्या ज्या वेळी जे जे करतो ते आपल्या भल्यासाठीच असतं अशी प्रचिती बहुदा सर्वांना होते. आपण सर्वसामान्य माणसं आहोत. 'साधुसंत नाही. त्यामुळे आपल्याला सर्व आकार-विकार असणारच. मग त्या त्या वेळी आपल्याला बरं किंवा वाईट वाटणारच. प्रत्येकाच्या वाट्यावर हे येतच. ह्यालाच जीवन असे नाव.' जाता जाता एक सांगावसं वाटतं की सर्व लेख माझ्या जीवनात आलेल्या व्यक्ती विषयी अन् मी अनुभवलेल्या प्रसंगांशी निगडीत आहेत. मी एक सामान्य माणूस आहे..पण माझ्यासारख्या सामान्यांच्या जीवनातही अनुभवास आलेले हे प्रसंग किंवा भेटणारी ही माणसं किती शिकवून जातात हे सांगण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केला आहे. त्यात एक छोटीशी का असेना पणे फिलॉसॉफी आहे'.( उपदेश नाही ) काहीतरी सांगून जाण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न आहे. ईथे एका गोष्टीचा.मला आवर्जून उल्लेख करावसा वाटतो. मी हे लेख वेगवेगळया दिवशी लिहले आहेत अन ते वेगवेगळया दिवशी दैनिक हिंदुस्थानमध्ये प्रकाशित झाले आहेत. काही प्रसंगांचा अन बाबींचा उल्लेख एकापेक्षा जास्त लेखात आलेला आहे.वाचकांनी कृपया ती पुनरावृत्ती समजू नये. त्या त्या प्रसंगाचा, त्या बाबिचा, दुसर्या लेखातही संदर्भ असल्यानं परत लिहवं लागलं. मी एक खूप वाचलेला वाचक आहे.त्यामुळे मी लिहलेलं जर मला आवडलं तर ते इतरांनाही आवडावं हा विश्वास काही

अनाठायी नाही असं मला प्रामाणिकपणे वाटतं. ' जांनी हे लेख वाचले असतील त्यांना ते आवडले असतील. जे वाचतील त्यांना ते आवडतील हा मला विश्वास आहे. पुन्हा एकदा प्राचार्य अनंत मराठे, डॉक्टर विलास मराठे, मनीषा आणि सर्व दैनिक हिंदुस्थान परिवाराचा मी आभारी आहे, ह्या सर्व लेखांचं एक पुस्तक करून ते प्रकाशित करण्यासाठी इ साहित्यांनी जो पुढाकार घेतला आणि मला मदत केली त्यासाठी मी ई साहित्याच्या प्रशासकांचा आणि इ साहित्याच्या सर्व परिवाराचा अत्यंत आभारी आहे. हे लेख वाचून झाल्यानंतर, हे पुस्तक वाचून झाल्यानंतर ते जर तुम्हाला आवडलं तर कृपा करून आपला फीडबॅक मला कळवा. मी आपला ऋणी राहील..

डॉ. बंकट जाजू

# कवितेचा जन्म

माणसाच्या आयुष्यात कित्येक वेळी त्याला मोहून टाकणारे निसर्गरम्य दृश्यं पाहायला मिळतात. आपण एखाद्या खळखळ वाहणाऱ्या नदी काठी उभे असतो आणि खडकातून वाहणाऱ्या पाण्याचा तो कलरव आपल्याला मोहून जातो. एखाद्या प्रशांत सागराच्या किनाऱ्यावर उभे राहून मावळतीच्या सूर्यबिंबला दूर-दूर सागरात हळूहळू बुडतान्नाता पाहतो आणि आपले डोळे त्यावरून हटत नाहीत. कधी कधी मनाला लावून जाणारा एखादा प्रसंग आपण पाहतो. आपल्याला अंतर्बाह्य ढवळून टाकणारं एखादं पुस्तक आपण कधी कधी वाचतो. अशा अनेक प्रसंगी वेगवेगळ्या भावनांचं जे काहूर मनात उठतं ते शब्दात व्यक्त करता आलं तर एका कवितेचा जन्म होतो. कोणा कोणाला त्याचक्षणी शब्द सुचतात आणि क्षणात एका काव्याची निर्मिती होते. कोणाकोणाला नंतर शब्द आठवतात, सापडतात अन कविता जन्म घेते. कोणा कोणाला नंतर आठवतांना शब्द सापडतात पण त्यांना आपल्याला जे काही वाटतं ते बरोबर कागदावर मांडता येत नाही. अभिव्यक्तीसाठी काही काही वेळा त्यांना शब्दही सापडत नाहीत. अन त्या भावना, ते काव्य अव्यक्तच राहतं. कवितेचा जन्म असा होतो.

मी काही मोठा कवी वगैरे नाही. फक्त किंचित कवी आहे किंवा कवी म्हणून घेण्याइतपत कवी आहे. 2009 ला माझा एक हिंदी काव्यसंग्रह “ विद्रोह “ ही प्रकाशित झाला आहे. त्या संग्रहाच्या सुरुवातीला ‘’संवेदनाओ के संदर्भ’ हे माझं मनोगत मी लिहिलं आहे आणि संग्रहातल्या कविता कशा जन्माला आल्या या बद्दल जे लिहिलं आहे त्या माझ्या मनोगताचा पहिला पॅरीग्राफ म्हणजे परिच्छेद मी जसाच्या तसा इथे लिहितो आहे.

“ संवेदनाओ के संदर्भ “-----

मै जन्म से इंसान और कर्म से एक इंजिनियर हूं. अभियांत्रिकी महाविद्यालयोमे आचार्य और प्रधानाचार्य भी रह चुका हूं. आम तौर पर यह धारणा है की, हम इंजिनीअरो का जीवन यंत्र यांत्रो के सानिध्य मे बडा खुश्क होता है.पर यह धारणा कितनी गलत है, यह हमारे कई दिग्गज इंजिनिअरोने साबित किया है. संगीत और साहित्य के क्षेत्र में ख्यातीप्राप्त इंजिनिअरो की संख्या कम नही है. उसकी नामावली बहुत बडी होगी. यहा नही देपाऊंगा. सही मानो मे हमारा मन बहुत संवेदनशील होता है. जीवन की राह चलते चलते, सुख-दुख, रिश्ते नाते, वेदना संवेदना, सागर-सरिता, चांद सूरज के सानिध्य से मै भी गुजरा हू, ऐसे हि कुछ क्षणानुभावोने मन को हसाया है, रुलाया है. मन को छूआ है. मनके वह भाव उस उस समय कागज पर लिखता गया और वह मेरी रचनाये हो गई. इस काव्य गंगामे शायद जीवन के सब रंग है. सब रंग मनभावन.

जगातल्या सर्वच भाषांमध्ये मनाला प्रफुल्लित करणाऱ्या, हेलावून टाकणाऱ्या, भारावून टाकणाऱ्या, मंत्रमुग्ध करणाऱ्या, काळजाला भिडणाऱ्या अशा अनेक अति उत्कृष्ट कविता, अत्यंत उच्च कोटीच्या कवींनी लिहिल्या आहेत. त्यातल्या बऱ्याच कवितांचा जन्म तर क्षणार्धात झाला आहे. या कवींचा शब्दसंग्रह, शब्दसामर्थ्य, शब्दभांडार इतकं मोठं आहे की अभिव्यक्तीच्या त्या प्रसव क्षणी त्यांना कधीच शब्दांनी अडवून ठेवलं नाही. हा एक अनुभवच असतो. मी वर म्हटल्याप्रमाणे मी काही कवी वगैरे नाही पण अशाच काही अनुभवांमधून मी ही गेलो आहे. आणि बऱ्याच वेळा अशाच उत्स्फूर्त भावनांना प्रगटीकरण करण्याचा मी प्रयत्न केला आहे, माझ्या 2009 मध्ये प्रकाशित झालेल्या विद्रोह या संग्रहात, आणि त्यानंतरही मी लिहिलेल्या चाळीस-पन्नास कवितांमध्ये. मला ज्याची अनुभूती झाली आहे, ते अनुभव इथे लिहितो आहे. सर्वच नाही पण तीन-चार तरी मला इथे देता येतील.

मला आठवतं, 1985-86 च्या दरम्यान जुन्या अमरावतीत एकदा एक मोठी जातीय दंगल झाली. बहुधा हनुमान नगर हे त्या वस्तिचे नाव असल्याचं आठवतं. त्या दंगलीत दोन जणांचा मृत्यू झाला. नंतरच्या चौकशीत आणि बातम्या वरून असं कळलं की ज्यांचा मृत्यू झाला त्या दोन व्यक्तींचा त्या दंगलीशी काहीही संबंध नव्हता. ते तिथलेच कोणी निरपराध लोक होते. ऐकून, वाचून खूप वाईट वाटलं. नेमकं त्याच वेळी

1983, 84, 85 मध्ये पंजाब मध्ये झालेल्या, चाललेल्या अतिरेक्यांच्या उपद्रव ह्याच्या, इंदिरा गांधीच्या हत्ते नंतरच्या काही खऱ्या तर काही फेक इन काउंटर च्या बातम्या, सारख्या वर्तमानपत्रात यायच्या. त्यातही अशाच निरपराध माणसांच्या मृत्यू बद्दल च्या बातम्या असायच्या. ह्या सगळ्या बातम्यांनी माझ्या मनात काहूर उठवलं. प्रकर्शानं एक विचार मनात आला की या निरपराधांच्या रक्ताचा अभिशाप आता भोगावा लागणार. अमरावतीत दंगा झाला त्याच्या दुसऱ्याच रात्री ह्या भावनांनी गलबलून मी कागद समोर घेतला आणि हातात पेन घेतलं अन झरझर एका दमात लिहित गेलो. त्यानंतर एक शब्दही मी या रचनेतला बदललेला नाही.माझ्या त्या कवितेचं शिर्षक मी दिलं “अग्निअस्त्र”. “अग्निअस्त्र”

निरपराध के रक्त का अभिशाप अग्नीअस्त्र है,
प्रतिशोध के शोला जो भडकायेगा.
ना यह रहेगा वह रहेगा, शेष ना मै तू रहेगा,
आग मे जल जायेगा. आग तो हे कर्मयोगी, पर कर्म अपना जानती है,
यह न तुझको और न मुझको, या कीसे पहचानती है.
इसलिये कहता हूँ मत भडकाओ शोले. मत लगाओ सर्व नाशो के ये मेले.
पापियो की खाक तो वह करही देंगे, पर करेंगे खाक सब निर्दोष भोले.
और निर्दोष भोले जान की आह भी विषय है,जहर है,

जो गाज बन कर गीर पडी, तो फिर कहर है.
मत लो परीक्षा इस हलाहल की, जीसे नीलकंठ भी छू ना सकेगा,
जहर तो पी गया व चंद्र धारी,
इस आह के अभिशाप को ढो ना सकेगा.
इस रक्त से भिगी हुई माटी, कलंकित रहेगी,
निर्दोष की हत्या यहा अंकित रहेगी.
गंगा तेरा जल भी न शायद फिर इसे पावन करेगा,
विषवृक्ष को यह जन्म देगी,जो मौत का साया करेगा.
मत जन्म दो अविक्राल को,विक्रालको मत जन्म दो तुम,
आदमी हो,आदमी को ही बस जन्म दो तुम.
मत नाश को इनसे रचो, निर्माण के यह हाथ है,
नही राक्षसो की, डायनो की, आदमी की जात है.
संवर्धना है काम तेरा,ना संहार तेरा काम है,
इन्सानियत है भक्ति,हर इंसान तेरा राम है.

नंतर मी अनेक मंचावर ही कविता प्रस्तुत केली, वाचली. पण मला अजून तो प्रसंग आठवतो. 1987 च्या उन्हाळ्यात मी पुण्याला इन्स्टिट्यूट ऑफ आर्मामेंट टेक्नॉलोजी मध्ये एम.टेक च्या एका विद्यार्थ्याचा व्हायवा घ्यायला गेलो होतो. तिथले सर्व विद्यार्थी, प्राध्यापक सैन्यातले.

माझ्याबरोबर इंटरनल एक्झामिनर म्हणून प्राध्यापक डॉक्टर पंत (भूतपूर्व केंद्रीय मंत्री के सी पंत यांचे पुतणे की नातू. मला नीटसं आठवत नाही) हे होते. संध्याकाळी त्यांनी तिथल्या मेजर, कॅप्टन, ब्रिगेडियर अशा पंधरा-वीस जणांचं डीनर ठेवलं होतं. सहकुटुंब. मला आणि माझ्या पत्नीला ही (माझ्याबरोबर माझी पत्नी होती तेव्हा) आम्हा दोघांनाही, त्यांनी डिनरला बोलावलं होतं. डिनरच्या वेळी गप्पा गप्पांमध्ये पंजाब मधल्या अतिरेक्यांवर आणि एन्काऊंटर वर जेव्हा चर्चा सुरू झाली, तेव्हा मी त्यांना सर्वांना अग्नीअस्त्र ही वर लिहिलेली कविता ऐकवली. त्या सर्वांना ती आवडली.मग मी मझ्या आणखी3-4 कविता ऐकवल्या.त्यासर्वाना इतक्या आवडल्या की मिसेस पंत म्हणाल्या ‘जाजूजी, आप इन रचनाओ का एक् संग्रह क्यू नही प्रकाशित करते? अगर आपको समय नही है तो मुझे आपकी सारी कविताये देदो. मै आपका संग्रह प्रकाशित करुंगी.’ पण मी ते मनावर घ्यायला जवळ जवळ 2009 उघडला. अन तो ही माझ्या पत्नीच्या एक सारख्या तगाद्यामुळे. ती माझ्या मागेच लागली की आता तुमच्या इतक्या कविता झाल्यात त्याच्या पैकी चांगल्या चांगल्या निवडून एक कवितासंग्रह आपण छापू घ्या.

माझ्या दुसऱ्या एका कवितेचा विषय हा तर सर्वांच्या रोजच्या बोलण्यातला आहे.मी. किती जणांना किती वेळा “ भगवान के घर देर है अंधेर नही “ असं म्हणताना ऐकलं. मनात एक दिवस विचार आला, तशी

एका दमात ही कविता लिहिली. ह्या कवितेचं शिर्षक आणि माझ्या काव्यसंग्रहाचं शिर्षक एकच आहे " विद्रोह "

असत्य के कंधोपर,जब सत्यकी लाश को स्मशान जाते देखा,
तब अपनी चिता आप जलाकर हमने नया जन्म लिया,
अपने आप से विद्रोह किया.
अब तक जिया हमने जो जीवन लगता है सब था व्यर्थ,
घिसापिटा हर वसूल था, हर अर्थ था एक अनर्थ.
हम सुनते थे उसके घर देर है अंधेर नही.
पर इतनी देर से देखा हमने दूर होता अंधियारा,
जब ऊजाला देखनेको आखो मे रोशनी नही होती.
रोते रोते बीतता जीवन सारा, और तब आता हसनेका क्षण,
जब थक कर हारे प्राणोमे हसने की शक्ती नही होती.
कैसे है देर, और कैसे नही अंधेर?
सोच सोच जब थक कर हारे,
घिसे-पिटे अर्थ शब्द के, जब ना आये काम हमारे,
सच्चाई की राह पर अपनी परछाई भी न आयी साथ,
तब हमने सोचा, अब करो आत्मघात.
अब पथ बदलो,

और चलो कोई ऐसी राह,

जहा देर तक अंधेर न हो.

ज्हा हेर हो या फेर हो, सिर्फ वसूलोका ढेर न हो.

हम सुनते थे अंतिम विजय सत्यकी है.

पर सत्य की विजय होने तक जब व्यक्ती का अंत होते देखा,

तब अपनी चीता आप जलाकर, हमने नया जन्म लिया.

अपने आप से विद्रोह किया.

माझ्या ह्या हिंदी कविता संग्रहाच्या शेवटी, अगदी मोह आवरे ना म्हणून, माझी आवडती एक मराठी कविता ही दिली आहे. ही कविता ही, अशीच, काहीवेळा मी जसं प्रवासात लिहितो तशी प्रवासात जन्मली. तिची कथा ही थोडी मजेदार आहे.

11 सप्टेंबर 2004 ला मी तांत्रिक शिक्षण परीक्षा मंडळाच्या एका बैठकीसाठी मुंबईला गेलो होतो. सकाळी साडे दहाला सुरू झालेली मीटिंग साधारणतः दुपारी चार वाजेला संपली. नाशिकला त्या वेळी माझी मुलगी रहायची. म्हणून मी आधीच ठरवल्याप्रमाणे अकरा तारखेला संध्याकाळी नाशिकला गेलो. तिथून तिला भेटून एक दिवस तिच्याकडे राहून 12 सप्टेंबरला संध्याकाळच्या सहा वाजेच्या सेवाग्राम एक्सप्रेसने नागपूरला परत निघालो. त्यावेळी मी नागपूरला जी. एच. रायसोनी इंजिनिअरिंग

कॉलेजचा प्राचार्य होतो. सेवाग्राम मध्ये बसलो आणि पाच दहा मिनिटात गाडी निघाल्यावर विचार करायला लागलो की उद्या पोहचल्यावर कॉलेजमध्ये काय काय महत्वाची काम आहेत. आणि एकदम आठवलं की उद्या 13 सप्टेंबरला दोन वाजता कॉलेजमध्ये शिक्षक दिन अन अभियंता दिन साजरा करण्याचा कार्यक्रम आहे. आमच्याकडे आम्ही हे दोन्ही दिवस एकाच दिवशी साजरे करायचो. बऱ्याच मोठ्या प्रमाणात आम्ही हा कार्यक्रम करायचो. या दिवशी, दरवर्षी कॉलेजच्या एका आदर्श प्राध्यापकाला पुरस्कार देऊन त्यांचा यथोचित सन्मान करायचो. त्यासाठी दरवर्षी एका नावाजलेल्या इंजिनियर ला आम्ही प्रमुख पाहुणा म्हणून बोलवायचो. त्या वर्षी म्हणजे 2013 ला आम्ही व्ही एन आय टी नागपूर चे त्यावेळचे डायरेक्टर प्राध्यापक डॉक्टर मोघे यांना प्रमुख पाहुणा म्हणून बोलावलं होतं. प्रसंगाला अनुसरून यथोचित भाषणे व्हायची. मी प्राचार्य असल्यांना मला दरवर्षी बोलावंच लागायचं. दरवर्षी मग मी थोडं मार्गदर्शनपर भाषण करायचो. त्यादिवशी सेवाग्राम मध्ये बसल्यानंतर मनात विचार आला की दर वर्षी तेच ते काय बोलायचं. उद्या शिक्षकांच्या सन्मानार्थ एखादी कविताच लिहून आपण म्हणूया. मी साधारण हिंदी कविता लिहितो. वर लिहिल्याप्रमाणे माझा हिंदी कविता संग्रह प्रकाशित झालेला आहे. पण मधून मधून मी मराठीतही कविता लिहितो. त्यात 13 तारखेला मी मराठीच बोलणार होतो म्हणून वाटलं उद्या मराठीतच एखादी

कविता रचून वाचावी. भरभर मनात विचार दाटून आले, तशी समोरची बॅग उघडून माझी डायरी काढली आणि पेन हातात घेतलं. आणि लिहीत गेलो. कदाचित कोणाचा विश्वास बसणार नाही, पण मनमाड येईपर्यंत माझी कविता लिहून झाली होती. परत एकदा मी ती पूर्ण वाचली. मला आवडली. तशीच परत डायरी आत ठेवली. दुसऱ्या दिवशी घरी पोहोचल्यावर तयार होऊन सकाळी साडेनऊला कॉलेजला पोहोचलो. नेहमीच्या ब्रीफकेस मध्ये कालची डायरी टाकली. कॉलेजमध्ये गेल्यावर दोन दिवसाच्या उरलेल्या कामात दोन वाजेपर्यंत वेळच मिळाला नाही. डॉक्टर मोघे दुपारच्या कार्यक्रमाला वेळेवर आले. मी माझी डायरी घेऊन त्यांच्याबरोबर कार्यक्रमाला गेलो. वेळेवर कार्यक्रम सुरू झाला. मला बोलायला जेव्हा आमच्या अँकरनं विनंती केली, तेव्हा मी माइक वर गेलो. पाहुण्यांचं, सर्वांचं स्वागत केलं. समारंभाचे औचित्य, स्वरूप सर्वांना सांगितलं. आणि म्हणालो "आज फारसं काही बोलणार नाही. मी काल नाशिकहून येता-येता ट्रेनमध्ये एक कविता सुचली, ती जशी लिहिली, तसिच मी काहीही बदल न करता आता तुमच्या समोर सादर करणार आहे. डायरी हातात घेतली. कविता वाचली. सर्वांना खूप आवडली. खूप प्रतिसाद मिळाला. प्रमुख पाहुण्यांना तर खूपच आवडली. मी माझ्या जागेवर बसलो तेव्हा बाजूलाच बसलेले प्रमुख पाहुणे मला म्हणाले "तुमची मातृभाषा मराठी नाही. पण इतकं चांगलं मराठी तुम्ही लिहिता, बोलता.खरंच खूप कौतुकास्पद

आहे".मी मनात म्हटलं सर मराठी माझी मायच आहे. ती कविता इथं जशीच्या तशी लिहितो आहे. त्या कवितेचे शीर्षक आहे--

" हे गुरुवर्या "

कठीण कातळला कोरून सुंदर मूर्ती घडवणाऱ्या

मूर्तिकारापेक्षा तू श्रेष्ठ आहेस.

कारण तो तर अमूर्तला रूप देतो. पण तू तर मूर्त रूपातच जीव ओततो.

निर्जीव कातळान्ना छन्निच्या घावाचं काय,

त्यांना जसा आकार द्यावा तसा ते निमूटपणे घेतात.

चुपचाप. हू का चू न करता.

न हलता न बोलता.

सजीवाला आकार देणं तितकं सोपं नसतं.

मनाला दुखवणारा हलकासा शब्दही त्याला विव्हल करतो.

म्हणून शब्दाच्या हातोडीनं, भावनांच्या छन्निनं

इतक्या हळुवारपणे कोरावी लागतात मनं,

की वेदनेला स्पर्श होता कामा नये.

हे सतीचे वाण आहे.

मनाची जडण घडण तर करता आली पाहिजे.

पण मनाला न दुखावता त्याला तडा न देता.

एखाद्या मूर्तिकाराच्या अथक प्रयत्नानं, कौशल्यानं

एखादी मूर्ती आकार घेते. साकार होते.

पण तू तर आकार देतो ह्या शिल्पकारानाच,

ज्यांना घडवायचा आहे उद्याचा भारत.

तुला रुजवायची आहेत त्यांच्या मनात नभंगणारी स्वप्न,

तुला प्रज्वलित करायच्या आहेत न विझणाऱ्या मशाली. न विझणाऱ्या ज्योती.

अनंत अनादि काळापासून तू हेच करत आला आहेस,

अनंत अनादि काळापर्यंत तुला हेच करायचं आहे.

सभोवतालचा समाज त्याची नोंद घेतो आहे की नाही

याची खंत न बाळगता.

सूर्याचं प्रखर ऊन आपल्या अंगावर घेऊन,

आसऱ्याला येणाऱ्या वाटसरूला सावली देणाऱ्या वृक्षासारखं,

स्वतः गढूळ झाल्याच्या यातना भोगून दुसऱ्यांची पापं धुणाऱ्या गंगे सारखं.

हे शिक्षका, हे तुझे व्रत आहे. हे तुझं वैकल्य आहे. हा तुझा धर्म आहे.

हे तुझ्या जीवनाचं मर्म आहे.

हे ब्रिद जोपर्यंत तू आपल्या ह्दयाशी कवटाळून ठेवशील,

तोपर्यंत सर्व चराचर तुला पुजनीय्च मानतील.

मग काळ कितीही बदलू दे.

हे गुरुवर्या, हे शिल्प कारा,

तुला माझा शतशः प्रणाम.

मी वर उल्लेख केल्याप्रमाणे मी काही कवी नाही. केवळ माझी आवड आणि छंद म्हणून काही काही वेळा मनात भाव आले ते शब्दांमध्ये व्यक्त करण्याचा मी प्रयत्न केला आहे. मी कागद आणि पेन घेऊन कविता लिहायला म्हणून कधीच बसलो नाही. तसे,फक्त एक एक दोन प्रसंग मला आठवतात. पण माझ्या त्या कविताही मला आणि अनेक जणांना आवडल्या. 9 वर्ष इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये शिकवल्यानंतर मी आयआयटी मुंबईला एम.टेक चा रेग्युलर विद्यार्थी म्हणून गेलो. तिथे पहिल्या सेमिस्टर मध्ये आयआयटीच्या पोस्ट ग्रॅज्युएट होस्टेल मध्येच राहिलो. मला आठवतं आमच्या फ्रेशर्स डे मध्ये मी माझी एक कविता म्हणून दाखवली होती.ती सर्वांना आवडली. पुढे होस्टेल डे चा कार्यक्रम जेव्हा आला त्यावेळी आमच्या होस्टेलचे सचिव अन त्याचे काही मित्र एक दिवस अगोदर माझ्या रूमवर आले, आणि म्हणाले जाजूजी आप कल के फंक्शन मे एखाद हलकीफुलकी रचना सुना दो. मी म्हटलं मेरी सब कविता है गंभीर स्वरूप की है. मै हलकाफुलका तो कभी लिखता नही हू. ते म्हणाले

‘कल के कार्यक्रम के लिए लिखलो’ मग मी खरंच त्या रात्री झोपताना एक हलकीफुलकी कविता लिहिली. तिच् शिर्षाक होतं “ व्हायवा” दुसऱ्या दिवशी कार्यक्रमा वाचली तर सर्वांना खूप आवडली. जागेअभावी ती मला इथे देता येणार नाही. तसेच, 1996 ला माझा मुलगा पराग हा जेव्हा VJTI मुंबईला सेकंड इयर कम्प्युटर इंजिनीअरिंगचा विद्यार्थी होता, तेव्हा त्याच्या वाढदिवसासाठी मी एक हॉल मार्कचं ग्रीटिंग कार्ड आणलं आणि त्या ग्रीटिंग कार्ड बरोबरच माझी एक कविता ही मी लिहून त्याला पाठवली. त्या कवितेचं शीर्षक मी “आशिष” असं दिलं. त्याला ती खूप आवडली.त्यानंतर अनेक महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी माझी जी भाषणे झाली त्यांचा समारोप करताना मी नेहमी ती कविता म्हणायचो. सर्वांना ती खूप आवडायची. अजूनही मी काही प्रसंगी विद्यार्थ्यांसाठी ती कविता म्हणतो. मी नागपूर रायसोनी कॉलेजला प्राचार्य असताना आमच्या विद्यार्थ्यांनी त्यांचं दर तीन महिन्याला जे मॅक्झिन निघायचं त्याच्या फ्रंट पेजवर ही कविता नेहमी दिलेली असायची. मी आधी म्हटल्याप्रमाणे या कवितेचे शीर्षक आहे---

“ आशिष “

हौसले बुलंद हो तुम्हारे और ऐसा आदमी हो उत्साहात तुम्मे
की तुम गरुड बनो, आकाश उठओ पंखोपर.

मधु घोलो अपनी वाणी में, और विनय रहे इतना तुम मे,
के छू न पाये गर्व कभी, सर झुका रहे श्रीचरणो पर.
फल होता मिठा परिश्रम का, और व्यर्थ न होता यत्न कोई,
जो गिरकर उठना सिखालाये, सबसे अच्छा प्रयत्न वही.
तुम लक्ष रखो ऊचा अपना, और दृष्टी रखो ऊस पर अपनी.
हो ताकद पैरोमे इतनी,की राह चलो तुम खुद अपनी.
जो रोडे बने अपने पथके, ऐसे मोह मे मत घिरना.
जो बहती धारा को रोके, ऐसे भवर मे मत घिरना.
क्या सच, क्या झूठ, क्या गलत, सही,
इसको रखना ठीक सदा
रुक ना न भवर मे तुम फस कर
बहना बहते निर्झर से सदा.
तुम अपना लक्ष, सफलता का सुगंध भर लाओ,
हम द्वार खडे आशिष लिये, खुशियों का मधुगंध घर लाओ,
अशा जन्मल्या माझ्याकविता.

# सेंड ऑफ

आता ह्या सेंड ऑफ शब्दालाच कुणी हरकत घेतिल. मराठीत लेख लिहायचा,अन निरोप समारंभ हा मराठी शब्द हाती असताना इंग्रजी शिर्षक द्यायचं. प्रथम तर मला, निरोप,हा. समारंभ कसा असू शकतो हेच मुळात कळलेलं नाही. अशा हृद्य प्रसंगाला मला तरी ‘निरोप समारंभ’ असं म्हणावसं वाटत नाही. शिवाय मराठीत आपण अनेक अर्थाने निरोप हा शब्द वापरतो. जसं, त्याला तू निरोप पाठवला का, मी तुझा निरोप घ्यायला आली आहे,शिवाय निरोप समारंभ आहेच. असो. माझ्या सरकारी 34 वर्ष,व खाजगी 14 वर्षे अशा 48 वर्षाच्या शिक्षण क्षेत्राच्या नोकरीत मला दहा तरी सेंड ऑफ देण्यात आले. त्यात सरकारी सहा आणि खाजगी क्षेत्रातले दोन आणि आयआयटी मुंबईला एम.टेक करायला गेलो, पीएच.डी करायला गेलो तेव्हा मझ्या विद्यार्थ्यान्नीं दिलेले दोन, निरोप समारंभ माझ्या लक्षात आहेत. या सर्वच निरोप समारंभाच्या - सेंड-ऑफ च्या वेळी ज्यागोष्टी घडल्या त्यांच्या आठवणी मी आयुष्यभर जोपासल्या आहेत. त्यातल्या 2-3 बद्दल इथे थोडसं लिहितो. सर्वच लिहिण्या सारख्या, व्यक्त करण्यासारख्या आहेत पण जागेअभावी मला लिहिता येणार नाहीत. यापैकी दोन माझ्या विद्यार्थ्यांनी दिलेले सेंडॉफ, सहा माझ्या प्राध्यापक

मित्रांनी अर्थात स्टाफ नी दिलेले तर दोन माझ्या कार्यालयीन आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी दिलेले आहेत.

1966 ला मी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती येथे मेकॅनिकल डिपार्टमेंटला लेक्चरर म्हणून रुजू झालो. याच पदावर कन्फर्म होण्यासाठी आम्हाला महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सिलेक्ट व्हावं लागतं. त्यासाठी आमचे एम पी एस सी चे इंटरव्यूच मुळात 1971 च्या डिसेंबर मध्ये झाले. निवड झालेल्या यादीत माझंनवही होतं. सर्व सोपस्कार संपल्यानंतर फेब्रुवारी 1973 उजाडला.त्यात माझं पोस्टिंग आणि माझे एक मित्र प्राध्यापक वाघोदेकर यांचं पोस्टिंग अमरावतीहून गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे येथे झालं. त्यावेळी स्टाफनं वेगळा आणि आमच्या मेकॅनिकल च्या विद्यार्थ्यांनी दिलेला वेगळा, असे दोन सेंडॉफ मला आठवतात. विद्यार्थ्यांनी दिलेलला तो सेंड ऑफ, अन ते सर्व आम्हाला सोडायला बडनेरा रेल्वे स्टेशन वर आल्याचं अजून आठवतं अन मन भरून येतं. पुण्याहून मी परत वर्षाच्या आत अमरावतीला आलो. 1975 ला आय आय टी मुंबई येथे एम.टेक साठी दोन वर्ष गेलो, तोही सेंडॉफ मला आठवतो. 1977 ला एम.टेक होऊन मी परत अमरावतीला आलो आणि लागलीच 1978 मार्चला प्रमोशनवर माझी औरंगाबादला बदली झाली. 1978 मार्च ते ऑगस्ट 1981 पर्यंत मी औरंगाबादला होतो. तेव्हा मी कॉलेजच्या ए आणि सी होस्टेल चा वार्डनही होतो. जवळजवळ पाचशे

विद्यार्थी होस्टेल मध्ये राहायचे. मी विद्यार्थ्यांसाठी झटून काम केलं. होस्टेल मधल्या अनेक तक्रारी, लाईट, पाणी व इतर प्रॉब्लेमस मध्ये जातीनं रोज लक्ष घालायचचो. माझ्याबरोबर प्राध्यापक बी.ए. पाटील हे रेकट्टर होते अन प्राध्यापक कानेड हे दुसरे वार्डन होते. आमची तिघांची चांगली टीम जमली. मी विद्यार्थ्यांमध्ये इतका मिसळून होतो की आमच्या होस्टेल मधल्या 83 रूममध्ये जे जे विद्यार्थी राहायचे,त्यात प्रत्येक रूममध्ये तिन, त्यांची सर्वांची नावं, आणि रूम नंबर मला माहीत होते. कोणत्या रूममध्ये कोणते तिन विद्यार्थी आहेत अन अमूक एक विद्यार्थी कोणत्या रूम मधला आहे, हे मी 90 टक्के बरोबर सांगू शकत होतो. आमच्या त्यावेळच्या प्राचार्यांनी ह्याची खात्री करून घेऊन आश्चर्य व्यक्त केलं होतं. हे यासाठी लिहिलं की ह्या सर्व चारशे-पाचशे विद्यार्थ्यांनी, मी ऑगस्ट 1981 ला जेव्हा आयआयटी मुंबईत पीएच.डी.साठी गेलो, तेव्हा माझ्यासाठी मोठा सेंडॉफ आयोजित केला. माझा एक वर्गमित्र त्याच कॉलेजमध्ये 1966 पासून लेक्चरर होता. माझ्याच विभागातला. सेंड-ऑफ च्या दिवशी तो मला म्हणाला, गेल्या पंधरा वर्षात या महाविद्यालयात, विद्यार्थ्यांनी प्राध्यापकाला दिलेला,हा पहिला सेंडऑफ आहे. तो हृद्य प्रसंग मला एका खास कारणासाठी निरंतर आठवतो. माझा सेंडऑफ च्या दिवशी स्टेज वर आमचे प्राचार्य, विभाग प्रमुख, हॉस्टेलचे रेक्टर पाटील साहेब, दोन वरिष्ठ प्राध्यापक उपस्थित होते. हॉलमध्ये पाचशे तरी विद्यार्थी असावेत. जवळजवळ आठ-नऊ,

वेगवेगळ्या वर्गाचे अन् वेगवेगळ्या ब्रांचचे,होस्टेल मध्ये राहणारे विद्यार्थी, स्टेज वर येऊन बोलल्यानंतर, प्राचार्यांनी स्वतः भाषण सुरू करण्यापूर्वी, मुलांना विचारलं "आणखी कोणाला बोलायचं आहे काय" तेव्हा थर्ड इयर सिव्हील चा एक विद्यार्थी, एन.जे. पैलवाड म्हणून उभा राहिला आणि म्हणाला "सर मला थोडं बोलायचं." तो जे बोलला ते, त्याच्याच शब्दात मी खाली लिहितो आहे. मला अजून आठवतं सगळं. तो म्हणाला---

" सर आणि मित्रांनो मी थर्ड इयर सिव्हिल चा विद्यार्थी. जाजूसर मेकॅनिकलचे. त्यामुळे त्यांनी मला एकही विषय शिकवलेला नाही. बर मी आपल्या कॉलेजच्या होस्टेलमध्येही राहत नाही. मी भटक्या आणि विमुक्त जमाती चा असल्यामुळे मला संत तुकाराम बॅकवॉर्ड क्लास हॉस्टेल मध्ये जागा मिळाली आहे. त्यामुळे होस्टेलवर मी राहिलेलो नसल्यामुळे माझा तसा त्यांच्याशी काही संबंध आलेला नाही. पण मला त्यांच्या बद्दल वेगळच काही सांगायचं आहे. मला शाळेपासून गणिताची म्हणजे मॅथेमॅटिक्सची खूप आवड आहे.वेगवेगळे, मॅथेमॅटिक्स चे प्रॉब्लेम्स निराळ्या तर्हेन करून पहायचे हा माझा छंद आहे. मागच्या वर्षी मी कॉड्रॅटिक इक्वेशन सोडवण्याची एक वेगळी अन सोपी पद्धत विकसित केली. मला पूर्ण खात्री झाल्यावर मी आमच्या गणितांच्या दोन्ही प्राध्यापकांकडे गेलो. त्यांना सांगण्याचा प्रयत्न केला.त्यांनी माझं पुरतं ऐकूनही न घेता, मला पळवून लावलं. आमच्या विभागातल्या एका

प्राध्यापकां कडे गेलो, ते म्हणाले असं काही नसतं. माझी पद्धत मी सांगायला गेलो तर म्हणाले तू गणित वाल्यांना दाखव. मी गरीब मुलगा, माझा अवतार आणि कपडे हे असे. कदाचित मी काही वेड्यासारखे करतोय असं त्यांना वाटलं असावं. मग मी आमच्या संत तुकाराम हॉस्टेल मधल्या काही अभ्यासू आणि हुशार विद्यार्थ्यांना,मित्रांना ती पद्धत समजावून पटवून दिली. त्यात दोन मेकॅनिकल चे ही विद्यार्थी होते. ते म्हणाले अरे तू आपले होस्टेल वार्डन जाजू सर आहेत त्यांच्याकडे घेऊन जा. ते नक्की तुला मदत करतील. मग मी सरांच्या कॉर्ट्वरर सर्व घेऊन गेलो. त्यांनी मला, मी कोण, कोणत्या वर्गातला, कुठे राहतो, काय काम आहे असं सर्व विचारलं. मी त्यांना सर्व सांगितलं. त्यांनी मला घरात बोलावून शेजारी सोफ्यावर बसवलं आणि म्हणाले आता तू काय आणलं ते मला समजावून सांग. जवळपास तासभर मी त्यांच्याबरोबर बसून त्यांना सर्व लिहून सोडवून दाखवलं. त्यांनी मला त्यातले काही कागद ठेवून दे,मी परत रात्री वाचतो असं सांगितलं. उद्या माझ्या 1-2 प्राध्यापक मित्रांशी मी चर्चाही करतो असेही ते म्हणाले. तू उद्या संध्याकाळी परत भेट असे त्यांनी मला सांगितलं. मी परत दुसऱ्या दिवशी संध्याकाळी त्यांच्याकडे गेलो. त्यांनी सांगितलं, तू फार चांगलं काम केलं आहे. तू जे आणलं ह्याच्यात फार तथ्य आहे. हे सर्व दहा-बारा पानात,उदाहरणासहित इंग्रजीत तुला जसं जमेल तसं लिहून आण. ते आपण व्यवस्थित लिहून त्यावर एक पेपर लिहून मॅथेमॅटिक च्या दोन तीन जर्नल्स

ला पाठवू. बघू काय होतंय ते. मग मी लिहून आणलेले कागद त्यांनी परत वाचले आणि ज्या ज्या ठिकाणी सुधारण्याची आवश्यकता होती तिथे सुधारून व्यवस्थित लिहून काढ म्हणून मला सांगितलं किंवा बसून टाईप करून आणायला सांगितलं. मी त्या पेपरच्या चार-पाच प्रति टाईप करून आणल्यावर त्यांनी माझ्याच नावानं 3-4 गणिताच्या जर्नल्स ला पाठवले. साधारण दोन महिन्यांनी मला एका जर्नल्चं उत्तर आलं.की माझा तो पेपर त्यांच्या पुढच्या महिन्याच्या आवृत्तीत प्रकाशित होईल. मला खूप आनंद झाला. मी जाजू सरांकडे धावत जाऊन त्यांना ते पत्र दाखवलं. त्यांनी माझी पाठ थोपटली. खरच पुढच्या महिन्यात मला त्या जर्नलच्या दोन प्रति आल्या. त्यात माझ्या नावाने माझा तो पेपर प्रकाशित झालेला होता. मी पेढे घेऊन सरांकडे गेलो. त्यांच्या पाया पडलो. त्यांनी मला उठवलं आणि म्हणाले कीप इट अप. एवढंच नाही तर दुसऱ्या दिवशी ते मला प्राचार्यांकडे घेऊन गेले. आमच्या प्राचार्यांनी ही माझी पाठ थोपटून त्यांनी आमच्या ऑफिस मधल्या अधिकाऱ्यांना बोलावून त्यावर एक बातमी तयार करून दैनिक मराठवाडा व दैनिक अजिंठा या दोन्ही वर्तमान पत्राकडे पाठवायला सांगितली’ मग दोन दिवसांनी त्या दोन्ही पेपरमध्ये ही बातमी माझ्या फोटोसह छापून आली. मग माझ्या इतर प्राध्यापकांनी, मित्रांनी माझं फार कौतुक केलं. पण माझ्या ह्या यशाचे खरे गुरु म्हणजे जाजू सर आहेत. मी त्यांना परत त्रिवार वंदन करतो. मी जाजू सरांना कधीच विसरणार नाही.”

असं बोलून पैलवाड चे डोळे भरून आले. त्यावेळी माझेही डोळे भरून आले. हॉलमध्ये टाळयांचा कडकडाट झाला. तो आजतागायत मला ऐकायला येतो आहे. असा हा सेंड ऑफ. कधी न विसरण्यासारखा, कधी न विसरता येईल असा.

2001च्या सप्टेंबरला मी गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ इंजीनियरिंग औरंगाबाद च्या प्राचार्य पदावरून सेवानिवृत्त झालो व 17 ऑक्टोबर 2001 ला लागलीच नागपूरच्या जी एच रायसोनी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग च्या प्राचार्यपदी रुजू झालो. ते कॉलेज फक्त सहा वर्षांपूर्वी सुरू झालेलं होतं. उर्जितावस्थेत होतं. खूप काही करण्यासारखं होतं. अन मॅनेजमेंट ही खूप चांगलं होतं. म्हणून मला त्यांनी औरंगाबादहून रिटायर होण्याच्या दोन महिने आधीच नागपूरला बोलावून सर्व कॉलेज वगैरे दाखवून प्राचार्य पदाची ऑफर दिली होती. आणि ती मी आनंदान स्वीकारली. जवळपास साडेचार वर्ष मी तिथे प्राचार्य होतो. कदाचित दहा वर्षही राहिलो असतो इतक्या त्यांच्या आणि माझ्या तारा जुळल्या होत्या. पण काही वैयक्तिक कौटुंबिक कारणास्तव मला 2006 मध्ये अमरावतीला यावं लागलं माझं घर अमरावतीला होतं. मग मी रायसोनी साहेब -आमचे चेअरमन यांना खरं कारण सांगून मला कार्यमुक्त करण्याची विनंती केली. खूप मागे लागल्यावर त्यांनी ती मान्य केली. आम्ही साडेचार वर्षात खूप मेहनत करून ते कॉलेज नावारूपाला आणलं. माझाही पाय निघत नव्हता. पण अमरावतीला

सहकुटुंब परत येणं आवश्यक होतं. मग मला 15 एप्रिल 2006 ला नागपूर हून आमचे चेअरमन रिलीव्ह करणार होते. 14 एप्रिल ला मला तिथल्या मॅनेजमेंट व सर्व प्राध्यापक, सर्व सहकारी कर्मचाऱ्यांनी सेंडऑफ दिला. तो ही माझ्या कायम आठवणीत आहे. 14 तारखेला संध्याकाळी सेंड-ऑफ च्या वेळी स्टेजवर महाराष्ट्र राज्य तांत्रिक शिक्षणाचे सलग बारा वर्षे संचालक राहिलेले व नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू माननीय डॉक्टर बी.बी. चोपणे, आमचे चेअरमन श्री सुनीलजी रायसोनी, त्यांच्या सौभाग्यवती व मी आणि माझी पत्नी प्रेमलता, मी ज्यांना प्राचार्यपद सोपवणार होतो ते आमचे प्राध्यापक तारणेकर( ते नागपूर व्हि.आर.सी.ई.मधून सेवानिवृत्त झाल्यानंतर आमच्यकडे विद्यूत विभागाचे प्रमुख होते.)

डॉक्टर प्रिती बजाज,विभाग प्रमुख इलेक्ट्रॉनिक्स, असे सात आठ जण स्टेजवर होतो. हॉलमध्ये जवळ-जवळ चारशे प्राध्यापक व सपोर्टिंग स्टाफ, ऑफिस स्टाफ, थोडे विद्यार्थी प्रतिनिधी अशी उपस्थिती होती. माझ्या त्या सेंड ऑफ मध्ये जवळ जवळ आठ जण बोलले. माझी स्तुती, माझं कौतुक यांचा वर्षाव झाला. पण माझ्या डोळ्यात पाणी आणलं ते शेवटी बोलणाऱ्या आमचे चेअरमन सुनीलजी रायसोनी यांनी. ते म्हणाले “ गेल्या चार साडेचार वर्षात आपल्या महाविद्यालयाने अभूतपूर्व उंची गाठली. प्रगती केली. नाव कमावलं. ते केवळ जाजूसरांच्या मेहनतीनं.

त्यांनी घेतलेल्या श्रमानं. ते पुढे म्हणाले आपल्या कॉलेजचे वय फक्त सहा वर्षाचं असताना, आपण फक्त दोन ग्रॅज्युएशनच्या बॅचेस बाहेर काढल्या असतान्ना सरांनी आपल्या कॉलेजच्या अँक्रिडिटेशन साठी अर्ज केला. अवघ्या चार महिन्यात त्यांनी त्याची तयारी केली आणि त्या आलेल्या इन्स्पेक्शन कमिटीसमोर खूप मेहनतीने सगळं सादर केलं. आणि त्यांच्या मेहनतीला फळ आलं. इन्स्पेक्शन होऊन कमिटी जायच्या दिवशी, कमिटीचे चेअरमन शेवटी आम्हा सर्व प्राध्यापक व मॅनेजमेंटच्या लोकांना फीडबॅक देण्यासाठी उभे राहिले, तेव्हा त्यांनी पहिलंच वाक्य जे उच्चारलं ते असं “Looking at the age of this college,these people have done meracles in six years.’ आणि शेवटी कमिटी जाऊन एका महिन्याच्या आत आपल्या कॉलेजला तिन्ही कोर्सेसना अ‍ॅक्रेडिटेशन मिळालं.We are the youngest in India to get accreditation.I request all, to give standing ovation to Dr.jajoo.” सर्व हॉल मधले लोक टाळ्या वाजवत उभे राहिले. चोपणे साहेब हे माझे गुरु, माझे मेंटर होते, तेही टाळ्या वाजवत उभे राहिले. शेवटी रायसोनी सरांचा गळा दाटून आला. डोळ्यात पाणी आलं. आणि त्यांच्यानी बोललं जाईना. “ डॉक्टर जाजू इज फादरली फिगर टू मी” असं दाटलेल्या कंठानं बोलत ते आपल्या जागेवर जाऊन बसले.हॉलमध्ये गंभीर वातावरण झालं. माझ्या

आणि माझ्या बायकोच्या डोळयात पाणी आलं. नंतर उत्तरादाखल जेव्हा मी बोलायला उठलो तेव्हा मी जी सुरुवात केली ती अशी----

" सर्वांना अभिवादन करतो. वातावरण थोडं गंभीर झालं म्हणून आज प्राध्यापक तारणेकरांसाराखं विनोदी घाटात सुरुवात करायचं मी ठरवलंय. ल्युबीश आयरिश नावाच्या एका इटालियन नाटककाराच्या एका नाटकातलं एक पात्र मरतं आणि स्वर्गात जातं. स्वर्गात पोहचल्यावर तिथला द्वारपाल त्या पात्राला विचारतो "काहो,आपण मेलो हे एक्झॅक्टली तुम्हाला केव्हा कळलं?" ते पात्र म्हणतं " गेले दोन-तीन महिने मी आजारी होतो. हॉस्पिटल मध्ये भरती होतो. रोज हॉस्पिटल मध्ये मला भेटायला कधी माझे नातेवाईक तर कधी माझे मित्र, सहकारी यायचे. एक दिवस असं झालं की माझ्या पलंगा भोवती बरेच मित्र, बरेच नातेवाईक,जमा झालेले आहेत असं मला वाटलं.अन काही कारण नसताना प्रत्येक जण माझी स्तुती करायला लागला. त्या क्षणी मला वाटलं बहुदा आपण मेलो."

मी पुढे म्हटलं 'मलाही आज थोडंसं तसंच वाटायला लागलं आहे. पण मला खात्री आहे की, मी आयरिश च्या नाटका मधलं ते पात्र नाही. इथे ज्या भावना तुम्ही सर्वांनी माझ्याबद्दल व्यक्त केल्या, त्या मनापासूनच्या आहेत." मी त्यादिवशी जवळजवळ 35 मिनिटं बोललो. मॅनेजमेंट पासून सर्व प्राध्यापक मित्र ऑफिसचे सहकारी इतर सपोर्टिंग स्टाफ या सगळयांचे

त्यांच्या सहकार्याबद्दल आभार मानले. काहींचा आवर्जून उल्लेख केला. काही गमती जमती चे अनुभव सांगितले.अँक्रीडिटेशन बद्दल रायसोनी साहेबांनी मला दिलेलं क्रेडिट हे माझं एकट्याचं नसून ते तुम्हा सर्वांचा आहे, असं नम्रपणे सांगितलं. महाविद्यालयानं जी यशाची मजल मारली त्यात तुम्हा सर्वांचाच महत्त्वाचा वाटा आहे, मी फक्त कॅप्टन होतो, खेळले तुम्हीच असं पुन्हा नम्रपणे सांगितलं. रायसोनी साहेबांच्या भाषणानंतर माझा व माझी सौभाग्यवती, प्रेमलता चा सत्कार करण्यात आला. तो अतिशय हृदयस्पर्शी व कधीही विसरता येणार नाही असा होता. माझ्या भाषणाचा शेवट करताना मी म्हणालो “मी आयुष्यात माझ्या तत्वांशी प्रामाणिक राहिलो, माझी मूल्य मी जोपासली. जिथे गेलो तिथे मी माणसं जोडत गेलो. प्रामाणिकपणे काम केलं. मी नेहमी स्वतःसाठी काम केलं. आपण नेहमी स्वतःसाठी काम करावं. मग आपण ते प्रामाणिकपणे आणि मनापासून करतो. काम जर चेअरमन, डायरेक्टर, बॉस, साहेब, प्राचार्य यांच्यासाठी किंवा यांच्या भितीने केलं तर ते दडपणाखालचं काम असतं. ते मनापासून नसतं. तुम्ही हे असं मनापासून काम करावं, आपली मुल्यं जोपासावी अशी माझी विनंती आहे. शेवटी म्हणालो----

“ मेहरबां होके मुझे बुला लो चाहे जिस वक्त, मै गया वक्त नही हू की फिर आ भी न सकू ”

अत्यंत अविस्मरणीय असाहा सेंड ऑफ होता. त्या सेंड-ऑफ च्या 80 मिनिटाच्या दोन सी.डी.ज माझ्याजवळ अजूनही आहेत. अधून-मधून माझी मुलं त्या सीडी लावतात. 15 एप्रिल 2006 आम्ही दोघे रात्री अमरावतीला पोहोचलो अन 17 लाच् मी हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचा प्राचार्य म्हणून रुजू झालो. 16 एप्रिल रविवार होता. रविवारी सकाळी अकरा वाजता नागपूरहून मला बिहाडे साहेब जे पूर्वी मंत्रालयात आमच्या टेक्निकल एज्युकेशनचे जॉईंट सेक्रेटरी होते, आणि आता नागपूरला होते, ह्यांचा फोन आला. फोनवर ते म्हणाले “ जाजू साहेब तुमच्या सेंडऑफ बद्दल काल कळलं. तुमच्या सेंड ऑफ मध्ये तुमचे चेअरमन रायसोनी साहेब, यांच्या डोळयात पाणी आलं असं मी ऐकलं. सर, तुम्हाला आतापर्यंत महाराष्ट्र सरकारचा आदर्श शिक्षक पुरस्कार, दिल्लीच्या इंडियन अचिव्हर्स फाउंडेशन ह्या संस्थेचा शिक्षा भारती पुरस्कार, भोपाळ एम इ एस ग्रुपचा डॉक्टर सी व्ही रामन पुरस्कार, उत्कृष्ट रिसर्च पेपर बद्दल इंस्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स इंडिया -कलकत्ता यांचा पुरस्कार, असे अनेक अवॉर्डस मिळाले आहेत. पण सर हे प्रायव्हेट कॉलेजेस राजकारणी लोकांचे, बिजनेस वाल्यांचे आहेत. त्यांच्याकडे एक प्रिंसिपल गेला की दुसरा येतो. त्यांना त्याचं काय? पण रायसोनी सारख्या माणसाच्या, बिझनेसमन च्या डोळयात पाणी यावं, त्यांना तुमच्या जाण्याची हळहळ वाटावी, हा तुमच्या जीवनातला सर्वात मोठा पुरस्कार. अभिनंदन

सर. “ बिहाडे साहेबांच्या त्या बोलण्यानं परत एकदा माझ्या डोळ्यात पाणी आलं. असे हे सेंडऑफ. आपण प्रामाणिकपणे काम करत गेलो तर देव आणि दैव इतके उदात्त अन उदार आहेत की आपल्या कामाची फळं ते आपल्याला देतातच.

# अमरावतीची समृद्ध संस्कृती

2016च्या रविवार दिनांक तीन जानेवारीला संध्याकाळी साडेसहा वाजता अमरावतीला विमलताई देशमुख सभागृहात प्रख्यात लेखक राजन खान यांचं व्याख्यान होतं. "आम्ही सारे फाउंडेशन" च्या तर्फे हे व्याख्यान आयोजित करण्यात आलं होतं. राजन खान यांची बरीच पुस्तकं मी वाचली आहेत, विशेषता त्यांचे कथासंग्रह. त्यांच्या विविध विषयावरच्या हृदयस्पर्शी कथा, त्यांची उत्कृष्ट लेखन शैली, त्यांच्या कथे मधील मनोरंजता या गोष्टींनी त्यांचे कथासंग्रह वाचकांच्या मनाची पकड घेतात. त्यांना वक्ते म्हणून त्यांचं भाषण ऐकण्याचा माझा हा पहिलाच प्रसंग होता. त्यांच्या अमोघ वक्तृत्वाचा व ओजस्वी वाणीचा पहिल्यांदाच प्रत्यय आला. त्यांचे भाषेवरील प्रभुत्व त्यांच्या लेखणीतून जाणवतंच पण त्यांच्या वाणी वरून काल त्याचा प्रत्ययही आला. त्यांची व्याख्यान शैली, साहित्य प्रचूर भाषा, त्यांच्या आवाजातले चढ उतार, अगदी श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणारे होते. "खरच माणसं कट्टर असतात?" या विषयावर त्यांची मतं त्यांनी अगदी परखडपणे आणि अत्यंत पारदर्शी भाषेत मांडली. त्यांनी मधून मधून काढलेल्या चिमट्यान्नी आणि ओरखडयांनी बरेच वेळा श्रोत्यांमध्ये

खसखस पिकली. त्यांनी पोटतिडकीनं आणि काही वेळा सात्विक संतापानं मांडलेली त्यांची मतं अंतर्मुख करणारी होती. माणूस कट्टरधर्मी नाही, कट्टर प्रेमीही नाही, एवढंच काय, अनेक वृद्धाश्रमात राहणाऱ्या आजच्या माता-पित्यांना पाहिलं तर माणूस कट्टर पुत्र- पुत्री प्रेमी ही नाही, (मुलगा-मुलगी ही नाही). हे त्यांनी अतिशय परखडपणे सांगितलं. माणूस आयुष्यभर ढोंग करत स्वतःची फसवणूक करत जगत असतो. स्वतःची प्रतारणा करत असतो. आपल्या स्वतःच्या धर्मानं बांधून दिलेले नियमही तो पाळत नाही. मनापासून प्रेम करत नाही. मनापासून भक्ती करत नाही. इतकेच काय द्वेषही तो कट्टर पणे करत नाही. त्यांच्या या अमोघ वक्तृत्वानं त्यांनी अडीच तास श्रोत्यांना मंत्रमुग्ध केलं. त्यांच्या व्याख्यानाचा उहापोह करणारा माझा हा लेख नाही. मी साहित्यिक नाही आणि समीक्षकही नाही. त्यामुळे व्याख्यानाचा आढावा हा माझा प्रांत नाही. एक सामान्य श्रोता म्हणून मला जे वाटलं ते मी लिहिलं.

मला खरं लिहायचं ते अमरावतीच्या समृद्ध संस्कृतीबद्दल. श्रोत्यांबद्दल. राजन खान यांच्या व्याख्यानाला विमलताई देशमुख सभागृहात पाय ठेवायला जागा नव्हती. एवढेच नव्हे तर जेवढे लोक हॉलच्या आत मध्ये बसलेले होते जवळ जवळ तेवढेच मागे व बाहेर उभे होते. मला तर वाटतं उभं राहायलाही जागा नसल्यामुळे किंवा आपलं वाहन पार्क करायला जागा नसल्यामुळे अनेक श्रोते परतून गेले असावेत.

व्याख्यानानंतर आपलं वाहन बाहेर काढायला लोकांना तिस-तिस मिनिटं थांबावं लागलं. आणि श्रोते मंडळीत पुरुष, स्त्रिया, आमच्यासारखे ज्येष्ठ नागरिकच नव्हे तर अनेक तरुण वयातले श्रोतेही होते. आजच्या या धकाधकीच्या, फेसबुक- व्हाट्सअप च्या, दूरदर्शनच्या जीवनात हा एवढा प्रचंड श्रोतृ समुदाय भाषण ऐकायला येतो व अडीच तास ते भाषण ऐकतो, हे अमरावतीच्या समृद्ध संस्कृतीचं द्योतक आहे. अमरावतीचा श्रोता, अमरावतीचा रसिक खूप जाणकार आहे अशी पावती मातब्बर कलाकारांकडून व वक्त्यांकडून अमरावतीला मिळाली आहे.

खरंच संगीत कलोपासक मंडाळाचे कार्यक्रम असोत, की मी वर म्हटल्याप्रमाणे प्रख्यात वक्त्यांची भाषणे असोत, अमरावतीचा रसिक श्रोता उपस्थित असतो. आमची ही परंपरा अनेक वर्षापासूनची आहे. आजच्या या धकाधकीच्या युगातही कायम आहे. पुण्या-मुंबईलाही या युगात इतका प्रचंड रसिक समुदाय सापडायचा नाही. हल्ली मी पुण्यातच राहतो. मधून मधून दहा पंधरा दिवस अमरावतीला असतो. नाळ तुटत नाही. परवा पुण्याला औंध मध्ये पंडित भीमसेन जोशी सभागृहात एक छोटेखानी साहित्य संमेलन झालं. ते मी पाहिलं, ऐकलं आणि म्हणून आज अमरावतीच्या रसिक समुदायाला दाद देण्यासाठी हे लिहितो आहे. गेली तीन वर्षे स्वर्गीय बाळासाहेब मराठे यांच्या स्मृतीत दैनिक हिंदुस्थानची जी

व्याख्यानमाला होते, त्यातली व्याख्यानं मी आवर्जून ऐकतो व पुन्हा पुन्हा मला हाच प्रत्यय येतो.

मला खूप जुने दिवस आठवतात. 1961-63 चे दिवस. त्यावेळी मी विदर्भ महाविद्यालयाचा दोन वर्षे विद्यार्थी होतो. पुढे अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबादला शिकायला गेलो. ती मागची दोन वर्षे आणि पुढे 1966 पासून ते 1975 पर्यंत मी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती येथे प्राध्यापक असताना व पुढे एकूण 1984 ते 1997 या काळात परत अमरावतीला असताना, अनेक वक्त्यांची भाषणंमी ऐकली आहेत. पूर्वी दीपार्चन,राठीसभागृह, विदर्भ महाविद्यालय येथे ही भाषणं व्हायची. ती पर्वणीच असायची अमरावतीच्या श्रोत्यांसाठी. त्या काळात मी माझे मित्र प्राध्यापक मुकुंद गोखले, प्राध्यापक पेचे, प्राध्यापक वि.ल. जोशी आम्ही सर्व मिळून बाळशास्त्री हरदास, वाचस्पती विष्णुशास्त्री क्षीरसागर, प्राध्यापक राम शेवाळकर, प्राध्यापक शिवाजीराव भोसले, मामासाहेब वरेरकर, वि.आ. बुवा प्राध्यापक वामन चोरघडे व पद्माकर डावरे अशा अनेक अमोघ वक्तृत्वाचे धनी असलेल्या वक्त्यांची भाषणं आम्ही ऐकली आहेत. तेव्हाही रसिक श्रोत्यांची अशीच गर्दी असायची. आजही ती असते हे विशेष. या समृद्ध संस्कृतीचे बीज आमच्या महाविद्यालयीन जीवनात रुजवलं गेलं. आम्हाला विदर्भ महाविद्यालयात सिनियर असलेले प्राध्यापक बी टी देशमुख प्राध्यापक सुरेश पाध्ये तेव्हाच्या उषा ठाकूर (नंतर

झालेल्या उषा तांबे) राजेश्वरी सिन्हा, बबन तोटे हे विद्यार्थी दशेतील उत्कृष्ट वक्ते होते. मला आठवतं, 1961 साली जे चिन्चं आक्रमण झालं भारतावर, त्यावेळी सैनिकांसाठी निधी जमवण्या करता, विदर्भ महाविद्यालयाच्या जीऑग्राफी डिपार्टमेंट मध्ये विद्यार्थ्यांची एक मोठी सभा आयोजित केली होती. त्यात सात आठ विद्यार्थी व प्राध्यापक बोलणार होते. पण तिसऱ्या व चौथ्या क्रमांकावर बी टी देशमुख, सुरेश पाध्ये यांची भाषणं झाली. ही भाषणं इतकी उत्तेजन पूर्ण झाली की त्यांची भाषणे झाल्यानंतर अनेक तरुण विद्यार्थी विद्यार्थिनींनी आपल्या हातातल्या सोन्याच्या अंगठ्या, बांगड्या, गळ्यातील सोन्याची चेन, काढून त्या समोर टेबलावर ठेवल्या. कोणी खिशात असतील नसतील ते सर्व पैसे काढून टेबलावर ठेवले. अशा या देणग्यांचा ढिग लागला.इतकी हृदयस्पर्शी भाषणं झाली की पुढच्या वक्त्यांना बोलायची गरजच पडली नाही. असे हे आमचे सीनियर्स. त्यावेळी नातू बाई आम्हाला फर्स्ट इयर बीएस.सी ला मराठी साठी रेव्हरंड टिळकांचं वनवासी फूल हे खंड काव्य शिकवायच्या. सायन्सचे विद्यार्थी असून सुद्धा आम्ही नातूबाईचे, प्राध्यापक उषाताई नाफडे, पुष्पाताई कुर्हेकर यांचे वर्ग 100% उपस्थितीने करायचो. मला आठवतं, चिनी आक्रमणाच्या वेळी नातूबाईंनी एक दिवस मनोहर कवीश्वर यांना महाविद्यालयात बोलावलं. आणि समोर मोठ्या बगिच्यात आम्हा सर्व विद्यार्थ्यांना ऐकायला

बोलावलं. मला कविश्वरांचं ते नुसता डग्गा वाजवत म्हटलेलं गाणं किंवा कविता अजूनही आठवते.

“लई झालं बरं कुठसा येशीन,

तुम्ही म्हणा चीन, पण मी म्हणतो कुचिन.

हे पाह्य बाबू,अजाबू न सायबू,

घरचं पाहतो मी, लढाईवर जाय तू.

आणि मग शेवटी आम्ही सर्वांनी जमा केलेली वर्गणी आठवते. विदर्भ महाविद्यालयात असतानांच अनेक वक्तृत्व स्पर्धा ऐकायला व भाग घ्यायला मिळाल्या.त्यावेळी प्राध्यापक शंकर वैद्य, प्राध्यापक के. जे. पुरोहित( शांताराम ),प्राध्यापक विजया जोशी (त्यावेळच्या. आता त्या प्राध्यापक विजयाताई डबीर झाल्यात) यांची भाषणे आम्ही आवर्जून ऐकायचो. मजा यायची. अमरावतीत झालेली अनेक मराठी व हिंदी कवी संमेलनं ही आम्ही ऐकली आहेत. विशेष करून विदर्भ महाविद्यालयातील, राज महाविद्यालयातील( म्हणजे आत्ताचं लाहोटी विद्यालय), जोशी सभागृह प्रांगण, येथे झालेली हिंदी कवी संमेलन तर आम्ही रात्री नऊ वाजेपासून सकाळी चार चार वाजेपर्यंत ऐकली आहेत. त्यातली प्रसिद्ध हिंदी कवी हरिवंशराय बच्चन, नीरज, सोम ठाकूर, ओमप्रकाश आदित्य, माणिक वर्मा, काका हाथरसी, निर्भय हाथरसी, शैल चतुर्वेदी अजूनही

आठवतात. याव्यतिरिक्त कलोपासक मंडळाचे संगीताचे कार्यक्रम, गणेश उत्सवात खास करून रेल्वे मंडळाच्या गणेश उत्सवात श्री सावरकर साहेबांनी आमंत्रित केलेल्या अनेक नावाजलेल्या गायकांच्या मैफिली, मला अजूनही आठवतात. त्यात परवीन सुलताना, जितेंद्र अभिषेकी, प्रभाकर कारेकर, योगिनी जोगळेकर, प्रभा अत्रे,लक्ष्मण प्रसाद आणि दशरथ प्रसाद जयपुरवाले, सुदर्शन अधिकारी, हलीम जाफर, पंडित किशन महाराज, अशी अनेक मातब्बर मंडळी व कलाकार अमरावतीला आलेले आम्ही पाहिले-ऐकले आहेत. माझ्यासारख्या अनेकांच्या संस्कृतीची ही पाळंमुळं अमरावतीच्या संस्कृतीत आहेत. ह्यातून अमरावतीचा असा रसिक श्रोतृवृंद निर्माण झाला नसता तरच नवल. जीते रहो अमरावती. ही प्रथा चालू ठेवा. आतापर्यंत ती चालू आहे.

आम्हाला मिळालेला हा वसा ही गोडी आम्ही जोपासून ठेवली. आयुष्यभर अभियांत्रिकीच्या अवजारांशी आणि यंत्रसामग्रीशी लग्न लागलेल्या माझ्यासारख्या अनेक मित्रांनी हे छंद जोपासले आहेत. अन त्यांनी आम्हाला किती आनंद दिला, किती विरंगुळा दिला, हे शब्दात सांगता यायचं नाही. ते अनुभवावयाच लागेल. राजन खान यांच्या व्याख्यानाला बरीच तरुण मंडळी होती. खूप बरं वाटलं. अमरावतीची ही समृद्ध संस्कृती तरुण पिढी ही टिकवते आहे याचा मनापासून आनंद झाला. जे तरुण काही कारणांनी या आनंदाला मुकतात किंवा व्याख्यानाची आवड

नसल्याने हजर राहत नाहीत त्यांना आवर्जून सांगावसं वाटतं की तींन तास बाजीराव मस्तानी किंवा दिलवाले दुल्हनिया पाहूनही जेवढा आनंद मिळणार नाही त्यापेक्षा जास्त आनंद दीड दोन तासाच्या ह्या प्रख्यात वक्त्यांची व्याख्यानं ऐकल्याने मिळतो. एवढेच नव्हे तर महिनेन महिने त्याची आठवण राहते. दीर्घ आनंदाची खरी प्रचिती आपल्याला होते. ती अनुभवा. माझ्या अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना सांगावसं वाटतं की तुम्ही इतरांपेक्षा जास्त व्यस्त असता, हे गेल्या पन्नास वर्षाच्या माझ्या अनुभवावरून मला माहित आहे. तरीपण वेळ मिळतो. त्या वेळेचा सदुपयोग करण्यासाठी चांगले छंद जोपासा. तुमच्या यंत्रवत जीवनात ते पुढं फार आनंददायी ठरतील. चांगली पुस्तकं, चांगलं साहित्य वाचणं हा ही एक मोठा आनंददायी छंद आहे. मग ते साहित्य कोणत्याही भाषेत का असेना इंग्रजी, हिंदी, मराठी सर्व भाषांमध्ये उत्कृष्ट साहित्य उपलब्ध आहे.

मी तर नेहमी मोठ्या अभिमानाने म्हणतो की आमचे अभियांत्रिकीचे विद्यार्थी कलेतही कोणत्याही प्रकारे मागे नाहीत. उलट आघाडीवरच असतात. मग ते संगीत असो नृत्य असो अभिनय असो चित्रकला असो की वक्तृत्व असो. सर्व क्षेत्रात आमचे विद्यार्थी नावाजलेले आहेत. अनेक इंजिनियर्सची नाव या वेगवेगळ्या प्रांतात नाव कमावणारी म्हणून देता येतील. अगदी आता आताच सांगायचं असेल तर मराठी चित्रपटात सध्या गाजत असलेला व हिंदी चित्रपटातही आपलं नाव काढत असलेला वैभव

तत्ववादी हा पुण्याच्या गव्हर्नमेंट इंजिनीरिंग कॉलेज मधून पास झालेला इंजिनियर आहे. त्याचे वडील अमरावतीच्या गव्हर्नमेंट इंजिनीरिंग कॉलेजचे विद्यार्थी होते.

मला अमरावतीच्या ह्या संस्कृतीचा सार्थ अभिमान आहे, आणि मला खात्री आहे की अमरावतीची ही संस्कृती तरुण मंडळी जोपासतील. अजूनही अमरावतीला वेगवेगळया व्याख्यानमाला चालू असतात. त्यात राठी सभागृहात होणाऱ्या आणि कैलासवासी बाळासाहेब मराठे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दैनिक हिंदुस्थान तर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या व्याख्यान मालिकेचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. अंबा उत्सवात होणारे कार्यक्रम किंवा दिवाळीच्या वेळी दिवाळी पहाट, पाडवा पहाट ला होणारे भरगच्च सांस्कृतिक कार्यक्रम गायन वादन नृत्य हे अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे असतात या सगळया कार्यक्रमांना तरुण मंडळी नं आवर्जून हजेरी लावली पाहिजे. या कार्यक्रमांचा आस्वाद घेतला पाहिजे व अमरावतीकरांचा हा वसा जोपासला पाहिजे. नाट्य क्षेत्रातही अतिशय चांगला अभिनय करणारी दिग्दर्शन करणारी मंडळी अमरावतीत आहेत. आज राज्य पातळीवर होणाऱ्या राज्य नाट्य स्पर्धेत आणि कामगार कल्याण यांच्या होणाऱ्या नाट्य स्पर्धांमध्ये कितीतरी वेळा अमरावती करांनी बक्षिसे मिळवली आहेत. एवढेच काय महाविद्यालयांची जी स्नेहसंमेलन व्हायची त्यात दरवर्षी तीन अंकी नाटक व्हायचं. मला आठवतं विदर्भ महाविद्यालयात

दोन वर्षे शिकत असताना आणि पुढे अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम करताना मी विदर्भ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केलेली बरीच नाटकं पाहिली आहेत. अत्यंत उत्तम प्रकारे सादर केलेली तुझ आहे तुझपाशी, साष्टांग नमस्कार ही नाटकं माझ्या चांगलीच स्मरणात आहेत. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात मी दिग्दर्शित केलेली मुंबईची माणसं, वाजे पाउल आपले, वरचा मजला रिकामा, काका किशाचा, पई पई आणि पै तसेच प्राध्यापक रमेश लोंढे यांनी दिग्दर्शित केलेली खून पहावा, करून मोरूची मावशी आणि आणखी काही नाटकं आमच्या अभियांत्रिकी च्या मुलांनी व्यवसायिकांच्या तोडीस तोड अशी केली. ती पाहायला अमरावती मध्ये बरीच रसिक मंडळी यायची. माझ्या विश्राम बेडेकर लिखित वाजे पाउल आपले हे नाटक पाहायला नागपूरहून गणेश नायडू रमेश अंभईकर, शंकरराव मगर इत्यादी नागपूरचे नाट्य क्षेत्रातले मातब्बर लोक आले होते. या आमच्या नाटकाला खोलकुटे धाल स्पर्धेत दुसरं बक्षीस मिळालं होतं व उत्कृष्ट अभिनयाची दोन बक्षीसं माझे विद्यार्थी सुरेश मगरकर आणि विनोद नागोरी यांना मिळाली होती. इतकं उत्कृष्ट ते नाटक झालं होतं. आमचे त्यावेळची प्राचार्य देशपांडे यांनी लिहिलेलं देवाघरची वाट हे नाटकही आम्ही आमच्या संमेलनात केलं होतं. त्याचा विषय थोडा वेगळा होता आणि स्पेस रिसर्च शी संबंधित होता. त्यात फटाफट बदलून दाखवायचे बरेच सीन्स होते. उदाहरणार्थ शेठजी चा

दिवाणखाना नंतर एकदम त्यांची बाग नंतर अपोलो ची प्रयोगशाळा नंतर कुठे बस स्टॉप या सर्वासाठी आम्ही आमच्याच महाविद्यालयातील कर्मशाळेत फिरता रंगमंच तयार केला होता व तो अत्यंत यशस्वीरीत्या आम्ही आमच्या कॉलेजमध्ये वापरला. मला वाटतं अमरावतीत तयार केलेला आणि वापरलेला तो पहिलाच फिरता रंगमंच होता. अशा अनेक गोष्टींची जाता जाता आठवण झाली. अमरावतीच्या समृद्ध संस्कृतीचाच हा एक भाग होता. आज कालच्या या डिस्को, इंडियन आयडॉल वगैरेसारख्या कार्यक्रमांच्या भाऊगर्दीत अमरावतीकर तरुणांनी ही नाट्यपरंपरा सुरू ठेवावी अशी माझी हार्दिक इच्छा आहे आणि त्यासाठी मी त्यांना शुभकामना देतो.

# मी आणि माझे विद्यार्थी

1965- 66 ला मी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबादला फायनल इयर मेकॅनिकल चा विद्यार्थी असतानाचा एक प्रसंग आठवतो. प्राध्यापक सी. बी. देशपांडे म्हणून आमचे एक चांगले प्राध्यापक आम्हाला फायनल इयरला इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजी हा विषय शिकवायचे. ते खूप चांगले शिकवायचे विद्यार्थ्यांशी मित्राप्रमाणे वागायचे. एक दिवस त्यांचा एक टॉपिक संपल्यानंतर, त्यांनी वर्गात सांगितलं की पुढचा टॉपिक मी शिकवीन पण त्याच्या पुढचा टॉपिक तुमच्या वर्गातले पाच विद्यार्थी शिकवतिल. प्रत्येकाने रोज एक तास शिकवायचं. अजून आठ दहा दिवस वेळ आहे. तेव्हा हा टॉपिक तुम्ही पाच जण आपापसात वाटून घ्या व तयारीला लागा. त्यांनी वर्गातल्या नियमित अभ्यासू अशा पाच विद्यार्थ्यांची निवड केली. त्यात मीही एक होतो. मग आम्ही पाच जणांनी आपल्या परीने तो टॉपिक वाटून घेतला व आपापल्या नोट्स काढायला आणि तयारीला लागलो. रोज एकच जण तास घेणार होता व स्वतः देशपांडे सर विद्यार्थ्या मध्ये बसून ऐकणार होते' आम्ही पाचही जणांनी पाच दिवस आपला टॉपिक चांगला शिकवला. त्याच्या त्या वेली देशपांडे सर तास झाल्याबरोबर

आमचा परफॉर्मन्स कसा झाला हे सांगायचे. मला आठवलं ज्या दिवशी माझा तास होऊन मी आपल्या जागेवर येऊन बसलो तेव्हा देशपांडे सर उठून प्लॅटफॉर्म वर जाण्याआधी माझ्याजवळ आले. माझी पाठ थोपटून म्हणाले ‘जाजू तू एक चांगला शिक्षक होशील. आणखी मेहनत घे.’

9 जून 1966 ला आमचा फायनल चा निकाल लागल्यानंतर आठ-दहा दिवसातच मला दोन नोकऱ्या मिळाल्या. एक कलकत्ता येथील हिंदुस्थान मोटर्स( ॲम्बेसेडर कार बनविणारे). येथे ट्रेनिं इंजिनियर म्हणून, दुसरा गव्हर्मेंट कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अमरावती येथे सहाय्यक अधिव्याख्याता म्हणून.. दोन्ही ठिकाणी पगार सारखाच होता. तीनशे रुपये प्रतिमहा.. घरच्यांची इच्छा होती की पुढच्या प्रगतीच्या दृष्टीने कलकत्त्याची नोकरी धराववी’ पण मला शिकविण्यात खूप इंटरेस्ट होता व मला प्राध्यापकच व्हायं होतं म्हणून मी अमरावतीच्या इंजिनिअरिंग कॉलेज ची नोकरी पत्करली. गेल्या पंधरा विस वर्षात मी महाराष्ट्रातल्या अनेक इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये जवळ जवळ 170 टॉक्स फॅकल्टी डेव्हलपमेंट वर दिली आहेत. ह्या प्रत्येक भाषणाच्या सुरुवातीला मी वरची प्रस्तावना सांगून म्हणतो की “I joined this profession by design and not by default I wanted to be a teacher and at the fag end of my career, I am quite contented, composed and happy person who enjoyed his teaching for 35 years.

आणि आज प्रामाणिकपणे सांगतो की रुजू झाल्या दिवसापासून पुढची पस्तीस वर्षे मी अभ्यास करून, मन लावून वर्गात शिकवलं. आता वयाच्या 76 व्या वर्षी जास्त विनयशील न होता नम्रपणे सांगतो की माझ्या हजारो विद्यार्थ्यांच्या फीडबॅक प्रमाणे मी एक चांगला शिक्षक ठरलो. माझ्या या चाळिस वर्षाच्या अनुभवांवर अन हल्लीच्या नवीन प्राध्यापकांना मार्गदर्शक ठरावं असं क्लासरूम टिचींग वरच एक पुस्तक “ From entry to exit- Treatise on classroom experiences” या शीर्षकाच 2009 मध्ये प्रकाशित झालं आहे. बर्याच वाचकान्नी ते पुस्तक वाचलं आहे. त्या पुस्तकाच्या पहिल्या पानावर मी लिहिल आहे

To “ Thousands of my wonderful students who made me a teacher, and to my grand children Aditee and Rachit who made me a student again.”

शिकवणं आणि शिकणं, हे नेहमी बायलॅटरल असतं. ते एकतर्फी नसतंच. जसा शिक्षक चांगला हवा तसे शिकणारे विद्यार्थीही शिकण्यात गोडी असलेले हवेत. मी अत्यंत सुदैवी प्राणी आहे ज्याला आयुष्यभर असे विद्यार्थी मिळाले, मिळत गेले. मला माझे अनेक विद्यार्थी आठवतात. त्यातल्या काही अत्यंत हुशार विद्यार्थ्यांना बद्दल थोडसं लिहितो. ही सगळी

मंडळी आता मॅनेजिंग डायरेक्टर.जनरल मॅनेजर, असिस्टंट जी.एम,चीफ इंजिनीयर, सुप्रीटेंडिंग इंजिनियर अशा मोठमोठ्या पदांवर निवृत्त झाली आहेत. 1966- 67 ला पहिल्याच वर्षी मला शिकवायला दोन विषय देण्यात आले. त्यात माझा प्रि फायनल इयर चा विद्यार्थ्यांचा क्लास अतिशय चांगला व हूशार मुलांचाचा होता. आम्ही दर टर्म मध्ये एक कॉलेजची, प्रत्येक विषयाची तीन तीन तासांची परीक्षा घ्यायचो.मला आठवतं, पहिल्याच टेस्ट चे पेपर तपासायला मी जेव्हा सुरुवात केली त्यात अरुण पांडे ह्या विद्यार्थ्यांचा पेपर हातात घेतला. संपूर्ण सहा चे सहा प्रश्न इतके उत्कृष्ट रितीनं लिहिले होते की एकही मार्क कमी करावासा वाटेना. पण माझंही ते पहिलंच वर्ष व परीक्षक म्हणून पहिलाच अनुभव होता. मग मी त्याला 80 पैकी 78 मारर्क्स दिले. तो अत्यंत हुशार होता. पुढे मोठमोठ्या कंपन्यांमध्ये त्याने उच्च पदं भूषविली. 1973 साली फायनल इयरला आमच्याकडे एन.टी. लोहाणा म्हणून अत्यंत हुशार व तल्लख बुद्धीचा विद्यार्थी होता. जी गणित आम्हा प्राध्यापकांनाही सोडवता यायची नाहीत ती तो अत्यंत सहजपणे सोडवायचा. बरं पुस्तकाचा किडा नव्हता. नेहमी मजेत हसत असायचा. मूळातच बुद्धिमान. 1981 ला बी.ई. मेकॅनिकल झालेला आमचा विद्यार्थी प्रदिप चवरे हा नेहमी माझ्या लक्षात असतो. अत्यंत बुद्धिमान. खरं म्हणजे मी प्रदीप ला फक्त प्रथम वर्षाला शिकवलं. नंतर माझी बदली औरंगाबादला झाली. पण 1981 साली फायनल

झाल्यावर जेव्हा चवरे आय आय टी मुंबईला एम.टेक. करायला आला, त्याच वर्षी मी ही औरंगाबाद हून तिथं पीएच.डी करायला गेलो. तिथे तो माझ्या जवळून संपर्कात आला. तिथे विद्यार्थी आणि प्राध्यापकातही प्रदीपचा बराच दबदबा होता. त्याला मेकॅनिकल च्या कुठलेही विषयातला कुठलाही प्रॉब्लेम दिला की थोडा वेळ विचार करून पुस्तकाची चार पानं पलटवून त्याचं उत्तर तयार असायचं. तो एम.टेक झाल्यावर त्याने मुंबईला गोदरेज मध्ये काही महिने नोकरी केली. पुढे मी ही बऱ्याच ठिकाणी फिरत असल्याने त्याच्या संपर्कात नव्हतो. एकदा काही वर्षांनी तो मला अमरावती ला भेटला. मी म्हणालो "काय चाललय प्रदीप हल्ली? कुठे असतोस? " तो म्हणाला "सर कारंजाला घरीच असतो." मी एकदम ओरडलो. तो म्हणाला "काय करू सर, घरचाच एवढा मोठा कारभार आणि पसारा आहे की तो पाहायला कारंजाला राहणं आवश्यक आहे." पुढे गव्हर्नमेंट इंजीनियरिंग कॉलेज अमरावती स्वायत्त झाल्यावर, प्रदीप आणि मी आम्ही दोघेही त्यांच्या मेकॅनिकल च्या बोर्ड ऑफ स्टडीज वर होतो. तिथे वर्षातून तीन चार तरी भेटी व्हायच्या. तिथे मला तोच बुद्धिमान प्रदीप भेटायचा. अत्यंत इंटेलिजंट. अशा अनेक हुशार व उच्च पद विभूषित माझ्या अनेक विद्यार्थ्यांबद्दल मला लिहिता येईल. ते इंडस्ट्रीत होते, पब्लिक सेक्टर मध्ये आहेत, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्विसेस मध्ये, राजकारणातही आहेत. नुकतेच अकोल्यावरून तिसऱ्यांदा खासदार म्हणून निवड झालेले संजय धोत्रे हे

माझे 1976चे विद्यार्थी आहेत. अनेक विद्यार्थी माझ्या अजून संपर्कात आहेत.पण गेली पंचवीस वर्षे माझ्या सतत संपर्कात असलेला माझा अत्यंत हुशार विद्यार्थी प्रसन्ना शानभाग ह्याच्या बद्दल मला थोडं लिहायलाच पाहिजे. प्रसन्ना व्हीजेटीआय मुंबई येथून डिप्लोमा करून आमच्या कॉलेजला डायरेक्ट सेकंड इयर चा विद्यार्थी म्हणून आला. अत्यंत सामान्य परिस्थितीतून आलेला, अंबरनाथ येथील चाळीच्या घरात वाढलेला, हा साधा विद्यार्थी अत्यंत हुशार. मी सेकंड थर्ड इयर ला त्यावेळी शिकवायचो नाही. फक्त फायनल इयरला दुसर्या टर्म मध्ये दोन विषय घ्यायचो. पण माझ्या इतर प्राध्यापक मित्रांकडून मला प्रसन्न बद्दल बरंच कळायचं. शिवाय मी त्यावेळी विभाग प्रमुख असल्याने, नेहमी विद्यार्थ्यांच्या संपर्कात असायचो. प्रसन्ना फायनल इयरला आला. पहिल्या सत्रात मी त्यांना एक विषय शिकवायचो. एक दिवस माझा पिरेड घेऊन मी माझ्या केबिन मध्ये बसलो. थोड्याच वेळात परवानगी विचारुन प्रसन्ना आत आला आणि म्हणाला

“Sir I do not find your lectures interesting. They are not challenging. You teach for average students in the class. I do not find any thrill in that. मी त्याच्याकडे पाहिले आणि म्हणालो “ You are right. I teach for average students in the class and I have to teach for them only. Clever students like

you do not need much of teaching. They are to be given direction only, and hints on very difficult topics. If you want you come to me once in a week. I will give you some challenging problems and questions.”

त्याचं समाधान झालं. तो विषयात अगदी तयार होता. मला आठवतं आमच्या त्या विषयाची, विद्यापीठाची,प्रात्यक्शिक परीक्षा व्हायची. ओरल एक्झाम ही घ्यावी लागायची. तिला पंचवीस मार्कस होते. परीक्षेसाठी एक इंटरनल एक्झामिनर आणि एक्स्टरर्नल एक्झामिनेर असायचा. माझ्या विषयाच्या Viva ला मी इंटरनल होतो आणि बडनेरा इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राध्यापक एस. जी. पाटील एक्स्टर्नल होते. प्राध्यापक पाटील माझे 1974 च्या बॅचचे विद्यार्थी होते; आम्ही Viva ला सुरुवात केली. प्रसन्ना चा आत येण्याचा नंबर आला तेव्हा तो आत येण्यापूर्वी प्राध्यापक पाटलांना मी म्हणालो “ आता आत येणाऱ्या विद्यार्थ्यांला तुम्ही कोणतेही कठीण,काहीही प्रश्न विचारा. तो आत आल्यावर पाटलांनी त्याला खरंच ठेवणीतले प्रश्न विचारले. प्रत्येक विद्यार्थी बाहेर गेल्यावर आम्ही त्याला 25 पैकी मार्क द्यायचो. प्रसन्ना गेल्यावर मी त्याच्या नावासमोर 25 पैकी 25 मार्क लिहिले.प्राध्यापक पाटील म्हणाले “ Sir can we give 25 out of of 25 in VIVA VOCE exam,?मी म्हणालो “ Patil I cannot give him 27 out of 25 so I have given 25 out of 25.”

इतकी तयारी त्याची होती. पुढे त्या वर्षी तो अंतिम परीक्षेत विद्यापीठातून पहिल्या क्रमांकावर मेरीट मध्ये आला. त्याने एम.टेक साठी फेब्रुवारीला नेटची परीक्षा दिली होती, त्यातही त्याला नाईंटीएट पॉईंट फाइव्ह पर्सेंटाइल होतं. त्याला मुंबई आयआयटीत डिझाईन मध्ये ऍडमिशन मिळाली. तीही उत्तम प्रकारे पास करून त्याने पुण्याच्या जॉमेट्रिक सॉफ्टवेअर या कंपनीत दोन-तीन वर्षे नोकरी केली व पुढे अमेरिकेला गेला. गेली तीस वर्षे तो अमेरिकेतच आहे. तिथे त्यानं दोन तीन कंपन्या बदलल्या. आता तो लॉसएंजलीस ला डीपी सिस्टिम्स या कंपनीत वरच्या पदावर काम करत आहे. तो पास झाल्यापासून आजतागायत सतत माझ्या संपर्कात आहे. गेल्या एक वर्षापासून आमचा संपर्क खूप घनिष्ट झाला. साधारणत: आठवड्याला एक मोठी ई-मेल आमची एकमेकांना होते. अन व्हाट्सअप वर तर जवळजवळ दिवसाआड मेसेजेस असतात. याचं कारण म्हणजे जुलै 2018 मध्ये मी तीन महिन्यासाठी माझ्या मुलाकडे कॅलिफोर्नियात राहायला गेलो. मी गेल्यापासून प्रसन्नाची मला सारखी निमंत्रण येत होती त्याच्याकडे यायची. अन "तुम्ही माझ्याकडे एक दोन दिवसासाठी आलेलं मला चालणार नाही कमीत कमी चार पाच दिवस तुम्ही आमच्या घरी राहायला पाहिजे. मला तुमच्याशी खूप गप्पा करायच्या आहेत. सारं लॉस एंजेलिस तुम्हाला दाखवायचं आहे." त्याच्या आग्रहाखातर मी खरच पाच दिवस मजेत त्याच्याकडे राहिलो. त्यांनं, त्याची बायको नमिता हिनं आणि मुलं

अनिश आणि अर्णव यांनी माझं खूप आदरातिथ्य केलं. मी नऊ सप्टेंबरला त्यांच्याकडे गेलो होतो. नुकत्याच झालेल्या शिक्षक दिनाचं निमित्त साधून त्यांनी सर्वांनी माझा सत्कार केला. मला सात पुस्तक भेट म्हणून दिली. माझे डोळे पाणावले व मला भरून आलं. चार दिवस त्याने मला सगळं लॉस्एंजलीस फिरवलं, दाखवलं. रात्री घरी आलो की परत बारा वाजेपर्यंत गप्पा. मजेत गेले ते पाच दिवस. माझे प्रसन्न हा अत्यंत हुशार,हार्ड कोर इंजिनियरच नाही तर खूप कौतुक करावे असे अनेक त्याचे छंद आहेत. हायकिंग हा त्याचा आवडता छंद. त्यांनी बऱ्याच वेळा तिथल्या सिक्स पॅकेज की काय, ह्या हायकिंग मध्ये भाग घेऊन मोठे मोठाले पहाड चढून पादक्रांत केले. आहेत. त्याला वाचनाची खूप आवड आहे. त्याच्या घरची पुस्तकांनी भरलेली दोन कपाट मी पाहिली. अगदी उत्तम अशी इंग्लिश मराठी साहित्यातली आणि इतर पुस्तके त्यात होती. ती जवळ जवळ सर्व त्याची वाचून झाली होती. तो मराठीत आणि इंग्रजीत ही सुरेख लिहितो. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे तो मराठी हिंदी इंग्रजी भाषेत चांगल्या कविता लिहितो. त्याच्या बऱ्याच कविता मी वाचल्या आहेत. आता आताशा कविता लिहिली की तो मला पाठवतो.ती का व कशी सुचली याची सविस्तर पार्श्वभूमी लिहितो. एका इंजिनिअरिंग मध्ये बुडून गेलेल्या माणसाच्या अशा कविता वाचल्या की अप्रूप वाटतं. अगदी आजच्या

त्याच्या कवितेतल्या खालील काही ओळी किती काव्यात्मक आहेत याची प्रचिती घडवतात

माझे मलाच ठावे हे काय गुंफले मी.
वेड्या मनातले हे जे भाव गुंफले मी'

ही कोणती कहाणी, रचतोस्रे विधात्या,
धारून लेखणीला मन वाहणार आता.
माझे मला कळत कळेना,मन कैसे आवरावे—

शोधून न ही प्रकल्प, कधी ना मला गवसला,
तो अर्थ त्या सुखाचा काव्यातून गवसला.
जे प्राप्त झाले आता कधीना ते हारवावे.---

अशा सुंदर खूप कविता त्यांनी लिहिल्या आहेत. बहुआयामी व्यक्तिमत्व असलेला माझा हा विद्यार्थी आहे. त्यांनी स्वत:ला शून्यातून घडवला आहे. मला माझ्या अनेक विद्यार्थ्यांबद्दल असंच लिहिता येईल. लेखन मर्यादेमुळे ते शक्य होणार नाही. पण अजूनही माझे अनेक विद्यार्थी

माझ्या संपर्कात आहेत. हा मी परमेश्वराचा आशीर्वादच मानतो. त्यामुळे परत एकदा लिहावसं वाटतंय की ‘ I owe a lot to thousands of my wonderful students who made me a teacher. The love, respect they bestowed on me, is a treasure of my life.

# देव सर्वांचाच

बरेच वर्षापुर्वीची गोष्ट आहे. मी एकदा महाराष्ट्र एक्सप्रेसनं बडनेरा वरून पुण्याला चाललो होतो. बडनेर्याला गाडीत आपल्या जागेवर बसलो. तो आषाढाचा महिना होता. आषाढी एकादशी दोन तीन दिवसांवर आली होती. म्हणून पंढरपूरला जाणारे बरेच लोक गाडीत होते. हे सगळे दौंड वर उतरून पुढे गाडी बदलून पंढरपूरला जाणारे होते. माझ्या समोरच्या सीटवर एक 55- 60 वर्षांचे गृहस्थ बसले होते. साधेसुधेच वाटले. थोड्यावेळात आमच्या डब्यात दोन पोलिस आले आणि त्यांनी नम्रपणे त्या समोरच्या गृहस्थांची चौकशी केली. एका पोलिसानं फळं वगैरे आणली होती ती त्यांना दिली. ते म्हणाले अरे कशाला? तर पोलिस म्हणाला असू द्या. प्रवासात लागतील. दुसरा म्हणाला पाणी वगैरे आहे का? ते म्हणाले आहे. गाडी सुटण्याची वेळ झाली तसे ते पोलीस उतरत उतरत म्हणाले ठीक आहे बाबा काळजी घ्या निघतो आम्ही.

गाडी सुरु झाली पुढे अकोल्यालाही एक दोन पोलिस आले. त्या गृहस्थांचची विचारपूस केली परत पाणी वगैरे काही आहे की नाही की आणून देऊ असे एकाने विचारले आणि गाडी निघताना नमस्कार करून

गेले.. पुढे बोलण्या बोलण्यात कळलं की नागपूरला त्यांचा मुलगा पोलीसात वरिष्ठ अधिकारी होता. बहुदा एस.पी. वगैरे. त्यांनी जवळपास सगळ्या स्टेशन वर पोलिसांना हे सांगितले असावं. कारण ते वृद्ध गृहस्थ एकटेच प्रवास करत होते. पुढे भुसावळ आलं तिथे गाडी बराच वेळ थांबली. मग तिथेही परत दोघं-तिघं पोलीस आले आणि थर्मास मध्ये आणलेला चहा त्यांना दिला थोडा वेळ ते डब्यात बसले. त्या वृद्धाचे विचारपूस केली. गाडी सुटण्याच्या दोन मिनिट आधी ते पोलीस उठले त्यातला एक जण म्हणाला " बाबा येतो आम्ही, काळजी घ्या. आणि हो, साधरणत कोपरगाव पर्यंत रात्रीचचे अकरा वगैरे वाजतील. त्या पट्ट्यात खिसे कापण्याचे, सामान उचलून नेण्याचे प्रकार बरेच होतात. त्यामुळे थोडा लक्ष ठेवा बाबा.".

ते गृहस्थ म्हणाले "अरे काय लक्ष द्यायचं. पंढरपूरला जातोय. विठ्ठलाचं नाव घेऊन निघतोय. तोच राखील. तो पोलिस म्हणाला "बाबा ते खरे आहे तुमचं. पण चोरी करणाराही विठ्ठलाचं नाव घेऊनच येतो. अन येताना म्हणतो "देवा आज चांगला हात मारू दे, चांगला माल मिळू दे. तेव्हा बाबा, त्या विठ्ठलाने कोणाचं ऐकायचं? तुमचं की त्याचं? तो पोटापाण्यासाठी चोऱ्या करतो. देव त्याचा बी हाये." गाडी सुटता सुटता त्यांनी परत बाबांना लक्ष द्या म्हणून सांगितलं अन ते उतरले. मी समोर बसून ही सगळी मजा पाहत होतो, ऐकत होतो. आणि मग मला वाटलं खरंच सर्वांची काळजी घेणाऱ्या परमेश्वरानं कोणाची प्रार्थना ऐकायची, ह्यांची की

त्या चोराची? तो ही मनापासून प्रार्थना करून धंद्यावर येतो. वाटलं खरंच जगाचं हे बॅलन्स ठेवताना देवाला किती सर्कस करावी लागत असेल. आणि किती केलं तरी देवाला पाप्यां ची काळजी जास्त घ्यावी लागते. पापी आहेत, वाईट करणारे आहेत म्हणून देवाचं नाव घेणारे पुण्यवान आहेत. सर्वच चांगले असते तर देवाला कोणी विचारल असतं? पूजलं असतं? त्याला सर्वांचे ऐकणं भाग आहे.

एकदा मी सुधांशू महाराजांचं प्रवचन ऐकत होतो. सुधांशू महाराजांचं प्रवचन, त्यांची शैली चांगली आहे. त्यांचा आवाज, उच्चार व बोलण्याची पद्धत श्रोत्यांना खिळवून ठेवते. ते आपल्या प्रवचना दरम्यान अनेक मनोरंजक उदाहरणं देतात. दृष्टांत देतात. त्यामुळे आपलं म्हणणं ते परिणामकारक रित्या श्रोत्यांवर बिंबवतात. असंच, वरच्या संदर्भातलं त्यांनी दिलेलं एक उदाहरण मला आठवतं. ते हिंदीत बोलतात. मधून मधून इंग्रजीही. म्हणून त्यांच्या भाषेत लिहितो--

“ एक दिन राजस्थान के रेगिस्तान में एक ऊंट सवार अपना थोड़ा सा सामान अपने ऊंट के पीठ पर लादकर एक गांव से दूसरे गांव जा रहा था. रेगिस्तान में चलते चलते उसने देखा के रास्ते में एक बूढ़ी औरत अपने सर पर अपनी बड़ी सी गठरी रखकर उसी दिशा में जा रही थी जिसतरफ वह जा रहा था. जैसे ही वह ऊट सवार उस बुढिया के पास आया तो बुढिया बोली “ बेटा किस गांव जा रहे हो?’ वह आदमी बोला मैं फला फला गांव जा रहा

हूं. उसने गांव का नाम बताया तो बुढिया बोली “मैं तेरे वाले गांव से पहले वाले गांव, उधर ही जा रही हूं. बेटा मेरी गठरी थोड़ी भारी है. मुझे चलने में तकलीफ होती है. तुम उधर ही जा रहे हो तो मेरी यह गठरी तुम अपने ऊंटके पीठ पर रख कर ले जाओ. अगले गांव के बाहर ही एक देवी का मंदिर है, वहां मेरी गठरी छोड़ देना. मैं पीछे से धीरे-धीरे आती हूं. आकर मेरी गठरी ले लूंगी. “ वह ऊंटसवार बोला,”मैं मेरे ऊंटपर क्यों तेरे बोझको लादूं? और तुझे पहले नहीं समझा क्या? इतना सामान क्यों बांधा गठरी में?“ ऐसा बोल कर वह सवार आगे तेजी से निकल गया. थोड़ी सी दूर गया होगा तो उसके मन में आया, बुढिया के गठरी में कुछ तो माल होगा. वह दे रही है तो गठरी लेकर चले जाएंगे. वह तो धीरे-धीरे आ रही है. तेजी से आगे जाकर कीमती माल उसके गठरी में से निकाल लेंगे और बाकी गठरी देवी के मंदिर के पास छोड़ देंगे. बुढिया को पता चलेगा तब तक तो अपन कोसों दूर चले जाएंगे.” मन में यह विचार आते ही वह वापस पलटा और बुढीया के पास आकर बोला, “अच्छा लाओ दे दो गठरी. मैं मंदिर पर छोड़ दूंगा.” यह सुनकर वह बुढ़िया बोली ”अब मुझे नहीं देनी है मेरी गठरी. मै खुद ही लेकर चले जाऊंगी.“ वह सवार बोला “क्यों, अभी तो तू बोल रही थी कि तुझे चलने में तकलीफ होती है गठरी के वजह से. तो दे दे. अब क्यों नहीं बोलती है?

वह बुढ़िया बोली “ जिस भगवान ने तुझे यह बुद्धि दी है कि लेले बुढ़िया से गठरी, और उसमें का माल. उसी भगवान ने मेरे कानों में यह कहा

कि, अब इसके मन में बदी आई है. यह तेरा सामान चुराने वाला है. सो अब अगर यह गठरी मांगेगा तो देना मत.”

“ तो भाइयों और बहनों, भगवान को तो संसार का बैलेंस रखना पड़ता है. यह उसका भी सुनता है और इसका भी. एक को कुबुद्धि उसने दियी, तो दूसरे को सुबुद्धि उसने ही दियी. हिसाब बराबर.”

असं असतं परमेश्वराचं. त्याचा हिशेब समजणं अत्यंत कठीण आहे. चार माणसांच्या संसाराचा गाडा चालवताना आपली किती सर्कस होते. मग त्याला तर जग चालवायचं आहे. तो सर्वांची काळजी वाहतो आहे. म्हणून आपल्याला जरी त्यावेळी ते कळत नसलं तरी ज्या ज्या वेळी तो जे जे करतो ते आपल्या भल्यासाठीच करतो, असं मानायचं अन पुढचं पाऊल उचलायचं. काही आढ्य माणसांना, मस्तवाल माणसांना उद्देशून लिहिलेला, प्रसिद्ध उर्दू शायर जौक यांचा एक शेर आठवतो---

जालीमो अपनी किस्मत पे नादां न हो,
दौर बदले गये, वक्त की बात है.
वो यकिनन सुनेगा सदाये मेरी,
क्या तुम्हारा खुदा है, हमारा नही?

थोडासा विनोदाचा भाग म्हणून हे सर्व वरवर पाहता खरं वाटलं तरी, मेट्स लीक ह्या लेखकांनी आपल्या ‘डज गॉड हिअर युवर प्रेयर इन सिन’

या पुस्तकात म्हटल्याप्रमाणे वाईट काम करणारी ही माणसंच असतात. पण त्यांच्यामध्ये सद्गुणांचा, परमेश्वरी इच्छेचा अभाव असतो. सिल्क न पुढे म्हटले आहे की परमेश्वर सर्वज्ञाता आहे. तो सर्वांच्या प्रार्थनेला प्रतिसाद देतो. तो ऐकतो. प्रश्न फक्त आहे की माणूस वाईट काम करताना किंवा पाप करताना जेव्हा देवाची प्रार्थना करतो, तेव्हा देव प्रतिसाद देतो का? तो म्हणतो, आपण जेव्हा पापात असतो तेव्हा देवांच्या गैर मर्जीत असतो. त्यांच्या मर्जीत नसतो. देवानं जर आपल्या प्रार्थनेला हाक द्यायची असेल तर आपण त्याच्या मर्जीत असायला पाहिजे. आपल्या स्वतःच्या मर्जीत नाही. जेव्हा आपण पाप करतो तेव्हा आपण आपली मर्जी चालवतो, देवाची नाही. मग अशात देवानं जरी आपली प्रार्थना ऐकली तरी तिला तो प्रतिसाद देत नाही. पण वाईट काम करणारा ही जर पश्चाताप करत असेल, जर तो देवाची माफी मागत असेल, तर परत देव त्याची प्रार्थना स्वीकारतो. तो शेवटी क्षमाशील आणि दयाळू आहे. खरं म्हणजे वाईट हे चांगल्याचं अवांछनीय अंग आहे. त्याला वेगळं अस्तित्व नाही. ममाणसातल्या चांगल्या गुणातली कमी म्हणजे दुर्गुण. चांगल्याचा अभाव म्हणजे वाईट. तो पुढे म्हणतो चांगला मार्ग धरायचा की वाईट धरायचं हे परमेश्वरानं आपल्यावर सोपवललं आहे. बराच वेळा देवांना आपल्यावर अन्याय केला असा आपल्याला वाटतं. माझंच का असं व्हावं, मीच का, असा आपण टाहो फोडतो. तेव्हा आपण सोयिस्कर पणे हे विसरतो की देवानं बरेच वेळा

इतरांना डावलून फक्त आपल्यावर न्याय केला आहे. परवा सकाळी मला व्हाट्सअप वर एक सुंदर मेसेज आला. तो इंग्रजीत होता. त्याचं भाषांतर मी इथे देतो आहे. त्याचं शीर्षक होतं “मीच का?” जगप्रसिद्ध टेनिसपटू आर्थर अँश (विम्बल्डन पटू) ला त्याच्या एका हार्ट सर्जरी च्या वेळी चुकून इंफेक्टेड रक्त देण्यात आलं. त्यामुळे त्याला आजार झाला. तो आसन्नमरण असताना त्याला त्याच्या हजारो चाहणार्यांचे मेसेज, शुभेच्छा आल्या. काहींनी हळहळ व्यक्त केली. त्यापैकी एकाने लिहिलं की या जीवघेण्या आजारासाठी देवाने तुझीच का निवड केली? त्याच्या उत्तरात आर्थरनीं लिहिलं की, “ पाच कोटी मुलं टेनिस खेळायला लागली. त्यापैकी पाच लक्ष जणान्ना व्यवसायिक टेनिस खेळायला जमलं. त्यापैकी पन्नास हजार सर्किट मध्ये आले. त्यापैकी पाच हजार ग्रँडस्लॅम ला पोहोचले. त्यापैकी 50 विम्बलडनला पोहोचले. त्यापैकी फक्त चार सेमी फायनल ला पोहोचले.त्या पैकी दोन फायनल ला पोहोचले. आणि शेवटी फायनल जिंकून विम्बल्डन कप हातात घेऊन उंचावताना, मी देवाला नाही विचारलं की फक्त मीच का?” कधीकधी परमेश्वराने जे आपल्याला दिलं त्यात आपण समाधानी नसतो. आणि दुसर्या सारखं जगता आलं पाहिजे असं आपल्याला वाटत असतं.

शेतात काम करणारा एखादा मुलगा आकाशात उडणारं विमान पाहतो अन त्यालाही आकाशात उडावं वाटतं आणि त्याच् विमानाचा

पायलट खालचं हिरवगार फार्महाउस पाहून, कधी आपल्या घरी परतून आपल्या फार्महाऊसवर जाता येईल याचं स्वप्न पाहतो. याला जीवन ऐसे नाव. जे मिळालं त्यात मजेत राहा. जर दौलत हे सुखाचं मूळ आणि रहस्य असेल तर श्रीमंत लोकं रस्त्यावर नाचताना दिसली असती. पण फक्त गरीबच मुलं रस्त्यावर नाचताना दिसतात. जर सत्ता,ही सुरक्षित जीवनाचं रहस्य असतं तर व्हीआयपी लोक, राजकारणी, अंगरक्षकांना घेऊन फिरले नसते. जे साधेपणानं राहतात ते सुखाची झोप झोपतात. असं आहे विधात्याचं गणित. अगदी सोपं पण समजायला अतिशय अवघड. आणि अनुसरायला त्याहूनही अवघड’

# दोन मित्र-दोन कवी

माझे दोन जवळचे इंजिनीयर मित्र,कवी आहेत, विनायक जोशी आणि नारायण व्यास. जोशी केमिकल इंजिनियर आयुष्यभर वेगवेगळ्या रसायनांशी खेळत राहिलेला तर नारायण सिव्हिल इंजिनियर आयुष्यभर गिट्टी वाळू लोखंड सिमेंट यांच्याशी खेळत राहिलेला. कोणाचा विश्वास बसणार नाही इतके हे दोघं उत्तम कवी आहेत. जोशी मराठीत लिहितो तर व्यास हिंदीत लिहितो. या दोघांचेही काव्यसंग्रह प्रकाशित झालेले आहेत. जोशीचा 'मुक्तविहग' तर व्यास चा 'मनके पाखी' असे हे त्यांचे काव्यसंग्रह आहेत. जोशीच्या काव्यसंग्रहाची प्रस्तावना मीच लिहिली आहे. ती जशीच्या तशी इथे देतो आहे. व्यासजींनी मला त्यांच्या काव्यसंग्रहाची प्रस्तावना लिहायला सांगितली होती. ती मी लिहिली. पण पुस्तकात त्यांनी आपल्या एका कवी मित्रांनी लिहिलेली प्रस्तावना छापली. कदाचित मी किंचित कवी आणि मूळचा इंजिनियर म्हणून असेल. पण तरी त्यांच्या उत्तम काव्य दर्शनासाठी माझं ते प्रास्ताविक ही मी इथे देतो आहे. इंजिनीयरही इतके चांगले कवी असू शकतात हे आवर्जून सांगावसं वाटतं. हे सगळं

वाचल्या नंतर तुम्हाला पटेल ते. जोशी च्या काव्यसंग्रहाची मी लिहिलेली प्रस्तावना---

“ अभिव्यक्तीची तळमळ “

प्राध्यापक विनायक जोशी हा माझा अनेक वर्षापासून चा जवळचा मित्र. आमच्या मैत्रीला गेल्या जुलै लाच अर्धशतक पूर्ण झालं. विशेष म्हणजे गेली पंचवीस-तीस वर्ष आम्ही एका शहरात राहत नाही. पण आज तागायत आम्ही सतत संपर्कात आहोत. पत्रानं, फोननं. आणि आता व्हाट्सअप आणि मेल. जोशी चं वाचन आणि चिंतन मनन, प्रगाढ. ह्या वाचनाच्या आवडीनं त्यानं भाषेवर प्रभुत्व मिळवलं आहे. अनेक वर्षापासून आपण काही लिहावं असं त्याला वाटत आलं. तसा तो लहान-सहान लेख, परीक्षण, समाचार, कधीकाळी कविताही लिहित गेला. पण गेल्या दीड-दोन वर्षात त्याला काव्य लेखनानं झपाटून काढलं, असं म्हटलं तर अतिशयोक्ती होणार नाही. एक तर खूप वाचन नंतर त्यावर चिंतन, मनन हे इतकं भरून आलं की आपल्या अभिव्यक्तीची वाट शोधत होता तो. शेवटी कवितेच्या माध्यमातून तो हे सगळं व्यक्त करायला लागला. तो जन्मजात कवी नाही. पण साहित्याचा व्यासंग दांडगा. व्यक्त करण्याची तळमळ आंतरिक. खूप रियाज करून जसा एखादा गायक वादक उस्ताद होतो तसं जोशीचं झालं आहे. आपला विश्वास बसणार नाही पण गेल्या दीड-दोन वर्षांच्या कालावधीत त्याने जवळ जवळ शंभर कविता लिहिल्या. पहिल्या

पहिल्यांदा त्या जशा उतराव्या तशा उतरल्या नसतील पण पुढे पुढे त्या अर्थपूर्ण भावपूर्ण व प्रगल्भ होत गेल्या. या कवितांपैकी बऱ्याच त्याने मला फोनवर ऐकवल्या, बऱ्याच मला पोस्टनंही पाठवल्या आहेत. मी काही कोणी साहित्यिक नाही, पण त्याच्या प्रामाणिक प्रयत्नांना रसिकतेची दाद देण्याइतकी काव्याची जाण मला आहे. असं मला प्रामाणिकपणे वाटतं. आणि या प्रेमापोटीच तो हे सर्व लिखाण माझ्याशी शेअर करत आला. मला आठवतं, अगदी सुरुवातीला त्यांनी पाठवलेल्या काही कविता अशा होत्या----

आज मित्राच्या आधारानं एक एक का होईना पण

पायऱ्या चढतो आहे. जीवन सोपान सोपा नाही

किंवा

आधी तोंडातही अमृत होतं ओठातही अमृत होतं.

आता घरच सगळं रितं आहे. सावली पण आपल्याला भीते आहे.

किंवा==

पूर्वी एकाला एक अनुपातात होत होती गुरुदक्षिणा,, आता शेकडो समोर बसतात आणि गुरू लावतो धूनी.

हा विस्तारलेला बाजार पाहताना कष्ट होतात रे

आम्हाला कधीच जमलं नाही हे, हातावर काही घ्यायचं रे.

ह्या ओळी मध्ये खूप काव्य नसेल पण प्रगल्भ निरीक्षण अन वास्तव दर्शन आहे. आणि पुढे पुढे त्याच्या कविता समृद्ध होत गेल्या. त्यात भावना, व्यासंग, शब्दसामर्थ्य, अभिव्यक्ती, या सर्वांबरोबर काव्य जाणवू लागलं. खालील काही ओळी त्याची प्रचिती देतील.

हृदयाची भाषा हृदय होऊन धडकते

शब्द खोटे पडतात. अश्रू खरेअसतात.

डोळ्यातले अश्रू अन ओठा तले शब्द अश्रूच शब्द होऊन टपकतात ओल्या कागदावर

किंवा

1 छळतेस कधी आणि किती मोजदाद मी सोडली

एकटीच तू एकट्याला इतरांची मी साथ सोडली

2 आयुष्याच्या संध्याकाळी सखये

तुझी नितांत संगित्मय साथ हवी

तुझ्या संगती मी गाईन माझ्या जीवनाची भैरवी.

अन पुढे पुढे तर त्या कविता काव्यलेणं घेऊन निखरतच गेल्या

अथांग नभीचा गरुड राज मी, स्वच्छंद सदैव विहरतो,

माझ्या सृजित कल्पनांना स्वर्गीय गगनी कोरतो

किंवा

सोवळे-ओहळ नदीतून झुळझुळती हवेचे चातकांचे नभी कीलबिलती

दव पूर्णेंदूचे पानापानात झिरझिरती, नेत्र श्याम घनाशी शोधती

आणि अगदी आता आताची कविता.—‘ मी वर येईन ‘ मधल्या काही ओळी, ओतप्रोत काव्यानी, अंत:करणातून फुटल्या सारख्या वाटतात

मला इतिहासाच्या पानांवरून मिटवून टाकण्यासाठी

माझं मेलीचं जीवन भ्रष्ट ठरविण्यासाठी

मुर्दडासारखे प्रयत्न कराल, माझ्यावर चिखल फेकाल

तरीही धूलिकणा सारखी उफाळेल, वर येईनचयईन

उदय होईल आगळा आणि सुंदर, माझ्या पूर्वजांच्या पुण्याईचा

सीतेचे द्रोपदीचे सत्व घेत, दासींना नवसंजीवन देत,

मी तेजोवलय, मी शक्ती, मी प्रज्ञा, मी क्रांती

मी उठेन. मी उठेन. मी उठेन.

इतकं प्रग़ाढ वाचन, इतका प्रचंड शब्दसंग्रह, एवढं चिंतन. मनन त्यानं आपल्या अभिव्यक्तीत उतरवून या काव्याला जन्म दिलाय. परवा एका

पत्रात त्यानं मला लिहिलं’माझी गांधारी झाली. शंभर कविता प्रसवलो मी; काही दुर्योधन, दु:शासना सारखेही असतील.’ मी त्याचं शेवटचं वाक्य पूर्ण करतो ’ पण श्रीकृष्णाला डोकं खाजवायला लावणार्या ही बऱ्याच असतील’ ज्ञानेश्वरी अन अमृतानुभव तर जोशीचे तोंडपाठ. केंव्हा आपल्या अंगावर रेडा सोडेल, याचा नेम नाही.

अत्यंत महत्त्वाचं म्हणजे सहा-सात वर्षांपूर्वी जोशी मरणाच्या दाढेतून परत आला. इतका तो आजारी होता की सहा-सात महिने हातापायाची हालचाल होत नव्हती. त्यातून बरा होऊन उभे राहिल्यानंतरची ही काव्य निर्मिती. आस्थाचला च्या सूर्यास्तातही तेजअसतं म्हणतात तसं आहे हे. विशेष म्हणजे टक लावून तुम्ही त्याच्याकडे पाहू शकाल असं ते असतं’. ह्यानंतर जोशींला आपला आजार आणि त्यातून बाहेर येण्यासाठी ज्या यात्रेतून ज्या धैर्यानं बाहेर यावं लागलं त्याचा सर्व वृत्तांत अतिशय वाचनीय पद्धतीने त्यानं आपलं पुस्तक “झुंज” यात प्रकाशित केला आहे. शेवटी जोशी, बालकवि बैरागी यांच्या एका कवितेतील दोन ओळी तुझ्यासाठी लिहितोय,

जब तक मेरे हाथ मे है नीलकंठीनी लेखनी
दर्द तुम्हारा पीने से इनकार करू तो कहना.

जीते रहो. लिखते रहो. हे आहे अभिव्यक्तीच्या तळमळीचं ( खरं म्हणजे मळमळीचं) खरं स्वरूप.

माझा दुसरा मित्र नारायण व्यास ह्याचा हिंदी काव्यसंग्रह “मनके पाखी” ह्यासाठी मी जे लिहिलं होतं ते हिंदीत आहे. त्याचा काव्यसंग्रह हिंदी भाषेत असल्यामुळे मी ते हिंदीत लिहिलं. ते ही जसच्या तस मी हिंदीत देतो आहे.----.

“ प्रकाश का परिचय “

नारायण व्यास विद्यार्थी जीवन सेही मेरे करीबी-मित्र रहे है. मुझे याद आता है, हम दोनो तब उन्नीस वर्षेके थे,और औरंगाबाद के शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय के प्रथम वर्ष के छात्र थे. छात्रावास मे हमारे कमरे आमने-सामने थे. उस वक्त पहली बार मैंने व्यास जी के मुख से उनकी एक रचना सुनी जिसका शिर्षक था ’’मै मधुकर बन जाऊ’’ तुमफुलोसे मुस्कुराओ तो मै मधुकर बन जाऊ.

पात पात पर घूम घूम कर मै फिर फिर कुंज निहारूंगा
सुखी वाती टूटा दीपक ले ज्योती दीप जलाऊंगा
अधरोपर ले मुरली मधुबन को हरा बनाऊंगा
विणाके खोये तारो को नवजीवन ताल दिलाऊंगा
तूम जो सागर फुल बनो तो लोल लहर बन जाऊं

तुम फुलो से मुस्काओ तो मै मधुकर बन जाऊं
तुम तुंग शृंग,मै रेणू अंग, तुम दिनकर कर मै श्याम रंग
तुम तो रवी की मधुर मधुर किरण मावस मे मेरा साथ संग
कैसे मै तुमको पाऊंगा, नैनो की प्यास बुझाऊंगा
पर ये कैसे हो सकता है, पदधुली सर न लगाऊंगा
तुम जो हाथ बढाओ तो कमलाकर पाजाऊ
तुमफुलो से मुसकाओ तो मै मधुकर बन जाऊ
तुम सुंदर रहा बताओ तो मै पथचर बन जाऊ. तुम फुलो से------

जिस उम्र मे मै ईन शब्द के अर्थ भी नही समज रहा था, ऊस उम्म्रमे व्यासजीके कलम से यह काव्य गंगा बह रही थी.उस ऊम्रमे साहित्य समृद्ध भाषा मे वह शब्द सजा कर काव्य स्त्रोत बहा रहे थे. तबसे मै उनका भक्तही बन गया. और उनसे प्रेरणा लेकर अपनी संवेदना ओको लिखने की कोशिश करता रहा.

विधि का विधानभी कुछ अजिब होता है. जिन हातोमे कलम थमा कर ईश्वर ने काव्य की धारा बहानी थी ऊन हातोमे पत्थर और रेती सिमेंट थमा कर विधाता ने उन्हे सिव्हिल इंजिनियर बना दिया. जीन हाथोने काव्यरचना रचनी थी, वे हाथ, नदी उपर बांध और सडको पर पूल बांधते रहे. फिर भी पत्थर सिमेंट के बीच भी उनको जोडने वाले, उनको एकजीव

करनेवाले पानी को नारायण ने कभी सुख ने नही दिया..ठेकेदार और मुकादम के बीच अपना दिन बीताने वाला यह इंसान रात मे अपनी वेदना संवेदना, अपने अनुभूतीयोको संजोता रहा. उनको शब्दो के साज चढा ता रहा, और उच्च कोटी के साहित्यकारो के बराबरी की रचना लिखता रहा. नारायण व्यास के काव्यसंग्रह मन के पाखी मे मानव जीवन के अनेक अंगो का दर्शन है

अपनी बेटी के बडे होने पर, उसका विवाह विवाह होने पर, उसकी जुदाई की यादो मे उन्होने लिखा है--

वह बेटी थी मेरी फिर भी मुझको मां सा समजा तिथी

चिंता करता मै कोई वह मुझको धीर बंधा ती थी

उसको आशीर्वाद देते हुए उनोने लिखा है

हर सुबह तुम्हारी हो अरुणिम, हर सांझ मधुर झंकार करे

मन वीणा सुरसे झंकृत हो,हर कर्म महा ओंकार बने

यह हर पिता की भावना है. कामना है. पर सिर्फ नारायण जैसे मूर्तीकार ही उनको आकार दे सकते है.

रिश्तो के फर्श् की फिसलन का अनुभव हर एक के जीवन की अनुमति है. उनो ने लिखा है--

क्यू हर कोई अकेला,यह कौन सा शहर है, मंजिल जाने कौनसी यह कौन सा सफर है

मक्सद है क्या हमारा जाने किसी तरह, रिश्तो के फर्शपर है फिसलन जगह जगह.

अपनी रचनाओ की प्रस्तुती पर व्यासने लिखा है-----

नही सिंगार शब्द का नही पहचान भाषा की, कही युही भटकती है, गली अंजान आशाकी

मिलेगी तो कही मंजिल, मशालो को जलाता हूं, अंधेरे भूल जायेंगे, उजालो को बुलाता हू

एक ख्यातनाम चित्रकार के जैसे शब्द के रंगो और भाषा की कुंचलोसे जीवन की तस्वीर बनानेवाले नारायण व्यास की विनम्रता भी देखो--

'नही सिंगार शब्दो का नही पहचान भाषा की'

ईन पंक्तियोका दर्शन भी देखो----

व्यासजी लिखते है "सपनो के बंजर मे सारे अरमानो को बोते है,सांझ घिरी तब आखे खोले, पुरा जीवन सोते है.

जीवन के वास्तवता की प्रचिती उन्होने अपनी रचना" दर्द कल का सह रही" मे दिलायी है.

आगया मझधार मे तू और किनारा दूर है, पाव तेरे थक रहे है हाथ भी मजबूर है,

यह लहर का खेल सारा आज है तो कल नही, बांधकर तू रख सके जो, कोई ऐसा पल नही.

नारायण व्यास एक खूश मिजाज आदमी है. दिखने मे गंभीर है. पर व्यंग सजाने वाली व्यक्ती. है मुझे याद है इंजीनियरिंग कॉलेज के छात्रावास मे व मेरे सामने वाले कमरे मे रहते थे. मैंने एक सुराई खरीदी और रोज पानी से भर कर उसे रात को अपने कमरे मे रखा था, की पढाई करते करते उठकर दूर मेसमे पानी पीने को बार-बार नही जाना पडे. नारायण आकर रोज मेरी सुरही का पानी मांगते. एक दिन महिने कहा, ' यार तुम अपनी सूराई क्यू नही खरीदते? ' तो बे बोले "अरे फिर तुम्हे ब्राह्मण को पानी पिलाने का पुन्य कैसे प्राप्त होगा? मै तो पानी पी कर तुम पर उपकार कर रहा हूं " अब देखो.

बांट सको तो खुशिया बाटो, दर्द दूर तक फैला है
बंद रखो गम को सीने मे, महताब भी मैला है
और कोई पास नही आये जो अपने दर्द सुनाओ
इसलिये जखमो को ढक लो गीत खुशी के गाओ

ऐसा यह कवी है. ऐसी है इसकी कविता, जिस्मे जीवन संगीत है, संगीत की लय है, ताल है. नारायण व्यास मेरे मित्र है. उनका जीवन मैने

करीब से देखा है. एक संवेदनशील कवी का हृदय रखने वाला इंसान, जीवनभर ठेकेदार और मिस्त्रीओसे घिरा रहा, पीडब्ल्यूडी मे अपना जीवन बीताता रहा. मुझे अख्तर रीजवि की चार पंक्तिया याद आ रही है--

नामो के साथ जहन से चेहरे भी खो गये
हम पत्थरो के देश मे पत्थर के हो गये.
ताबिर की तलाश मे निकला था गाव से
आया जो शहर मे तुम मेरे ख्वाब खो गये.

वह तो जुगनू है जो अपने अस्तित्व का परीचय देने ईधर उधर उडते रहते है. सुरज परीचय का मोहताज नही होता. प्रकाश का भी भला कोई परीचय होता है?"

डॉ. बंकट जाजू

असे माझे हे दोन मित्र. दोन्ही इंजिनियर. दोन्ही कवी. ह्यांच्या काव्याचा अल्पसा परिचय मी करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

# तगमग.

30 ऑक्टोबर 1984 ला मी माझं पीएच. डी.च काम पूर्ण करून माझा थेसिस आय आय टी मुंबई येथे सबमिट केला. सबमिट करून परत माझ्या प्रयोगशाळेच्या केबिनमध्ये मी बसलो, तेव्हा एकदम हलकं हलकं वाटायला लागलं. समाधानाच्या त्या आनंदानं,गेली तीन वर्ष दोन महिने मी रात्रंदिवस जे परिश्रम केले त्याचा परिहार झाला असं वाटलं. बरोबर 1 सप्टेंबर 1981 ला मी पीएच. डी. साठी आय आय टी ला रुजू झालो. पहिले सहा महिने आय आय टीच्या नियमाप्रमाणे दोन क्रेडिट सेमिनार तयार करून सादर करण्यात अन पीएच. डी. चा प्रॉब्लेम ठरवण्यात गेले. माझ्या गाईड डॉक्टर मिसेस पारीख होत्या. त्यांच्याशी बऱ्याच वेळा चर्चा केल्यानंतर माझा प्रॉब्लेम ठरला. मग काम कसं अन कुठून सुरू करायचं यासाठी च्या लिटरेचर सर्वे वर जवळ जवळ तीन महिने गेले.मग माझ्या प्रयोगाची आखणी आणि त्यासाठी लागणाऱ्या उपकरणांची जुळवाजुळव करून माझा प्रयोगाचा सेटप उभा करण्यात आणखी दोन महिने गेले. पण या सगळ्या प्रकारातून प्रत्येक पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्याला जावंच लागतं. तेवढा वेळ लागतोच. अगदी ठोकळ मानाने सांगायचं झालं तर

डिझेल इंजिन एक्झॉस्ट कंट्रोल वर माझं पीएच. डी.च काम होतं. त्यात पहिले म्हणजे आधीचे आठ सोडून पुढचे सोळा महिने मी प्रयोगशाळेला रोज सहा तास डिझेल इंजिनवर प्रयोग करायचचो. सकाळी 9 ते 12 अन दुपारी दोन ते पाच साडेपाच पर्यंत. डिझेल इंजिन चालू करून त्या सेटवर उभा असायचो. त्यात वेगवेगळे प्रयोग करून सर्व रीडिंग घेणे हे रोजच काम असायचं. मग रात्री परत सात ते दहा अकरा पर्यंत प्रयोगशाळेतल्या खोलीत बसून संबंधित कॅलक्युलेशन्स वगैरे करुन पाहणे, हा भाग असायचा. ह्यात मध्ये मध्ये इंजिन मध्ये किंवा उपकरणांमध्ये होणारे बिघाड, दुरुस्ती, मग त्यांना परत सुस्थितीत आणणे,या सर्व बाबींचा अंतर्भाव होताच. असं करत करत जवळ-जवळ 28 महिने गेले. त्यानंतर मला माझ्या सर्व रिझल्टच^ अनालिसिस करून लिटरेचर मध्ये पहिल्या काही उपलब्ध असलेल्या समीकरणांना मॉडीफाय करायचं होतं. त्यावर कॉम्प्युटर वरही बरीच मदत घ्यायची होती. मग कॉम्प्युटरचा अभ्यास हा योगायोगाने आलाच. मग सर्व इंटरप्रेटेशन्स, स्वतःच्या कामावर आधारलेले कन्क्लूजन, याची कच्ची टाचणं करण्यात बरेच दिवस गेले अन मग मी माझा थेसीस लिहिणं सुरू केलं. थोडं थोडं लिहून झालं की मी ते पारीख मॅडमना दाखवून त्यावर चर्चा करून फायनल लिहायला लागायचो. त्यात मी माझ्या कामावर जवळ जवळ 70 ते 80 वेगवेगळे ग्राफ काढले होते. ते सर्व समोर ठेवून चर्चा करावी लागायची. दिवसभर आणि रात्री अकरा वाजेपर्यंत मी डिपार्टमेंट मध्येच

असायचो. असं करत करत शेवटी अडतीस महिन्यानंतर मी माझा थेसीस सबमिट केला. सहाजिकच हलकं हलकं वाटत होतं. एक तृप्तीचं, फलश्रुतीचं अतिव समाधान होतं.

ज्या दिवशी थेसीस सबमिट केला त्याच दुपारी घरी कॉर्टरवर आल्याबरोबर आमची सामानाची बांधाबुंद सुरू झाली कारण दुसऱ्या दिवशी आम्हाला आय आय टी सोडून अमरावतीला निघायचं होतं. अमरावती ला आल्यावर दोन चार दिवस घर लावण्यात गेले. मी खरं म्हणजे दुसऱ्याच दिवशी अमरावतीच्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये माझ्या कामावर रुजू झालो. घर बहुतांशी माझ्या बायकोनं लावलं. घर लावून झाल्यावर जो शनिवार रविवार आला त्या शनिवारी रविवारी बायको, मुलांना घेऊन दोन दिवसासाठी माहेरी आर्वीला गेली. ती गेली त्या रात्री जेवण झाल्यावर बाहेर मी झोपळयावर बसलो आणि कसं कुणास ठाऊक मला माझ्या पहिल्या वर्गाच्या शिक्षणापासून पीएच. डी. पर्यंतचा शिक्षण प्रवास आठवला.

विशेष म्हणजे चौथा वर्ग पास झाल्यानंतर माझ्या घरचे लोक मला पुढे शिकवणारच नव्हते.सरळ सरळ घरच्या किराण्याच्या दुकानावरून बसवणार होते. ह्याची मला तिव्रतेनं आठवण झाली. माझं चौथीपर्यंत शिक्षण आमच्या तिन चार हजार वस्तीच्या खेड्यातच झालं. मी पहिल्या वर्षापासून नीट अभ्यास करून वर्गात नेहमी पहिला-दुसरा असायचो. चौथ्या वर्गात तर मी आमच्या चार-पाच खेड्यांच्या सेंटर मधून पहिला

आलो. पुढे शिकायचं याचा मला सारखा ध्यास लागला होता. अतिशय तगमगत होतो मी. घरची परिस्थिती यथा तथाच होती. त्यातल्या त्यात कसं बसं करून माझ्या मोठ्या भावाला पुढे शिक्षणासाठी मेहकर- चिखली ला माझ्या आत्याकडे पाठवण्यात आलं. माझा भाऊ म्हणजे डॉक्टर एस. एन. जाजू माजी प्राचार्य विदर्भ महाविद्यालय अमरावती.( तीन वर्षापूर्वी तो वारला ) तर त्याला आमच्या आत्याकडे शिक्षणासाठी पाठवलं होतं. आता माझी व्यवस्था आणखी कुठे करणार? दोन जणांचा खर्च ही घरचे करायला तयार नव्हते. माझे वडील म्हणाले “बस झालं तुझं शिक्षण’ घरच्या किराण्या च्या दुकानावर बसत जा. आम्हालाही मदत होईल.” मी माझं म्हणणं रेटत होतो. माझे काही वर्गमित्र चिखली, बुलढाणा ला पाचवीत जाणार होते. मग मला रोज रडू यायचं. मी सारखा आईच्या मागे फिरायचो. तसं म्हणजे माझ्या मामाच्या गावी मेहकर जवळचे सुलतानपूरला आठवीपर्यंत शाळा होती. मामा श्रीमंत होते. घरही मोठे होतं. पण माझ्या वडिलांचं अन मामांचं आपसात बनत नव्हतं. म्हणून मामाची विनंती करायला माझे वडील तयार नव्हते. मी आईला म्हटलं तू मामा ला विचार. मी निदान आठवीपर्यंत तेथे शिकतो. पुढचं पुढे पाहू. मी माझ्या ध्यासामुळे रात्री झोपेतून उठून बरळायला लागलो.’ मला शिकायचं आहे, मला मामाकडे न्या’ वगैरे. माझा एक मोठा चुलत भाऊ होता. त्याने एक दिवस माझ्या आईला समजावून सांगितलं की काकी तू मामांना विचार आणि याला त्यांच्याकडे पाठव शिक्षणासाठी. हा

रात्री बरळतो. ह्याच्या डोक्यावर परिणाम होईल. शेवटी माझ्या मामाला विचारून, आणि माझ्या वडिलांची परवानगी घेऊन माझ्या आईनं मला पाचवीसाठी मामाच्या गावी नेऊन सोडलं. मला खूप आनंद झाला. मी तिथे मन लावून अभ्यास करायचो. पाचवी-सहावीत वर्गात पहिला दुसराच असायचो. मामांकडे पसारा मोठा. त्यांचं एक मोठं किराण्याचे दुकान होतं. त्यामुळे मला इतर कामही खूप करायला लागायची. किराण्याचं दुकान होतं. व दुकानावर चा मुनीम सकाळी आठ वाजता यायचा. त्यामुळे सकाळी सहा ते आठ मला दुकानावर दुकानदारी करावी लागायची. दुकानावर संध्याकाळी गर्दी असल्यामुळे शाळा सुटल्या बरोबर घरी येऊन तास दोन तास परत दुकानावर बसावं लागायचं. रात्री कंदील घेऊन मी शाळेत झोपायला जायचो आणि तिथे अभ्यास करायचो. आमचे बरेच मित्र रात्री शाळेत अभ्यासाला व झोपायला येत. एकूण अभ्यासाला वेळ कमी मिळायचा. ओढाताण व्हायची. त्यामुळे मी सातव्या वर्गाच्या शेवटी शेवटी माझ्या वडिलांना एक मोठं पत्र लिहून त्यांना विनंती केली की मला आठव्या वर्गापासून बुलढाण्याला शाळेत टाका. बुलढाण्याला माझा मोठा भाऊ आठवी ते अकरावी हायस्कूलमध्ये शिकला. तो आमच्या गावच्या पण पुढे बुलढाण्याला स्थायिक झालेल्या एका मारवाडी ब्राह्मण बाईकडे राहायचा. त्या बाईंना आम्ही भोजाई म्हणजे भाभी म्हणायचो. त्यांना एक मुलगी व एक मुलगा होता. त्यांचं घर म्हणजे 18 फूट बाय दहा फूट अशी एक खोली

होती. दर महिन्याला त्या चौघांना पुरेल एवढं अन्नधान्य माझे वडील आमच्या खेड्या वरून आणून द्यायचे. वर आठवडाभर पुरेल एवढा भाजीपाला घेऊन द्यायचे. मी सातवी होणार त्याच वर्षी माझा भाऊ अकरावी होऊन बुलढाणा सोडणार होता. मी वडिलांना लिहिलं की जसा भाऊ त्या भोजाईच्या घरी राहायचा तसाच मीही राहीन. तुम्ही फक्त पहिल्यासारखेच अन्नधान्य द्या. मी माझ्या फी-पुस्तकांसाठी कसेही करून मिळवीन. तुमच्यावर माझं ओझं टाकणार नाही. तिकडे माझ्या भावानंही माझ्या वडिलांना पत्र दिलं की बंकट, (म्हणजे मी) अभ्यासात चांगला आहे त्याला शाळेची शिष्यवृत्तीही मिळू शकते. त्याला आठवीत बुलढाण्याला पाठवा. आमच्या वडिलांनी मग मला आठवीत बुलढाण्याला आणून त्या बाईकडे ठेवलं. त्या फार चांगल्या आणि हुशार होत्या. बाहेर काही घरी स्वयंपाक करायच्या तर काही ठिकाणी पूजा, लग्नाची कामं करायच्या. घरात त्यांची शिस्त फार कडक. आम्हाला सकाळी उठून पब्लिक नळावरून नंबर लावून पाणी भरावं लागायचं. बऱ्याच वेळा जवळपासच्या गोठ्यातून डोक्यावर टोपलं घेऊन जाऊन शेणआणावं लागायचं. त्या त्याच्या गोवर्या करायच्या, आणि इंधन म्हणून वापरायच्या. स्वतःचे कपडे स्वतः धुऊन, जेवल्यावर ताट घासून ठेवणं हे आम्हाला आपापलं कराव लागायचं. घरात रात्री चिमणी म्हणजे केरोसीनचा छोटा दिवा,( कंदीलही नही ) असायचा. त्या चिमणीवर त्यांचं काम झाल्यावर, मी आणि त्यांचा

मुलगा जमिनीवर, पोत्यावर बसून अभ्यास करायचो. त्या सकाळीच संध्याकाळचा स्वयंपाकही करून ठेवत त्यामुळे आम्ही संध्याकाळी सहा सात वाजता जेवून, रात्री नऊ वाजेपर्यंत अभ्यास करायचो. सकाळी दोनएक तास अभ्यासाला वेळ मिळायचा. शिवाय शनिवारी दुपारी अन रविवारी मी बुलढाण्याच्या गावाबाहेरच्या संगम तलावावर माझी पुस्तकं, कपडे, बसायला एक पोतं असं घेऊन अभ्यासाला जायचो. कधीकधी बुलढाण्याच्या चैतन्य वाडीतल्या पाण्याच्या टाकीवर जायचो. तिथे बरीच झाडे होती. तिथे कपडे धुऊन वाळू घालायचे आणि संध्याकाळपर्यंत झाडाखाली बसून अभ्यास करायचा, असा माझा नेमच सुरू होता. मी एडेड स्कूलमध्ये आठव्या वर्गात होतो. दंडे गुरुजी आमचे क्लास टीचर होते. बहुतेक विषय तेच शिकवायचे. खूप चांगलं शिकवायचे. अन ते खूप कडक होते. मी सुरुवातीपासूनच चांगला अभ्यास करत होतो. थोड्याच दिवसात मी दंडे सरांचा आवडता विद्यार्थी झालो. ते म्हणाले चांगला अभ्यास कर नेहमी आठव्या अ किंवा ब चा मुलगा किंवा मुलगी पहिल्या दुसऱ्या नंबर वर असतात. यावेळी तू, माझ्या वर्गाच्या मुलांनं हा नंबर पटकावला पाहिजे. मी मेहनत केली पण आठव्या वर्गात सर्व वर्गन मिळून तिसरा आलो.

आमच्या हायस्कूलमध्ये जी दोन मुलं आठवीत पहिल्या तीन मध्ये,व नववीच्या तीन माहीत पहिल्या दोन मध्ये अशा दोन्ही अटी पूर्ण करतील त्या दोन जणांना नववी आणि दहावीत दोन वर्ष वीस रुपये

महिन्याची स्कॉलरशिप मिळायची. मी नववीच्या तिमाहीत पहिला आलो आणि मला ती स्कॉलरशिप मिळाली. तेव्हा वीस रुपये फार मोठी रक्कम होती. माझा महिन्याचा खर्च म्हणजे दहा रुपये फीज, चार आणे कटींग, चार आणे पाच पोस्ट कार्डाचे, चार आणे महिन्यातून एक सिनेमा,( त्यावेळी मी जमिनीवर बसणाऱ्यां बरोबर चार आण्याचे तिकीट घेऊन महिन्यातून एकदा सिनेमा पाहायचो. मला आठवतं अगदी दहावी पास झाल्यानंतर शेवटचा, दिल अपना और प्रीत पराई हा सिनेमा फक्त मी आठ आण्या च्या तिकिटावर, बेंच वर बसून पाहिला. तर असे अकरा बारा रुपये महिन्याचे माझे खर्च व्हायचे आणि उरलेले 8-9 रुपये मी आमच्या भोजाई ला भाजीपाल्यासाठी द्यायचचो. माझं हायस्कूल खूप चांगलं होतं. सर्व शिक्षक चांगले मन लावून शिकवणारे, आमच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष देणारे होते. मला वाचनाची आवड, वक्तृत्वाची अन नाटकांची आवड तिथेच लागली. दहावीपर्यंत तिथे असताना मी बुलढाण्याच्या टिळक व्याख्यान मालिकेत आणि इतर प्रसंगी ना. सी. फडके,पु.बा. भावे, बाळशास्त्री हरदास, बाबासाहेब पुरंदरे, प्राध्यापक वामन चोरघडे, प्राध्यापक राम शेवाळकर, प्राध्यापक पद्माकर डावरे, प्राध्यापक मोहगावकर अशा अनेक नामवंत लोकांची व्याख्यानं ऐकली. आयुष्यभर तो वसा घेऊन जगतो आहे. मी एसएससी मध्ये विदर्भ बोर्डातून 9वा मेरिट आलो.

माझं दहावी झालं तेव्हा माझा भाऊ बी.एससी. झाला. त्याला पुढे एम.एससी करणं आवश्यक होतं आणि ते घरच्च्यांचे प्राधान्य होतं. परत माझं शिक्षण थांबतं की काय ही भीती मला खायला लागली. पण माझा मोठा भाऊ माझ्या पाठीशी उभा राहिला. मी मेरीटमध्ये आल्याचा त्याला फार अभिमान होता. त्याला फार आनंद झाला होता. त्यानं माझ्या वडिलांना सांगितलं,” ह्याला कॉलेजमध्येही शिष्यवृत्ती मिळेल. आणि नाहीच मिळाली तर फक्त दोन वर्ष तुम्ही कळ काढा. मी नोकरीवर लागलो की मी त्याचं पुढचं सगळं शिक्षण करीन. “ मग मी प्रि युनिवर्सिटी म्हणजे आत्ताचे अकरावीत विदर्भ महाविद्यालय अमरावती येथे प्रवेश मिळवला व सुदैवाने तिथे गेल्या गेल्याच मला किंग एडवर्ड मेमोरियल स्कॉलरशिप, तीस रुपये महिन्याची मिळाली. त्यामुळे माझा अर्धा खर्च भागत होता. अन पुढे एक-दोन महिन्यातच त्याच वर्षीपासून जी नॅशनल मेरिट स्कॉलरशिप सुरू झाली तीही मला मिळाली. ती साठ रुपये महिना होती म्हणून मी केईएम स्कॉलरशिप सोडून नॅशनल मेरिट स्कॉलरशिप पत्करली. ती मला नेहमीसाठी मिळणार होती. फक्त अट एकच होती, पुढे प्रत्येक वर्षी मला प्रथम श्रेणीत पास व्हायचं होतं. त्यावेळी माझा महिन्याचा खर्च म्हणजे फी, हॉस्टेल फी,मेस बिल, दूध बिल व इतर किरकोळ खर्च सर्व मिळून पन्नास पंचावन्न रुपये व्हायचा. म्हणजे माझे पाच रुपये महिन्याचे वाचायचे. दिवाळीला किंवा उन्हाळ्यात घरी जाताना तिकिटाला मला ते पंचवीस तीस

रुपये उपयोगी पडायचे. त्यामुळे माझ्या घरच्यांवर जवळ जवळ काहीच बोजा राहिला नाही. तिथे दोन वर्षे काढल्यानंतर पुढे औरंगाबादच्या शासकीय अभियांत्रिकी कॉलेजमध्ये मी प्रवेश मिळवला. प्रवेश मिळाल्यानंतर दुर्दैवानं पाच महिन्यातच माझे वडील वारले. पण तोपर्यंत माझा मोठा भाऊ एम. एससी. होऊन विदर्भ महाविद्यालयातच पदार्थविज्ञान विभागात प्राध्यापक म्हणून रुजू झाला होता. मग मला तो औरंगाबादला दर महिन्याला 70- 80 रुपये पाठवू लागला. त्यात माझा सर्व खर्च भागायचा. तिथून मी 1966 ला बी.ई.मेकॅनिकल झालो. आमच्या वर्गात तीसच विद्यार्थी होते. मी फायनल इयरला दुर्दैवानं दोन महिने आजारी होतो. वीस दिवस तर मेडिकल कॉलेज हॉस्पिटल मध्ये भरती होतो. आमच्या 30 पैकी सात जणांना फर्स्ट क्लास मिळाला आणि मी आठवा होतो. माझा फर्स्टक्लास सात मार्कस्नं गेला. मला खूप वाईट वाटलं. निकाल लागल्याबरोबर एकाच महिन्यात अमरावतीच्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये असिस्टंट लेक्चरर म्हणून रुजू झालो. आपण एम. टेक करून आपलं बी.ई.तलं अपयश धूवून काढलं पाहिजे हे मी मनात बिम्बऊन, सारखा त्याचा ध्यास घेतला. मग आय आय टी मुंबईत एम.टेक. ला प्रवेश मिळवण्याच्या तयारीला लागलो. पण नोकरी सोडून जाणं शक्य नव्हतं. अन गॅझेटेड लेक्चर झाल्याशिवाय सरकार पुढच्या शिक्षणाला पाठवणार नव्हतं. मी 1972- 73 ला महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे गॅझेटेड लेक्चरर म्हणून

निवडला गेलो, आणि पुढे 1975 ला मला सरकारने आय आय टी मुंबईला दोन वर्षासाठी एम.टेक. करायला पाठवलं. प्रवेश मी स्वबळावर मिळवला होता. मी नऊ वर्षाच्या ब्रेक नंतर परत विद्यार्थी झालो. पण डोक्यात एकच ध्यास होता, एम.टेक ला खूप चांगल्या ग्रेड्स मिळवायच्या. मार्कस मिळवायचे. आणि सुरुवातीपासून त्याच्यासाठी खूप अभ्यास करायचा, स्पीडने लिहायची सवय करायची. आयआयटीत मी प्रथम सेमिस्टर च्या परीक्षेत चाळीस विद्यार्थ्यांमधून तिसरा आलो. माझा सेमिस्टर परफॉर्मन्स इंडेक्स पहिल्याच सत्रात 7.8 म्हणजे दहापैकी 7.8 असा होता. पुढे फायनल ला तर मी चाळीस विद्यार्थ्यांमध्ये दुसरा होतो आणि सी. आय. पी. म्हणजे क्यूमिलेटीव्ह परफॉर्मन्स इंडेक्स दहापैकी साडेआठ म्हणजे 8.5 असा होता. प्रोजेक्टमध्ये तर माझा इंडेक्स दहा पैकी दहा होता. माझ्या एम.टेक प्रोजेक्टच्या गाईड ही पारीख मॅडम होत्या. एम.टेक लाच माझे त्यांच्याबरोबर आंतरराष्ट्रीय स्तरावर तीन शोध प्रबंध प्रकाशित झाले होते. शिवाय त्यांनी प्रथम व द्वितीय सत्रात शिकवलेल्या दोन्ही विषयात मला ए ग्रेड मिळाल्या होत्या. त्यांनी मला म्हटलं ‘‘जाजू, तुम्ही पीएच.डी. केलंच पाहिजे. माझा पीएच.डी. चा पहिला विद्यार्थी म्हणून मी तुम्हाला घ्यायला तयार आहे’.

मग एम.टेक होऊन परत अमरावतीला रुजू झालो. नंतर सातच महिन्यांनी माझं प्रमोशन होऊन माझी औरंगाबादला बदली झाली. तिथे मी

पीएच.डी साठी आयआयटी मुंबईला अर्ज करून सिलेक्ट झालो, पण पुढील तीन वर्ष तुम्हाला परत उच्च शिक्षणाला पाठवता येणार नाही, कारण नुकतंच तुम्ही एम.हून परत आलात, असं सरकारचं म्हणणं होतं. अन मी मग 1980 ला परत अर्ज करावा असो मला सांगण्यात आलं. मग मी परत 1980 ला अर्ज केला.व मार्च 1981 ला आयआयटी ला पीएच.डी.च्या इंटरव्यू साठी गेलो. सुदैवाने माझी निवड झाली आणि सरकारनेही मला त्या वर्षी जायला परवानगी दिली. मग या लेखाच्या सुरुवातीला लिहिल्याप्रमाणे मी एक सप्टेंबर 1981 ला परत आय आय टीत आलो.

असा हा माझा सर्व शिक्षणाचा प्रवास. माझ्यासारखे अनेक जण अशा प्रवासातून गेले आहेत. अभ्यासाची अन शिक्षणाची तगमग असली तर परमेश्वर नक्कीच वाट दाखवतो. परिश्रम करणं हे आपलं काम आहे. ते प्रामाणिकपणे केलं पाहिजे. मी औरंगाबादच्या इंजिनीअरिंग कॉलेजचा प्राचार्य असताना, दोन हजार साली एकदा माननीय मंत्री नितींनजी गडकरी आणि डॉक्टर विजय भटकर यांच्या एका कार्यक्रमाला गेलो होतो. डॉक्टर भटकर माझे मित्र आहेत.(आम्ही 1967ला अम्रवतीला दोघंही प्रध्यापक होतो.) त्यामुळे मला या कार्यक्रमाला जायचंच होतं. त्या कार्यक्रमात भाषण देताना डॉक्टर विजय भटकर, नितीन गडकरीं कडे पाहून म्हणाले “ व्हेअर देअर इज अ विल, देअर इज अ हायवे “ म्हणजे वे ऐवजी त्यांनी गडकरी यांच्याकडे पाहून हायवे म्हटलं. कारण त्या वेळी माननीय गडकऱ्यांनी

एक्सप्रेस हायवे आणि इतर अनेक रस्ते बांधले होते. त्यांना उद्देशून माननीय विजय भटकर तसं म्हणाले. पण मला मात्र शब्दार्थानं ते पटलं, की व्हेअर देअर इज अ विल देयर इज हायवे. आंतरिक तळमळ, तगमग, ध्यास, असला पाहिजे. मार्ग सापडतोच.

# आठवणींचा निळा पारवा

माझे एक जवळचे मित्र जगदीश सिन्हा, न्यायमूर्ती दिलीप सिन्हा यांचे मोठे भाऊ, यांच्या मोठ्या भगिनी राजेश्वरी सिन्हा यांची एक कविता मी 1961- 1962 ला विदर्भ महाविद्यालयात विद्यार्थी असताना कविसंमेलनात ऐकली होती. त्यावेळी मी बी. एससी. पार्ट वन चा विद्यार्थी होतो. राजेश्वरी ताई एम. ए.च्या विद्यार्थिनी होत्या. त्या कवितेतल्या काही ओळी मला अजून आठवतात–

आठवणींचा निळा पारवा
नील आकाशी मुक्त भरारे
अबोध त्याची अजून कुजबुज
फांदी फांदी मधूनी गळते,
आठवलेले विसरून जाता
विसरलेले पुन्हा पुन्हा आठवते.
पुन्हा पुन्हा आठवते.

खरंच जीवनातल्या अनंत आठवणी अशा असतात की त्या विसरायला होतच नाहीत. पुन्हा पुन्हा आठवतात. मग त्या प्रेमभंगाच्या, प्रिय व्यक्तिच्या वियोगाच्या असोत, अपयशाच्या असोत, यशाच्या असोत. आणि काही काही आठवणी तर अशा असतात की त्या आपण विसरूच शकत नाही. विसरूही नयेत. कारण त्या खऱ्या अर्थानं आपल्या उरलेल्या आयुष्याचा आधार असतात; उरलेल्या प्रवासाच्या हमसफर असतात. अशा प्रचंड आठवणींचं मोठं पण कधी न सोडता येण्यासारखं गाठोडं काखोटीला असलं की पुढचं पाऊल उचलायला शक्ती येते. मार्ग एकाकी, तरी प्रवास सुसह्य होतो.

माझी पत्नी निवर्तल्याला आज तीन वर्षे झाली. तिच्याबरोबरच्या 47 वर्षांच्या सहजीवनाच्या अनंत आठवणी बरोबर घेऊन मी गेली तीन वर्षं वाटचाल करतो आहे. पण स्वानुभवावरून सांगतो, ह्या आठवणी म्हणजे जगण्याचा मोठा आधार. व पु काळे यांच्या वपूर्झा मध्ये त्यांनी एका ठिकाणी लिहिलं आहे “ पत्नी गेली की विश्व हरवलं. सुर सुरच राहतो. उरलेल्या आयुष्याचा संगीत होत नाही. सुर म्हणजे संगीताची जननी. बासरी ही नुसती भोकं असलेली बांबूची नळी असते. ओठातून फुंकर, प्राणाचे चैतन्य देणारा गेला की बासरीचा पुन्हा बांबू झालाच समजा. एका टोकाला कापडाचा तुकडा लावलेली ती झटकणी होते. प्रेम करणारी कितीही माणसं भोवती गोळा झाली, तरीही तो निव्वळ आर्केस्ट्रा होतो. पत्नी म्हणजे

बासरी. त्याहीपेक्षा मी म्हणेन पुरुष म्हणजेच बांबूची नळी.” वपुंचं म्हणणं खरं आहे. पण झटकणी लाही आपलं अस्तित्व असतंच. उरलेल्या आयुष्यावरची धूळ झटकत तिला जगावच लागतं. मग जगायला ही, पाऊल उचलायला ही शक्ती लागते. रखडत चालायचं नसेल तर( आणि तुम्ही तसं रखडत चालत राहणं त्या मृत आत्म्याला ही मंजूर नसतं ) मग आपल्या छंदांना परत उजाळा द्यावा लागतो, जे आपल्याला आवडतं ज्यात आपल्याला आंतरिक आनंद मिळतो, अश्या गोष्टी करत राहावं लागतं.आणि त्या करत वाटचाल करावी लागते. अन मग ह्या उरलेल्या प्रवासाच्या टप्प्याटप्प्यावर त्या आठवणींचा आधार असतो, विरंगुळा असतो.

तिच्या मागच्या जन्मदिवसाला मला आठवण आली ती तिनं मला लिहिलेल्या एका पत्राची. आमचं लग्न ठरलं आणि पहिला लग्नाचा मुहूर्त निघाला तो दहा महिन्यानंतर चा. आमच्या दुर्दैवानं तो पक्का केलेला मुहूर्तही जवळ आल्यानंतर काही अपरिहार्य कौटुंबिक अडचणींमुळे आणखी चार महिने पुढे ढकलला. म्हणजे लग्न ठरल्यानंतर 14 महिन्यांनी आमचं लग्न झालं. ह्या 14 महिन्यात आम्ही एकमेकांना साठ पत्र लिहिली. ती अजूनही माझ्याजवळ आहेत. तिच्या मृत्यूनंतरच्या तिच्या मागच्या वाढदिवसाला सकाळी जागा झालो तो तिच्या आठवणींनी गलबलूनच. तसा हातात पेन घेतला अन तिच्या आत्म्याला पत्र लिहिलं.

प्रेम,

“मार्च 1968 मे हमारी सगाई हुई और शादी 1969 मई मे. इस दरम्यान हमने 60 पत्र एक दुजे को लिखे, यांनी हर महिने मे पाच. मुझे याद है 17 डिसेंबर 1968 का तुम्हारा वह पत्र जिसमे तुम ने लिखा था “परसो मेरा जन्मदिन था. आपका कब है?” और मेरे पत्र मे मैने लिखा था “ मेरा जन्मदिन तो 27 सितंबर को होगया. 37 पत्रो का आदान-प्रदान होने तक हमको एक दुजे का जन्मदिन मालूम नही था. फिर भी हमारे मन एक दुसरे के पास थे. देखो जमाना किस तरह बदल गया है? अब तो शादी से पहले ही जनम दिन के तोफे दिये लिए जाते है. मै भी हॅपी बर्थडे कहना चाहता हू आज.पर ईंसान हू. आसमान तक पहूच नही सकता. फिर भी यकिन करो प्रेम, 14 डिसेंबर 1968 को जितना मेरा मन तुम्हारे पास था,उतनाही आज भी है. “ हॅपी बर्थ डे “

अशा ह्या आठवणी. ती आर्वी ची आणि मी अमरावतीचा. फक्त 60 किलोमीटर दूर. पण त्या 14 महिन्यात आम्ही दोघं फक्त एकदाच भेटलो. अमरावतीला. तेही तिचा बॉडीगार्ड म्हणजे तिची बहीण शांता बरोबर असताना. एकमेकांना साठ पत्रं लिहिणारी आम्ही पाच वाक्य ही भेटलो तेव्हा एकमेकांना बोललो नाही. सरळ चित्रा टॉकीज मध्ये जाऊन तिन तास ‘हमराज’हा सिनेमा बघत बसलो. चित्राच्या त्या अंधारात महेंद्र कपूर न गायलेलं, सुनील दत्त म्हणत असलेलं “तुम अगर साथ देने का वादा करो,

मै युही मस्त नगमे लूटा ता रहू” हे गाणं चालू असताना आम्ही एकमेकांच्या डोळ्यात पाहिलेलं मला आठवतं. आणि त्या अंधारात डोळ्यात दिसलेला, केलेला तो वादा आम्ही 47 वर्षे निभवला. एकमेकांच्या यातार्थ साथीनं. सहजीवनानं. मला आठवते आमच्या त्या पत्र मधली शुचिता, त्यातलं पावित्र्य. त्यात कुठेही उथळपणा नव्हता. आमच्या सुखी सोबतीची ती पाळंमुळं होती. आजकालच्या उतावळया प्रेमांना आणि त्यांच्या विदारक शेवटान्ना पाहिलं की मन विचलित होतं. आजकालच्या ह्या लोकांमध्ये पाऊल उचलण्याची शक्ती तरी उरते का? दे बिकम सो हॉलो. असं म्हणतात की एका यशस्वी माणसाच्या यशामागे एका स्त्रीचा हात असतो. मी यशस्वी माणूस आहे अस म्हणायला काहीच हरकत नाही. गेली 51 वर्षे मी तंत्र शिक्षणाशी निगडित आहे. आजही 75 वर्षांचा झाल्यानंतर, मी दोन दोन तास सलग उभं राहून इंजिनिअरींगच्या विद्यार्थ्यांना, प्राध्यापकांना शिकवतो. गेल्याच महिन्यात मी शेगाव येथील श्री संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजीनियरिंग मध्ये बारा तास फायनल मेकॅनिकल ला एका विषयातील एक भाग शिकून आलो. इंजिनीयरिंग च्या तिन पिढ्या मी शिकवल्या आहेत.एक मुलगी, तिचे वडील व तिचे आजोबा या तिघांनाही मी शिकवलं आहे. माझ्या एक्कावन वर्षाच्या वाटचालीत मला माझ्या असंख्य विद्यार्थ्यांचं, माझ्या अनेक सहकाऱ्यांचं प्रेम, आदर मिळाला. तो मी जोपासून आहे. पण माझ्या या वाटचालीत, माझ्या जडणघडणीत माझ्या

बायकोचा फार मोठा वाटा आहे. ती माझ्या पाठीशी नाही तर मागेपुढे सर्वत्र होती,

छोट्या छोट्या गोष्टींची आठवण अनेकदा होते. दैनंदिन जीवनातल्या कराव्या लागणाऱ्या किंवा सामोऱ्या जायला लागणाऱ्या काही काही गोष्टींच्या प्रसंगांच्या वेळी तिची आठवण आजही होते. रिक्षा वाल्याशी भाडं ठरवलेलं किंवा रेल्वे वरच्या आम्हालाशी हमाली ठरवलेलं, तिला कधीच आवडत नसे. नेहमी म्हणायची, हे बिचारे आपल्या सामानाला अंगावर उचलून दनेतात. यांच्याशी कसला भाव करायचा? त्यापेक्षा आपण आपल्या अंगावरचे कपडे थोड्या कमी किमतीचे वापरू शकतो. दारावर आलेल्या भाजीवाल्याला ती भाव विचारायची, पण ”ठीक से लगाना भैय्या” एवढच तिचे बार्गेन असायचं. मी बरेच वेळा हसून म्हणायचो “अगं त्याने ठीकसेच लावलेलं असतं. हे काय भावकरणं झालं?” देण्यातला आनंद काय असतो हे मी तिच्याकडून शिकलो. आमच्या कामावरच्या बाईच्या मुलीच्या दहावी पर्यंतची शिक्षणाची जबाबदारी तिने स्वतः वर घेतली. मला आठवतं, मी औरंगाबादच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचा प्राचार्य म्हणून निवृत्त झाल्याबरोबर, नागपूरच्या रायसोनी इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्राचार्यपदी रुजू झालो. रोज कॉलेजमध्ये जायला यायला रायसोनीनी यांनी मला ड्रायव्हर सह कार दिली. माझा ड्रायव्हर पदवीधर होता. तो तरुण अगदी

नीटनेटका, सुस्वभावी, निर्व्यसनी होता. रोज जाता-येताना घरात येऊन माझी बॅग तो घ्यायचा आणि आणायचा. माझी पत्नी त्याच्याशी बोलायची, विचारपूस करायची. महिन्याभरानंतर तो एक दिवस आत आला तेव्हा त्याला,हीनं, मुलं किती आहेत व केवढी मोठी आहेत, असं विचारलं. तो म्हणाला मॅडम सहा वर्षाची एक मुलगी अन 2 वर्षाचा मुलगा अशी दोन मुलं आहेत. मुलगी सिनियर केजीला होती. माझी बायको त्याला म्हणाली मुलीच्या नावानं पोस्ट ऑफिस मध्ये एक 5 वर्षाचं आर.डी. खातं उघड. दर महिन्याला दोनशे रुपये सरांकडून घेऊन त्या खात्यात करत जा. मला नंतर म्हणाली “लडका अच्छा है. उसको हर महीने, अपने लडकी के शिक्षण के लिए, दो सो रुपये दे दिया करो.” अशा अनेक प्रसंगाची मला आठवण येते. मी आय आय टीत जाऊन पीएच.डी करावं म्हणून तिने केलेला पाठपुरावा, ते मी करत असताना मुलांची व घरची तिने अंगावर घेतलेली जबाबदारी हे सगळं मला आठवतं. मी पीएच. डी. झाल्यानंतर शेगावला जाऊन तिनं केलेलं महाराजांच्या पोथीचे एका बैठकीचं पारायण मला आठवतं. ती माझ्या पाठीशी होती की माझ्याबरोबर स्वतःही पीएच.डी. करीत होती हे मला कधी कळलच नाही.

ज्या ज्या क्षणी काही कारणांनी मी थोडासा विचलित झालो की,” क्या हुआ?” असे विचारून लागलीच पाठबळ द्यायची. 2006 च्या एप्रिल मध्ये पाच वर्ष काम करून, रायसोनी सोडून, मी अमरावतीला स्वगृही परत

आलो व दुसऱ्या दिवशीच हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राचार्य म्हणून रुजू झालो. अगदी प्रामाणिकपणे सांगतो, पहिले दोन-तीन महिने माझं मनच एच. व्ही. पी. एम. मध्ये लागेना. थोडं उदास वाटायचं मला. करण नागपूरचं रायसोनी कॉलेज मोठं, पसारा मोठा, काम भरपूर. इथं अमरावतीला हे कॉलेज अगदी छोटं, नवीन सुरु झालेलं, काम फार कमी. दिवसभर काय करायचं हा प्रश्न. घरी आलो की माझ्या चेहऱ्यावर ते जाणवायचं. एक दिवस तिने सगळं मला विचारलं आणि म्हणाली “ रायसोनी से ज्यादा यहा तुम्हारी जरुरत है. यह कॉलेज नया है. लोग अच्छे, समाजसेवा करनेवाले है.अपना हाथ भी इस सेवा मे बटाओ. यहा स्टाफ नया है. ऊन को कैसा पढाना, कैसे सेमिनार लेना, सिखाओ. तो तुम्हारा दिल लगेगा.” आणि खरंच पुढच्याच आठवड्यात मी माझ्या पन्नास प्राध्यापकांची बैठक घेतली. त्यांना सांगितलं, दररोज तीन प्राध्यापकांनी एक एक तासाचं आपापल्या विषयावर लेक्चर द्यायचं. आम्ही सगळे म्हणजे मी, व इतर 49 प्राध्यापक वर्गात त्यांचे विद्यार्थी म्हणून बसू. तीन तास झाल्यानंतर, मी तिन्ही लेक्चरचं क्रिटिकल एनालिसिस सर्वांसमोर सांगीन. त्यातलं चांगलं वाईट सगळं. म्हणजे शिकवणाऱ्या प्राध्यापकाची विषयाची तयारी, भाषा, शिकवण्याची व बोलण्याची पद्धत, देहबोली, आय कॉन्टॅक्ट, आवाज हळू की मोठा, आवाजातले चढ-उतार कसे होते व कसे असावेत, हे सर्व मी सांगीन.

आमच्या तरुण प्राध्यापकांना ते फार आवडलं. ते सर्व तयार झाले. इव्हन टू फेस क्रिटिसीझम. 17 दिवस आम्ही तो कार्यक्रम राबवला. माझी सर्वांनी स्तुती केली. आमच्या प्राध्यापकांना त्यांचा फार फायदा झाला. पण त्यामागची प्रेरणा कोण ते मी आज सर्वांना सांगतोय. केवळ माझ्या बायकोच्या म्हणण्यानं हा उपक्रम मी हाती घेतला. अशा अनेक हृद्य आठवणी विसरण्यासाठी नसतातच. त्या सोबत घेऊन जगायचं असतं. त्या आठवणी हे आपलं पाठबळ ठरतात. हे मी अनुभवतो आहे. त्यामुळे वपुंनी म्हटल्याप्रमाणे प्राणाचं चैतन्य देणारी गेल्यानंतरचा मी बांबू झालो असलो तरी, माझी झटकणी झाली नाही. दररोजच ह्या न त्या कारणानं तिची आठवण मला होतेच. पण तिची पुण्यतिथी आली की प्रकर्षानं सगळं आठवायला लागतं. मग वाटतं, हे सगळं मनात असं साचवून ठेवण्यापेक्षा आपण कोणाशी तरी बोलावं. कोणालातरी हे सगळं सांगावं, म्हणून आजच्या तिच्या या तिसऱ्या पुण्यतिथीला हा लेखन प्रपंच,

# रॅंगिंग

तंत्र शिक्षण विभागातिल माझ्या 40 वर्षांच्या नोकरी पैकी तेरा वर्षे मी चार अभियांत्रिकी महाविद्यालयांचा प्राचार्य म्हणून काम केलं. त्यापैकी दोन शासकीय होती अन दोन खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालय होती. माझ्या सुदैवानं माझ्या या तेरा वर्षात कुठलाही गंभीर स्वरूपाचं रॅगिंगचा प्रकार किंवा केस, प्रकरण, उगवलं नाही. गंभीर म्हणजे अगदी विद्यार्थ्यांना रस्टिकेट करायचं किंवा त्या प्रकरणाची पोलीस मध्ये तक्रार करून द्यायची, संबंधितांना पोलिसांच्या हवाली करायचं, असं काही घडलं नाही. नाही म्हणायला अशी काही प्रकरणं उगवली की ज्यात मला समिती नेमून सखोल चौकशी करावी लागली. ती मी केली. त्याच्या प्रमाणात विद्यार्थ्यांना शिक्षाही केली. रॅगिंगची अनेक प्रकरण आपण वाचली आहेत अन ऐकली आहेत. रॅगिंगमुळे अनेक मुलांची करियर्स बरबाद झालेली आहेत. त्यामुळेच म्हटलं आहे की रॅगिंग, मग ते कुठल्याही स्वरूपाचं असो आणि कोणत्याही प्रमाणात असो अतिशय निंदनीय आहे. त्यामुळे काही चांगलं होऊ शकत नाही. रॅंगिंगची प्रत्येक कृती ही अशोभनीय व माणूसाच्या अत्यंत हलक्या चारित्र्याची साक्ष देणारी आहे.ते म्हणजे एक विकृत राक्षसी वृत्तीचं प्रदर्शन आहे. आणि अशा ह्या वृत्तीचा सर्वांनी सर्व ठिकाणी निषेधच केला पाहिजे. आता आता मागील काही वर्षापासून तर रॅगिंग बंद करण्यासाठी सरकारने कठोर नियम आणि कायदे केले आहेत. इतकेच नव्हे

तर आता सरकारने प्राचार्य अन कॉलेज च्या मॅनेजमेंटच्या लोकांना सर्व प्रकारच्या प्रतिबंधक उपाय योजना करणेबाबत कडक सूचना दिल्या आहेत. अतिशय गंभीर प्रकरणी पोलिसांकडे तक्रार नोंदवून संबंधितांवर पोलिस कार्यवाही करावी अशा सूचनाही दिल्या आहेत.

रँगिंगमुळे अनेक निरपराध, साध्या मुलांना आपलं करिअर अन् प्राण गमावलेले गमवावे लागले आहेत. आदरणीय सुप्रीम कोर्टाने तर सिव्हिल अपील नंबर 887 ऑफ 2009 मध्ये असा निर्णय दिला आहे ज्यात गाईडलाईन्स आर इस्युड फॉर सेटिंग अप सेंट्रल क्रायसिस हॉट लाइन अंड अँटी रॅगिंग डाटाबेस.ईनअँकॉर्डंस् वुईथ द ऑर्डर.युजीसी,,गव्हर्मेंट ऑफ इंडिया हँज देव्हलप्ड वेब पोर्टल, नॅशनल अँटी रॅगिंग हेल्पलाइन (UGC crisis Hot Line)24बाय7Toll free No. 1800-180-5522.( heipline@antiragging.in )

हा झाला कायद्याचा भाग. मला आलेल्या रॅगिंगच्या काही अनुभवानबद्दल लिहिण्यापूर्वी मी मूळ प्रश्नाबद्दल म्हणजे या रॅगिंगचा आपण पूर्णपणे बिमोड कसा करू शकतो, त्याला समुळ नष्ट कसं करू शकतो याबद्दल थोडंसं लिहितो. मी तेरा वर्षे चार महाविद्यालयाच्या प्राचार्य तर होतोच पण त्यापूर्वी ही तीन वर्ष मी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद येथे हॉस्टेल वार्डनही होतो. असे सर्वांचे मत आहे की शिक्षकांनी, प्राचार्यांनी, मॅनेजमेंट ने घेतलेल्या डिसिप्लिनरी ऍक्शननं हे कमी

होऊ शकतं. हे काही अंशी खरं आहे. कारण रॅगिंग घेणे हीच मुळात विकृती आहे,आणि ती विद्यार्थ्यांमध्ये का येते, त्यात काही करण्यासारखं आहे का याचाही विचार व्हायला पाहिजे. अगदी प्रवेश प्रक्रियेपासून प्रोस्पेकट्स-प्रवेश आर्जापासून, रॅगिंग, त्याच्या शिक्षेबद्दल, होणाऱ्या परिणामांबद्दल, विद्यार्थ्यांना माहिती देण्यात यावी. प्रत्येक महाविद्यालय अँटी रॅगिंग समित्या स्थापन करण्यात याव्यात. त्याबद्दल सूचनाफलकावर माहिती लावण्यात यावी, इत्यादी तर आहेच, पण माझ्या अनुभवावरून मला असं वाटतं की प्रत्येक महाविद्यालयातच हॉस्टेलमध्ये सीनियर विद्यार्थ्यांचे अँटी रॅगिंग स्कॉडस (समित्या) स्थापन करण्यात याव्यात. त्यात प्रत्येक शाखेच्या विभागाच्या विद्यार्थ्यांचा अन होस्टेल रेक्टर आणि वार्डन यांचाही आणि तसेच डे स्कॉलर्सचा ही समावेश असावा. बहूदा रँगिंगहे हॉस्टेल मध्ये आणि बहुधा रात्री होतं. त्यामुळे या सिनिअर विद्यार्थ्यांनी ग्रुप ग्रुप न^ रात्री होस्टेलमध्ये राऊंड्स घ्यायला हवेत आणि ते वेगवेगळया वेळी घेण्यात यावेत. रॅगिंग घेताना असे काहीजण त्यांना आढळले तर त्यांना कौन्सिलिंग करून, त्यांचा बायकॉट करून, समजावून, पटवून देण्याचा प्रयत्न करावा. कायदा हातात घेऊ नये. गरज पडल्यास प्राचार्यांना विभाग प्रमुखांना रिपोर्ट करावा. संस्थास्तरावर प्राध्यापकांच्या अँटी रॅगिंग समिती असतात. त्यातले सदस्य वारंवार रात्री वेळी-अवेळी असे राऊंड घेऊ शकत नाहीत ही

वस्तुस्थिती आहे. त्यामुळे ह्या अँटी रॅगिंग स्टुडंट्स स्कॉड्चा फार उपयोग होतो.

मला आठवतं 1995 जुलैत माझ्या मुलानं व्हीजेटीआय मुंबई येथे प्रथम वर्ष अभियांत्रिकीला प्रवेश घेतला. त्याला व्हीजेटीआय च्या होस्टेलमध्ये जागा मिळाली. 1995 च्या अगदी दोन-तीन वर्षे आधी व्हीजेटीआय होस्टेलमध्ये एक सिरीयस रॅगिंगचं प्रकरण झालं होतं. त्यानंतर, परिणामी, तिथल्या सिनिअर विद्यार्थ्यांनी निर्णय घेऊन विद्यार्थ्यांचं एक अँटी रॅगिंग स्कॉड स्थापन केलं. ते विद्यार्थी दरवर्षी होस्टेलमध्ये राऊंड घ्यायला लागले. मला माझ्या मुलांनी सांगितलं की त्यांना चार वर्षात व्हीजेटीआय ला कुठलही रॅगिंग झालं नाही किंवा त्यांनी पाहिलं नाही. ऐकलं नाही. त्याला स्वतःलाही कधी ते फेस करावं लागलं नाही. तो म्हणाला’’मी प्रथम वर्षात असतानाच आमचे सिनियर्स रोज हॉस्टेलमध्ये आळीपाळीनं राउंड घ्यायचे. मला काही त्रास आहे का इत्यादी विचारपूस करायचे त्यामुळे आम्हाला रॅगिंगचं टेन्शन कधी आलंच नाही. हे जर तिथे होऊ शकतं तर मग ते कुठेही साधलं जाऊ शकतं, ह्यावर माझा विश्वास आहे. मी स्वतः हॉस्टेलचा वार्डन होतो. मी माझ्या अनुभवावरून सांगतो की तुम्ही शिक्षक म्हणून, वॉर्डन म्हणून जर नेहमी विद्यार्थ्यांच्या संपर्कात राहिले पाहिजे. त्यांची नावं त्यांची शाखा लक्षात ठेवली, त्यांच्याशी जाता-येता बोलत राहिलं तर खेळीमेळीचे वातावरण तर निर्माण होतच पण तुमचा एक

आदरयुक्त वचकही निर्माण होतो. मी असंही पाहिलं आहे की आमचे बरेच प्राध्यापक मित्र फक्त क्लासरूममध्ये शिकवण्या पलीकडे विद्यार्थ्यांशी संबंध ठेवत नाहीत.इतका ईनडिफरन्स ते ठेवतात. त्यामुळे कॅम्पस मध्ये काय चाललं आहे हे सुद्धा बऱ्याच जणांना माहित नसतं. मग अशाने तुमचा वचक कसा राहणार? आदर कसा राहणार? शिस्त ही केवळ नियम न कायद्यानेच येत नाही. प्राध्यापकांचा विद्यार्थ्यांशी सुसंवाद असला तर कोणता मुलगा कसं वागतो हे त्यांना सहज कळू शकतं. प्राध्यापक व इतर कर्मचारी ही यात बरीच मदत करू शकतात वेळोवेळी प्राध्यापकांनी केलेलं कौन्सिलिंग, तसेच प्राचार्यांचा विद्यार्थ्यांशी संवाद, हे, खेळीमेळीचं वातावरण निर्माण करू शकतात. बरेच वेळा मी स्वतः कोणत्या वर्गाचे विद्यार्थी रॅगिंग घेतात व का घेतात हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. बहुतांशी आमच्याकडे सेकंड ईयर चे विद्यार्थी जास्त सहभागी असतात. मी काही सेकंड इयरच्या विद्यार्थ्यांना कारण विचारून पाहिलं. त्यातले बरेच म्हणाले की सर हमारी रॅगिंग हुयीथी इसलिये हमभी लेते.एका सेकंड इयरच्या बँच् नं जर समजूतदारपणा दाखवून अपने पर जो बिती ओ किसी और पर न बिती जाय असा स्टॅन्ड घेतला तर बराच सा प्रॉब्लेम कमी होऊ शकतो. त्यान्ना तसं समजावून सांगणं आवश्यक आहे. एकदा आमच्या अमरावतीच्या कॉलेजमध्ये बेस्ट ऑल राऊंडर विद्यार्थी निवडताना मी एका विद्यार्थ्याला प्रश्न विचारला की तुम्ही मुलं रॅगिंग का घेता, तो म्हणाला सर

नवीन येणारे विद्यार्थी धाडसी बनावे व वातावरणाशी त्यांनी समरस व्हावे म्हणून रॅगिंग घेणे आवश्यक आहे. मला खरंच माझी आय आय टी मधली फ्रेशर्स नाईट आठवते. त्याचा एक किस्सा मी इथं देतो आहे. (हे मी माझ्या एका दुसर्या लेखातही लिहिलं आहे. पण रॅगिंग संबंधित असल्यामुळे मला इथे परत ते देण्याचा मोह आवरत नाही)

अमरावती ईंजिनिअरिंग कॉलेजमध्ये नऊ वर्ष नोकरी झाल्यानंतर मला आमच्या तंत्र शिक्षण विभागाने आय आय टी बॉम्बे मध्ये एम. टेक च्या अभ्यासासाठी दोन वर्षासाठी पाठवलं. प्रवेश मी माझ्या बळावर मिळवला. माझं लग्नही झालेलं होतं अन मला तीन वर्षाची मुलगी होती, पण गेल्या गेल्याच आपल्या अभ्यासात व्यत्यय नको म्हणून मी पहिलं सेमिस्टर एकट्याने जायचं आणि होस्टेलमध्ये राहायचं असं ठरवलं. माझ्या बायकोलाही ते पटलं. मग मी आयआयटी पोस्ट ग्रॅज्युएट विद्यार्थ्यांच्या हॉस्टेल मध्ये प्रवेश घेतला. त्यात सर्व एम.टेक आणि पीएच.डी करणारे विद्यार्थी राहायचे. आम्ही नवीन लोकांनी हॉस्टेलमध्ये राहायला सुरुवात केल्यानंतर साधारण दहा-बारा दिवसानंतर सीनियर विद्यार्थ्यांनी फ्रेशर्स नाईटचं आयोजन केलं. आम्ही साधारण पस्तीस-चाळीस फ्रेशर्स होतो. सर्वांनी आवर्जून उपस्थित राहावं अशी सूचना कम निमंत्रणं आम्हाला मिळाली. संध्याकाळी आमच्या कॉमन हॉलमध्ये थोडा करमणुकीचा कार्यक्रम अन नंतर सर्वांची ओळख असा तो कार्यक्रम होता. व नंतर मेस

मध्ये सर्वांना फिस्ट आयोजित केली होती. सर्वजण जमल्यानंतर सुरुवातीला प्रत्येकानं समोर येऊन आपली पूर्ण ओळख करून द्यावी व त्याला आवडेल ते आयटेम करून दाखवावं असं सांगण्यात आलं. म्हणजे गाणे, डान्स, मिमिक्री, कविता पाठ यापैकी काहीही चालेल. मग कुणी गाणी म्हटली, कुणी सिनेअभिनेत्यांचे आवाज काढले. माझी पाळी आली तेव्हा मी माझी एक हिंदी कविता म्हणून दाखवली. कविता विनोदी नव्हती. थोडी गंभीर स्वरूपाची होती. पण ती सर्वांना आवडली. इतर काही कार्यक्रम झाल्यानंतर डिनरला जाण्यापूर्वी त्या कार्यक्रमाच्या कम्पेअररनं अनाउंस केलं की आता फ्रेशर्सची फॅशन परेड होईल. सालाबादाप्रमाणे त्या परेड मधून हॉस्टेल क्वीन निवडण्यात येईल. दोन सीनियर एम.टेक वाल्यांना ज्युरी म्हणून ठरविण्यात आलं. ते खुर्च्यांवर बसले. मध्यभागी दोन मोठे टेबल आणि त्याच्या भोवती आम्ही सगळ्यांनी हळूहळू चालत राऊंड घ्यायचा असं ठरलं. त्या दोन ज्युरींपैकी एक विर्दी नावाचा सरदार होता. मी दोन राऊंड मारले आणि बिर्दी म्हणाला" मिस्टर जाजू इज हॉस्टेल क्वीन ऑफ द इयर. त्यादिवशी मी एक काळा पेंट अन् वर ठिपक्या ठिपक्यांचा पांढरा मनिला परिधान केला होता. त्यावेळी मी शोले मधल्या अमिताभ बच्चन सारखे लांब केस ठेवायचो. तेव्हा ती फॅशनच होती.मला वाटलं कदाचित या सर्व गोष्टींनी मला होस्टेल क्वीन बनवलं. सर्वांनी टाळ्या वाजवल्या. नंतर डिनर झालं, आणि कार्यक्रम संपला.

दुसऱ्या सेमिस्टर मध्ये मला फॅमिली अकामोडेशन मिळालं म्हणून मी होस्टेल सोडलं. माझा पहिल्या सेमिस्टरचा निकाल खूप चांगला लागला. मग माझा आत्मविश्वास वाढला.दुसऱ्या सत्रात मी माझी बायको आणि मुलगी असे एका छोट्या कॉटर मध्ये शिफ्ट झालो. पुढे मार्च महिन्यात होस्टेल वन मध्ये म्हणजे आमच्या होस्टेलमध्ये हॉस्टेल डे साजरा होणार होता. त्यावेळी आमच्या होस्टेलचे सेक्रेटरी आणि त्याचे दोन मित्र मला निमंत्रण द्यायला माझ्या घरी आले. ते म्हणाले जाजू साहेब आपको और भाभी जी को कार्यक्रम को आना है. आपको तो आना जरुरी है, क्युकी प्राईजडिस्ट्रीब्युशन होता है, तब सबसे पहला प्राईज, हॉस्टेल क्वीन कोही दिया जाता है. थोडे कल्चरल प्रोग्राम है. बाद में डीनर है. हम अपने डायरेक्टर साहेब और कुछ विभाग प्रमुखकोकोभी बुलाते है. इसलिये जरूर अना जाजू साब. मी म्हटलं " शुअर. इट विल बी अ ग्रेट फन. विल कम डेफिनेटली" कार्यक्रमाच्या दिवशी संध्याकाळी मी माझी बायको मुलगी आम्ही हॉस्टेलला गेलो. आमचे डायरेक्टर प्रमुख पाहुणे होते. काही निमंत्रित अध्यापक आले होते. बक्षीस समारंभ सुरू झाल्यानंतर पहिलं नाव माझं पुकारण्यात आलं. मिस्टर जाजू द क्वीन ऑफ होस्टेल प्लीज कम.मी माझं प्राईज घेतलं. माइक वर गेलो. आणि मला दोन मिनिटे बोलण्याची संधी द्यावी अशी विनंती केली. आमचा अँकर म्हणाला " व्हाय नॉट? कम ऑन." मग मी माईक वर गेलो आणि म्हणालो की आता मी तुम्हाला माझ्या

निवडीचे रहस्य सांगतो. आणि त्याच्यासाठी मी दोन शेर म्हणणार आहे. पहिला शेर मिर्झा गालिब यांचा आहे आणि दुसरा माझा स्वतःचा. मिर्झा गालिब यांनी म्हटलं आहे-

“ आईना देख के मुंह अपना सा लेकर रह गए, हुजूर को अपना दिल न देने पर कितना गुरूर था,

काशीद को अपने हाथ से गर्दन न मारीये, उसकी खता नहीं है यह, तेरा कसूर था.

इसका मतलब यह है की हुजूर अपने आप को बहुत स्मार्ट और तीस मार का समझते थे. लेकिन जब उन्होंने आईना देखा तब अपनी सूरत देखकर वह अपना सा मुंह लेकर रह गए. उनको आईने पर गुस्सा आया और उन्होंने आईने को पत्थर फेंक कर तोड़ना चाहा. तब गालिब ने कहा है की भाई, तुम जैसे हो वैसे ही आईने ने लिखा है. वह तो एक संदेशवाहक यानी काशीद है.उस पर क्यों बिगड़ रहे हो?

दोस्तों इसके बाद मैं अपना एक शेर सुनाता हूं--

“ आईना देखकर अपने आप पर गुरुर आया, के इस बदसूरती पर भी हुस्न का सुरूर आया.

पर अंदर की बात बता देता हूं दोस्तों, के हमें ब्यूटी क्वीन चुनने में एक सरदार का दिल दिमाग काम जरूर आया.”

दोस्तों जिस दिन हमारी फैशन परेड हुई और मुझे हॉस्टल क्वीन चुना गया, वह चुनाव के जज हमारे सीनियर सरदार विर्दी थे. "

ते ऐकताच सर्व जेवण मोठ्याने हसायला लागले. तो सरदार वीर्दी, तोही ऑडियन्स मध्ये बसलेला होता. तोही हसायला लागला. टाळ्या वाजल्या. आणि मी मला मिळालेली एक सुंदर लेडीज पर्स घेऊन आपल्या जागेवर गेलो अन सर्वांसमोर माझ्या बायकोला मी ती पर्स भेट म्हणून दिली.

खरं म्हणजे हे ही रॅगिंगचे होतं. पण त्यात डिसेंसी होती. कुठलीही मर्यादा सोडण्यात आली नव्हती.पण बरेच वेळा हे रॅगिंग विद्रूप स्वरूप घेतं अन मग नियम कायदे करावे, पाळावे लागतात. पण तरी मला व्यक्तीश: असं नेहमी वाटतं की आई बाप, पालक, शिक्षक, प्राचार्य हे मुलांना योग्य मार्गदर्शन करून त्यांना रॅगिंगचे गंभीर परिणाम समजावून सांगून बरंच काही करू शकतात. आणि विद्यार्थ्यांना या रॅगिंग पासून दूर ठेवू शकतात.

# आनंद देण्यातला

साधारण पंचवीस तीस वर्षांपूर्वीची गोष्ट असावी. आम्ही म्हणजे मी, माझी बायको, मुलगा आणि मुलगी सर्वांनी मिळून अमरावतीहून माहूरला देवीच्या दर्शनासाठी जायचं ठरवलं.अमरावतीहून सकाळी साधारण आठ वाजता टॅक्सीने जायचं ठरवलं. आदल्या दिवशी रात्रीच माझ्या बायकोनं आमचा चौघांचा, ड्रायव्हरचा जेवणाचा डबा तयार करून ठेवला. ठरल्या दिवशी सकाळीच साधारण आठ वाजता निघालो. रस्त्यात पुसदच्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये थोडं थांबायचं होतं. फिजिक्स डिपार्टमेंट मध्ये माझे जुने मित्र प्राध्यापक शरद लाहोटी, जे माझ्या बरोबर पाचवी ते सातवी एकाच शाळेत होते, ते पुसदच्या इंजिनीरिंग कॉलेज मध्ये पदार्थविज्ञान विभागाचे प्राध्यापक होते. मी ज्या ज्या वेळी पुसद इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये भाषणासाठी, कार्यालयीन कामासाठी, परीक्षेसाठी जायचो तेव्हा शरदच्या घरी नेहमी जायचो. मुक्कामाला असलो तर त्याच्याकडेच राहायचो. त्यादिवशी आम्ही ठरवलं की माहूरला जाताना पुसदला शरद च्या घरी अर्धा-एक तास ब्रेक घेऊ. चहापाणी घेऊ आणि पुढे जाऊ. अकरा वाजेच्या दरम्यान आम्ही शरद कडे पोचलो. दोघांची कुटुंब एकमेकांना ओळखत होती व दोन्ही कुटुंबाची चांगली मैत्री होती. बोलण्या बोलण्यातच

बराच वेळ गेला. ते सर्वजण म्हणाले आता इथून जेवून जा. आम्ही म्हटलं आम्ही डबा आणलाय बरोबर. माहूरला जाऊन जेवू. शरद ऐकेच ना. नंतर वहिनीने स्वयंपाकाची तयारी केली. मग तिथे जेवून आम्ही पुढे माहूरला निघालो. माहूरला शांततेनं दर्शन वगैरे झालं. बराच वेळ थांबलो. संध्याकाळी साडेसहा वाजता परत यायला निघालो. मला वाटतं साधारण रात्रीचे नऊ वाजत आले असावेत. नक्की कोणत्या ठिकाणी ते आता मला आठवत नाही पण एका ठिकाणी कारच्या समोर रस्त्यावर दोन जण थांबण्यासाठी अगतिकपणे हातवारे करत होते. रस्त्याच्या बाजूला त्यांचा टेम्पो मोठा, सामान भरलेला कोलमडून पडलेला होता व एक माणूस बाजूलाच रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसला. मी आमच्या ड्रायव्हरला कार थांबायला सांगितलं. ती दोघं म्हणाली "साब एक्सीडेंट हो गया है. पिछेसे आनेवाले ट्रकने हमारा टेम्पो उडा दिया. एक आदमी करीब करीब मरने के कंडिशन मे खून से भरा पडा है. एक आदमी आगे के गाव मदत मांगने को गया है.साब हमको कुछ तो दो. आम्ही त्यांना पैसे द्यायला लागलो. ते म्हणाले साहेब हमारे पास पैसे है, पैसे नही चाहिये. हमको बहुत भूक लगी है. पास में खाने को कुछ भी नही साब. आजू बाजू कोई भी नही देखता. हमको कुछ खाने को दो, अशी गयावया करत होते. माझी बायको म्हणाली आपला सकाळच्या सर्व डब्बा तसाच आहे. यांना सर्व देऊन

टाकते. घरी गेल्यावर मी आपल्यासाठी करीन काहीतरी. मी म्हटलं खरंच देऊन टाक सर्व त्यांना.

आमच्या सौभाग्यवतीनं सर्व जेवण त्यांना देऊन टाकलं. मी ड्रायव्हर बरोबर समोरच बसलेलो होतो. त्या दोघांनी आम्हाला हात जोडून नमस्कार केला. त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव पाहिले, आणि आयुष्यात पहिल्यांदा देण्यातला आनंद काय असतो याची सखोल अनुभूती मला झाली. असं वाटलं आपलं पोट भरलं. मला बरेच वेळा त्या दोघांचा चेहरा अजूनही आठवतो आणि वाटतं किती साध्या साध्या गोष्टीत जीवनाचा आनंद दडलेला असतो. पण तो अनुभवायला आपण मुकतो.

एकदा अमरावतीला माझी बायको संध्याकाळी मार्केट मधून आटोरिक्षनं कॅम्पला आमच्या घरी आली. त्यावेळी अमरावतीत शेअरिंग आटो 3-3 रुपये सवारी घेऊन चालवायचे. ही आमच्या कॉलनी समोर उतरली. घरी आली. मी दार उघडलं तर मला म्हणाली “मैने आज आटो वाले को पाच रुपये दिये.” मी म्हणालो “अभी तो तीन रुपये लेते ना?’ ती म्हणाली “ हा. वापस दे रहा था तो मैने कहा रहने दो भैया. आप विश्वास नही करेंगे, दो रुपये कोई बडी बात नही, पर उसके चेहरे पर मैने जो देखा उसकी किमत दोन हजार रुपये से ज्यादा थी.” मी हसलो. ती नेहमी असं करायची. तिची ती थेअररीच होती. दारावर आलेल्या भाजीवाल्याशी ती कधी भाव किंवा घासाघीस करायची नाही. मला म्हणायची त्याच्या सर्व

भाजीपाल्याची किंमत पाचशे रुपये होईल सगळी विकली तरी त्याला शंभर दीडशे च्या वर काय मिळणार. त्यासाठी तो दिवसभर भटकतो. आणि त्यातूनही आमच्यासारख्या दहा-बारा बायांनी भाव करून वाचवले, तर आम्ही किती वाचवणार? वीस तीस रुपये सर्वांचे मिळून. पण त्या बिचाऱ्या चे शंभराचे 80 करणार. त्यापेक्षा घरात काटकसर करायला बऱ्याच जागा आहेत. कपडे, हॉटेल. मग गरीबा बरोबर च भाव कशाला करायचा? एवढंच नाही तर ती रेल्वे स्टेशनवर मला हामालाशी कधी भाव करू द्यायची नाही. ती नेहमी म्हणायची देण्यातला आनंद काय असतो हे अनुभवून पहा. मला ते पटायचं. वाटायचं, खरंच आपण मोठ्या मॉल्समध्ये खरेदी करताना, हॉटेल्समध्ये खाताना अव्वाच्या सव्वा पैसे देतो. तिथे एक रुपयाही कमी करा असं म्हणत नाही. आणि ह्या हात मजुरी करणाऱ्या, पोट भरेल एवढा रोजगार मिळवणाऱ्या गरिबांशी मात्र आपण घासाघीस करतो. चार रुपये वाचवण्याचा आनंद मनवतो. खरा आनंद देण्यात आहे. बऱ्याच जणी हास्यास्पद बचत करताना मी पाहिलं आही. रोज कामावर येणाऱ्या बाई ला आठवड्यातून एखाद-दोन वेळा सकाळचा चहा देताना सुद्धा, त्या आपल्या चहाबरोबर त्या बाईचा चहा करत नाहीत. आपल्या गाळलेल्या चहाच्या पत्तित थोडे पाणी, साखर आणि आचमनाला घ्यावं इतकं दूध टाकून, त्या बाईला चहा करून देतात. कुठल्या आनंदाला मुकतात, हे त्यांना कधी कळलेलंच नसतं. आताशा समाजात या बाबतीत मोठी जागृती व्हायला

लागली आहे हे मानलं पाहिजे. दिल्लीत गूंज म्हणून एक एनजीओ आहे त्यांच्या अनेक शाखा आहेत. त्यांची वेबसाईट आहे. ह्या गुंज चे कार्यकर्ते गरिबांसाठी अशी अनेक मदतीची काम करतात मुख्यतः वेगवेगळ्या ठिकाणाहून ते वापरलेले पण अजून वापरता येतील असे मुलांचे, माणसांचे, स्त्रियांचे कपडे जमा करतात.अंथरायचे, पांघरायचे जुने ब्लॅंकेटस ही जमा करतात. त्याच्यासाठी त्यांची बऱ्याच ठिकाणी केंद्र आहेत. या केंद्रावर येऊन आपण देऊ शकतो किंवा ते घरीही येऊन घेऊन जातात. मग ते अनेक गरजूंना, गरिबांना, फूटपाथवर राहणाऱ्यांना, ह्याचा वाटप करतात. यासाठी त्यांची फार मोठी यंत्रणा आहे अनेक स्वयंसेवक आहेत. ते सर्व वेळात वेळ काढून विनामूल्य हे काम करतात. हा खरच अत्यंत स्तुत्य कार्यक्रम आहे. मी एकदा असं वाचलं की औरंगाबादला ही अशी एक सेवाभावी स्वावलंबी मंडळी आहे जी रोजचा उरलेला सयंपाक किंवा त्या मध्ये उरलेले अन्न जमा करतात, त्याची व्यवस्थित चाचणी- तपासणी करून भुकेलेल्यांना आणि गरिबांना ते वाटतात. विनामूल्य. हा एक मोठा उपक्रम आहे.

देण्यातला आनंद काही वेगळाच असतो. मन भरून आणणार्या छोट्या छोट्या गोष्टीतून याची सुरुवात होऊ शकते. माझा जन्म खेड्यात एका साधारण परिस्थितीच्या कुटुंबात झाला. पण आमच्या आई-वडिलांकडून आम्ही अश्या बऱ्याच गोष्टी शिकलो. माझे वडील रोज संध्याकाळी गावाच्या एका टोकाला असलेल्या मारुतीच्या देवळात जायचे.

जाताना त्यांच्या बरोबर ते एक मोठी डब्बी बरोबर घ्यायचे. या डबीत भरडलेल्या बाजरीच्या कण्या अन त्यात मिसळलेली साखर असायची. असं मिश्रण भरून ती भरलेली डबी ते बरोबर न्यायचे. मला नेहमी कुतूहल वाटायचं की ते हे कशाला नेतात. आणि काय करतात त्याचं. एकदा मी मंदिरात त्यांच्याबरोबर गेलो. मारुतीचं दर्शन झाल्यावर ते देवळाच्या मागच्या बाजूला गेले. तिथे एक मुंग्यांचे वारूळ होतं. त्यांनी खिशातली डबी काढली अन त्या वारुळाच्या अनेक तोंडानवर अनेक बाजूला, त्यातल्या कण्या- साखर टाकली. त्यांचा हा रोजचा कार्यक्रम होता. मला कळत असल्यापासून तर ते वारले तोपर्यंत मी त्यांना हे करताना पाहिलं आहे. बाब फार मोठी नाही.पण मनाला भिडून जाण्यासारखी आहे. आमच्या खेड्यात धर्मशाळेत एक वृद्ध बाई राहायची. आम्ही तिला संताबाई असे म्हणायचो. ती नदीवर किंवा विहिरीवर कुणाचा पोहरा मागून आंघोळ करायची. कोणी दिलं ते खायची. कुठे कोणाला थोडीफार कामात मदत करायची. माझी आई रोज आमच्याबरोबर या संताबाई साठी आमची जेवणं झाल्यानंतर उरलेलं पाठवायची. कधी उरलं नाही तर एखादी भाकर टाकून आमच्याबरोबर संताबाई साठी पाठवायची. तिला हिवाळ्यात पांघरायला जुन्या गोधड्या किंवा जुने ब्लांकेट्स द्यायची. संताबाई बरेच वेळा आमच्या गावाला येणाऱ्या बाळा भाऊंचे पालखीबरोबर आषाढी एकादशीला पंढरपूरला जायची. तेव्हा जाताना, माझी आई तिला एखाद-

दोन लुगडी, थोडं खायचं सामान, थोडा चिवडा करून द्यायची. यातून तिला मिळणारा आनंद, आपण अनुभवल्या शिवाय आपल्याला कळायचा नाही. ज्यांच्याकडे भरपूर आहे त्यांनी दान केलं आणि ज्यांच्याकडे फारसं काही नाही त्यातलं त्यांनी थोडंसं दुसऱ्याला दान दिलं, यात फार फरक आहे.

अनेक सेवाभावी संस्था निघाल्या आहेत. ते गरजूंना औषध पाण्यापासून, अन्नधान्य, कापड- कपड्यांची मदत करतात. आर्थिक दृष्ट्या कमकुवत पण शिक्षणाची इच्छा आणि पात्रता असलेल्या विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करतात. हे खरच स्तुत्य आहे. पण जास्तीत जास्त लोकांनी हे केलं पाहिजे. यात काही अपेक्षेची, परतफेडीची आवश्यकताच वाटू देऊ नये. कारण त्या कृतीतला आनंदच आपल्याला सर्व देऊन जातो. देणं हे फक्त पैशाच्या स्वरूपात किंवा वस्तूंच्या स्वरूपातच हवं असं नाही. आपण आपल्या चांगल्या कल्पना दुसऱ्यांना देऊ शकतो. आपला वेळ दुसऱ्यांना देऊ शकतो. त्याची मदत करू शकतो. कुणा गरजूला, अपंगाला, म्हाताऱ्यांना रस्ता पार करायला, त्याचा हात धरून मदत करणं हेही एक प्रकारचं देण्ंच झालं. यातूनही आपल्याला अतीव आनंद मिळतो. कोणाला स्मित देणं, चेहऱ्यावर हसू ठेवणं आणि हसून बोलणं, एखादा प्रेमळ शब्द बोलणं, किंवा बोलक्या चेहऱ्याने पाहणं, हे ही काही तरी देण्यासारखंच आहे. अत्यंत साध्या सोप्या गोष्टी आहेत ह्या. पण त्या आपण अनुकरणात आणल्या पाहिजेत. त्यातला आनंद अनुभवता आला पाहिजे. आणि हे

सगळं निरपेक्ष केलं पाहिजे. परमेश्वर त्याची नोंद ठेवतो. म्हणून म्हणतात ना की ‘जो देत है वह पाता है’ आनंद तर मिळतोच पण ईश्वर अनाहुतपणे कधीतरी त्याचं फळ आपल्या पदरात टाकतो. परमेश्वराचे गणित हे असं असतं. कर भला तो हो भला. आणि हे काही नाही दिलं देवानं, तरी देण्यातला आत्मिक आनंद आपल्याला मिळालेलाच असतो.

# एका प्रसन्न व्यक्तिमत्वाचा अंत

विदर्भ महाविद्यालय अमरावती चे माजी प्राचार्य डॉक्टर एस. एन.जाजू हे माझे मोठे भाऊ. दिनांक 27 जानेवारी 2016 ला अमरावतीहून नागपूरला जातांना भाऊच्या कारला कोंढाळी जवळ प्राणघातक अपघात झाला. सोबत सौभाग्यवती वहिनी होत्या व ड्रायव्हर होता. ड्रायव्हरला फारसं काही लागलं नाही. वहिनींना बऱ्याच जागी मुका मार लागला. पण भाऊंच्या मणक्याच्या वरच्या बाजूला जबरदस्त मार बसून वरचे दोन मणके डिस्प्लेस झाले. हात पाय सुन्न झाले. ते पहात बोलत ओळखत होते पण हात पायात हालचाल नव्हती. 28 जानेवारीला नागपूरच्या न्यूरॉन हॉस्पिटल मध्ये त्यांच्या मणक्याचं, दोन तासाचं कठीण ऑपरेशन झालं. परमेश्वर कृपेने ते ऑपरेशन यशस्वी रित्या पार पडलं. पण डॉक्टर म्हणाले यांची रिकवरी फार हळूहळू होईल. आणि साधारण तीन-चार महिन्यांनी हाऊ ही इज प्रोग्रेसिंग हे खरं कळेल. ते 28 तारखेपासून चार-पाच दिवस ते आय सी यु मध्ये होते. नंतर त्यांना रिकवरी रूम मध्ये हलवण्यात आलं. भाऊ पाहयचे, बोलायचे, येणाऱ्यांना व्यवस्थित ओळखायचे पण हातापायांच्या बोटाची अजूनही हालचाल होत नव्हती. मंगळवार दिनांक 9 फेब्रुवारीला त्याच्या

हृदयाचा रक्तपुरवठा थांबून त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन त्यांचा प्राण गेला. आम्हा सर्व कुटुंबीयांवर नियतीने घातलेला हा क्रूर आघातच होता. 76 वर्षांच्या आयुष्यात एकही दिवसासाठी, कोणत्याही आजारासाठी, कधीही, कोणत्याही हॉस्पिटल मध्ये ॲडमिट नव्हावं लागणाऱ्या भाऊंना शेवटी काळानं असं अकस्मात हिरावून नेलं.

पंधरा महिन्यांच्या अंतराने माझ्या जीवनाला आकार आणि आधार देणाऱ्या दोन महत्त्वाच्या व्यक्तींचा अंत झाला. पंधरा महिन्यापूर्वी माझी पत्नी वारली अन परवा भाऊ. पत्नी वारल्या नंतर बरेच दिवस (अजूनही) तिच्याबरोबर काढलेल्या साडे पंचेचाळीस वर्षांचा अंतःपट माझ्या डोळ्यासमोरून सरकत होता,आणि सरकत आहे. मंगळवारी भाऊच्या निधनाची बातमी कळल्यानंतर पुण्याहून अमरावतीला येईपर्यंत ट्रेनमध्ये माझा डोळ्याला डोळा लागला नाही. अन मला चालता बोलता यायला लागलं तेव्हापासून माझ्या पायावर जीवन जगायला उभा राहीपर्यंत आणि नंतरचाही, भाऊ बरोबर काढलेला काळ माझ्या डोळ्यासमोरुन सरकू लागला.

बुलढाणा जिल्ह्याच्या एका तिन हजार वस्तीच्या खेड्यात एका साधारण परिस्थितीच्या कुटुंबात आमचा जन्म झाला. घरात आई वडील काका आम्ही चार भाऊ आणि तीन बहिणी असं कुटुंब. सरळमार्गी, कुणाच्या अध्यात न मध्यात असलेलं. परिस्थिती यथातथाच. गावात फक्त

चौथीपर्यंत शिक्षणाची सोय होती. मला आठवतं, भाऊ चौथीपर्यंत आमच्या गावातच शिकले. ते चौथी पास झाले तोपर्यंत मी शाळेत गेलो नव्हतो. पण मला अजून आठवतं, आमच्या गावात एक सदाशिव भाऊ दंडे म्हणून डिप्लोमा इन सिव्हील इंजिनिअरिंग शिकलेले, रेल्वेत नोकरी करणारे, आमच्या खेड्यातले पहिले ग्रॅज्युएट विष्णू दादा दंडे, हे, त्यांच्या सुट्ट्यांमध्ये गावाला आले की आमच्या वडिलांनाही सारखं वाटायचं की आपल्या मुलांनीही असंच शिकावं, मोठी नोकरी मिळवावी. आमच्या सर्वात मोठ्या भावावर ( ते आता 87 वर्षाचे आहेत ) लहानपणीच कुटुंबाचा भार पडला अन ते चौथीपर्यंत शिकले. पण श्रीकिसन भाऊ चौथी पास झाल्याबरोबर ह्याच्या शिक्षणाची पुढे काहीतरी व्यवस्था करावी म्हणून आमचे वडलांची धडपड सुरू झाली. मेहकरला आमच्या आत्याची दोन, लग्न झालेली मुले राहायची. त्यांना विनंती करून श्री किसन भाऊ ला पाचवीसाठी मेहकर च्या शाळेत टाकलं. तिथे त्यांची फार ओढाताण व्हायची. अन मग सातवी ते आठवी ते चिखलीला शिकले. तिथे आमच्या आईच्या आतेभावाकडे रहायचे. त्या मामाच्या दोन मुली होत्या. एक भाऊ पेक्षा मोठी अन एक भाऊच्या बरोबरीची. धाकटी फार तापट स्वभावाची आणि खोडकर. तिचाही भाऊ ला खूप त्रास व्हायचा. ती खूप जिद्दी होती आणि म्हणून आठवीपासून च्या शिक्षणासाठी भाऊ पुढे बुलढाण्याला हायस्कूल ला गेले. तेथे तरी राहण्याची व्यवस्था कुठे होती? आमच्या खेड्याच्या व आमच्या

घरासमोर राहणाऱ्या एक मारवाडी ब्राह्मणाचे कुटुंब बुलढाण्याला राहायला गेलं होतं. त्या ब्राह्मणी बाईंना आम्ही भोजाई म्हणायचो. त्या फार प्रेमळ पण कणखर होत्या. त्यांनाही एक मुलगी भाऊच्यच वयाची अन एक छोटा मुलगा होता. त्यांचं सगळं घर म्हणजे 18 फूट बाय 10 फुटाची एक खोली होती. त्या भोजाईंना विनंती करून भाऊची तिथे राहण्याची व्यवस्था वडिलांनी केली. दर महिन्याला आमचे वडील ह्या तीन-चार जणांना पुरेल इतकं अन्नधान्य आमच्या खेड्यावरून बुलढाणा ला आणून द्यायचे. तसेच भाजीपाल्यासाठी महिन्याला तीस चाळीस रुपये त्या बाईंना द्यायचे. आमच्या भोजाईचं काम अतिशय शिस्तीचं. सकाळी सकाळीच सार्वजनिक नळावरून भाऊ व तिचा मुलगा पाणी भरायचे. चार आठ दिवसात आजूबाजूच्या गुरांच्या कोठ्यावरून, डोक्यावर भाऊ शेण आणायचे. शनिवारी-रविवारी तर गावाच्या बाहेर संगम तलावावर जाऊन तिथेच झाडाखाली बसून भाऊ अभ्यास करायचा. स्वतःचे कपडे आठवड्याला तिथे धूवून वर काढायचे अन वाळू घालायचे. संध्याकाळी घरी परत. इतर दिवशी आठवड्यात तो रोज संध्याकाळी दोन तास आणि सकाळी दोन-अडीच तास असा अभ्यास करायचा. अशाही परिस्थितीत भाऊ शाळेत आठवी ते अकरावी पर्यंत पहिला दुसरा असायचा. शाळेतील एक अभ्यासू नियमित हुशार विद्यार्थी म्हणून ओळखला जायचा. त्याच्या शिक्षकांचा अन खास करून शाळेचे हेडमास्तर नामजोशी सरांचा तो आवडता विद्यार्थी

होता. अकरावी पास झाल्यावर महाविद्यालयीन शिक्षणासाठी भाऊ विदर्भ महाविद्यालय अमरावती येथे आला. तो अकरावी पास झाला त्याच वर्षी मी सातवी पास झालो. मी सातवीपर्यंत मामाच्या गावी शिकत होतो. तेव्हा मी माझ्या वडिलांना एक मोठे पत्र दिलं. मला आठवतं, बुलढाण्याच्या हायस्कूलमध्ये मला टाका इथे मामांकडे माझा नीट अभ्यास होत नाही असं मी त्या पत्रात लिहिलं. नाहीतरी भाऊ आता बुलढाणा सोडून गेलाच आहे तेव्हा त्याच बाईंच्या घरी मी भाऊसारखा राहीन. फक्त महिन्याचे धान्य तुम्ही पाठवा. माझ्या फीचं मी बघून घेईन वगैरे लिहिलं. तसं पत्र भाऊनंही बाबांना पाठवलं. मी अभ्यासात हुशार असल्याचं सांगितलं. बुलढाण्यात आला तर चमकेल असे त्या पत्रात लिहिलं. मला एकदा आमच्या आईने नंतर सांगितलं की आमच्या दोघांची पत्रं पाहून माझे वडील खूप रडले. पण परिणामी मला त्यांनी बुलढाण्याला पाठवलं. इथून भाऊंनी मला उभा करायचा जणू विडाच उचलला. तो सारखं मला प्रोत्साहन द्यायचा त्यामुळे मी आठवीत शाळेत तिसरा आलो. नववीच्या तिमाही तर मी तिन्ही सेक्शन मधून पहिला आलो. त्यामुळे मला एडेड च्या सोसायटीची वीस रुपये महिन्याची शिष्यवृत्ती मिळू लागली. त्या वेळच्या माझा महिन्याचा खर्च म्हणजे फक्त बारा रुपये. दहा रुपये फी, चाराण्याची पोस्टकार्ड, चार आणे हेअर कटींग चे, आठ आणे महिन्यातून फक्त एकच सिनेमा पाहायचा त्याचे. आणि एखादा रुपये इतर. उरलेले आठ नऊ रुपये मी आमच्या भोजाईंना

भाजीपाल्यासाठी द्यायचो. नववीत आल्यानंतर मला सतत भाऊ अमरावतीहून पत्र लिहून उत्तेजन द्यायच्या.” तू चांगला अभ्यास कर दहावीला वरच्या नंबर नी जर मेरिटमध्ये आला तर अमरावतीला विदर्भ महाविद्यालयांमध्ये तुला तीस रुपये महिन्याची किंग एडवर्ड मेमोरियल स्कॉलरशिप मिळू शकेल. त्यामुळे तुझे पुढचं शिक्षण घ्यायला मदत होईल. तू एसएससी होशील त्याच वर्षी मी बी.एससी होईन. चांगली नोकरी मिळवण्यासाठी मला एम. एससी. करणं आवश्यक आहे. परत घरचे लोक तुला खर्चाची अडचण दाखवून कॉलेजमध्ये पाठवणार. नाहीत. तेव्हा, खूप मेहनत कर.’’त्याची सारखी पत्र यायची. मी माझ्या प्रत्येक परीक्षेचे सर्व मार्कस त्याला कळवायचो आणि माझी प्रगती पाहून त्याला खूप आनंद व्हायचा. परमेश्वर कृपेने भाऊ बी. एससी. प्रथम श्रेणित पास झाला आणि मी एस एस सी ला नागपूर बोर्डातून 9 वा मिरीट आलो. पुढं माझ्या सुदैवानं विदर्भ महाविद्यालयांमध्ये माझ्या बॅचच्या ज्या विद्यार्थ्यांनी यूनिवर्सिटी ला प्रवेश घेतला, त्यात आमचा मेरिट पहिला, सुखदेव शेळके अनंतर 9वा असलेला मी वर होतो. मेरिट मधले दोन ते आठ नंबर नागपूरला शिकायला गेले. मग शेळके आणि मला 30 रुपये प्रति महाची के.ई.एम.. शिष्यवृत्ती मिळाली. आमच्या सुदैवानं पुढे त्याच वर्षी नॅशनल मेरिट स्कॉलरशिप सुरू झाली. आम्हाला दरमहा 60 रुपये मिळायला लागले. तिकडे भाऊला एम. एससी पार्ट वनला साठ रुपये प्रतिमहा फेलोशिप मिळाली.व तो पूर्व

वस्तीगृहाचा प्रिफेक्टही झाला. त्यामुळे आमच्या घरच्या लोकांवर चा आर्थिक बोजा जवळ जवळ काहीच नाही असा झाला. त्यावेळी साधारणत पन्नास-पंचावन्न रुपयात आमच्या महिन्याचा खर्च भागायचा आणि उरलेले पाच धा रुपये महिन्याचे, ते आम्ही जमवून ठेवायचो आणि सुट्टीत घरी जाताना ते भाड्यासाठी वापरत असू. पुढे एम. एससी. नंतर भाऊला विदर्भ महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून नोकरी मिळाली अन मला औरंगाबादच्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला. दुर्दैवानं त्यानंतर पाच महिन्यांतच माझे वडील वारले. घरची परिस्थिती अजूनही यथातथाच होती. मग भाऊंन मला सांगितलं, आता घरून पैसे मागत जाऊ नकोस. पुढची अडीच वर्ष मला तो अमरावतीहून दरमहा 70 ते 80 रुपये मनीऑर्डरने औरंगाबादला पाठवायचा. त्यावेळी त्याचा पगार होता फक्त 280 रुपये महिना. एवढेच नव्हे तर मी फायनल इयरला असताना तर त्यांचं लग्नही झालं होतं. तरीतो मला महिन्याला 70- 80 रुपये पाठवायचा. माझ्या जीवनाला खऱ्या अर्थाने आकार देण्यात आणि मला स्वतःच्या पायावर उभं करण्यात भाऊंचा फार मोठा वाटा आहे.

पुढे मी अमरावतीला अभियांत्रिकी महाविद्यालयात अध्यापक म्हणून रुजू झालो. मी त्याच्याच बरोबर राहायचो. पुढे भाऊ आणि मी मिळून घरची विशेष मदत न घेता माझं, माझ्या धाकट्या बहिणीचं आणि माझ्या धाकट्या भावाचं अशी तिन आणि दोन पुतण्याचं अशी पाच लग्न आम्ही

केली. त्यांचं काम अतिशय पद्धतशीर असायचं. काही करायचं असलं की तो डायरी व पेन हाती घेऊन पहिल्यांदा सगळा आराखडा लिहून काढायचा. मग तो लग्नाचा खर्च असो, एखाद्या प्रवासाला जायचं असो, सगळ आधी लिहिलेलं असायचं. एस्टिमेटेड असायचं. दैनंदिन खर्च काटेकोरपणे तो आपल्या डायरीत त्याच्या त्यादिवशी लिहून काढी.त्याला ती सवय होती. तीच सवय त्यानी आम्हाला लावली. तो सर्व काम अतिशय शांतपणे करायचा. कधीही घाई गर्दी नाही. कुठल्याही परिस्थितीत अडचणीत तो कधी इरिटेट व्हायचा नाही. हा एवढा मोठा अपघात झाला त्यावेळी त्याचं ब्लडप्रेशर नॉर्मल होतं असं डॉक्टर म्हणाले. एवढा धीराचा माणूस. त्याला जे वाटलं ते बोलून टाकायचचा.आत बाहेर एकच. कधी लपवाछपवी नाही.

प्राध्यापक म्हणून तर तो त्याचे विद्यार्थ्यांचा अतिशय आवडता शिक्षक होता. शिकवताना तयारीनिशी आणि मन लावून शिकवायचा. त्याचा मित्र समुदायिक प्रचंड मोठा. त्यांचे जवळचे मित्र म्हणजे प्राध्यापक आडगावकर, प्रा देवगावकर, विष्णु नाफडे, एम बी पाटील प्रा अंभोरे. एक प्रतिष्ठित, आदरणीय व्यक्ती म्हणून त्यांला समाजातही खूप मोठं स्थान होतं. आपल्या समाजामध्ये तो प्रिय आणि आदरणीय होता.

असं हे प्रसन्न व्यक्तिमत्व काळानं अकस्मात हिरावून घेतलं. त्याच्या आकस्मिक निधनाने सर्व कुटुंबीयांवर आणि खास करून वहिनीनवर वज्राघात झाला आहे. यातून सावरणं सोपं नाही. काळच काय ते ठरवेल.

गेल्या पाच-सहा दिवसांपासून सांतवना देण्यासाठी आणि आमच्या दुःखात सहभागी होण्यासाठी, नातेवाईकांची आणि मित्र मंडळीची गर्दी पाहिली की भाऊनी किती माणसं आयुष्यात जोडली होती याची कल्पना येते. ज्या माणसाने आयुष्यभर कोणाचं वाईट केले नाही, कुणाचं वाईट चिंतील नाही, अशा या अजात शत्रू माणसाला, त्याच्या आत्म्याला शांतीही मिळणारच. त्याची पुण्याईच एवढी होती. आमच्या सर्वांसाठी तो काय होता हे शेवटी माझ्या चार ओळीत लिहितो-----

***चांद रात की निरव शांती, झील का निश्चल अविचल जल,***
***यथा समय गंभीर,धीर और जल प्रपात सा हसना निर्मल.***
***वटवृक्ष की शीतल छाया, प्रकाश के दीपस्तंभ तुम,***
***अमिट अमर है यादे सारी, दूर दूर फैला परीमल तुम.***

शेवटी भाऊला माझी आणि आमच्या सर्व कुटुंबीयांची विनम्र श्रद्धांजली.

# सुपर विजन

2003 ला मी नागपूर जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग चा प्राचार्य होतो. अगदी फार थोड्या काळात त्या कॉलेजची नागपूरातलं एक अग्रगण्य इंजिनीरिंग कॉलेज म्हणून ख्याती झाली. शिक्षणाचा स्तर चांगला होता. सुविधा.अन स्टाफ ही चांगला होता. नवीन नवीन उपक्रम, सेमिनार्स, कॉन्फरन्सेस सारख्या चालत. एकदा आमच्या चेअरमन यांनी काही अमेरिकन एक्सपर्ट ना कॉलेज पाहयला बोलावलं. काही कोर्सेस साठी आम्हाला त्यांच्याशी कोलँबरेशन करण्याचा आमचा विचार होता. ते आणखीही काही संस्थांमधून भेट देऊन आले होते. आमच्याकडे दोन पूर्ण दिवस होते. त्यांच्यासमोर आम्ही आमच6 प्रेझेंटेशन दिलं. त्यांना सर्व कॉलेज व प्रयोगशाळा लायब्ररी इत्यादी सर्व दाखवलं. ते जायला निघाले त्या दिवशी मी त्यांना सोडायला त्यांच्याबरोबर एअरपोर्टला गेलो. अकॅडमिक चर्चा पूर्वी कॉलेजमध्ये झाली होती म्हणून सहज जाता जाता आणि बोलता बोलता मी त्यांना गाडीत विचारलं “ सर, व्हाट डिफरन्स दू यू फाईंड इन इंडियन वर्क कल्चर अंड अमेरिकन वर्क कल्चर? “ त्यांच्यापैकी एकानं क्षणाचाही विलंब न लावता मला एका वाक्यात उत्तर दिलं.ते खरंच चिंतन करण्यासारखं होतं. तो म्हणाला ‘ ‘इन जनरल,नो

अमेरिकन वर्कर रिक्वायर्स सुपर विजन, अँड नो इंडियन वर्कर कॅन वर्क विदाऊट सुपर्विजन. ‘कटू असलं तरी किती खरं बोलला तो. आपल्याकडे कुठलाही वर्कर असू दे, मग तो खालच्या लेव्हलचा चपराशी असो की त्या ऑफिसचा सर्वात मोठा साहेब असू दे. त्यांच्यावर सुपरविजन करणारा, नजर ठेवणारा, कुणीतरी लागतोच. त्याशिवाय ते काम होत नाही. झालंच तर पूर्ण होत नाही. पूर्ण झालं तर वेळेवर होत नाही. त्या दिवशी आणि त्यानंतर आजतागायत अशी अनेक उदाहरणं मी पाहिली आहेत. अर्थात या प्रक्रियेचा मी ही एक भाग होतोच. मग ते कुठल्या वयात का असेना, हे मला विसरून चालणार नाही.

माझा मुलगा व सून अमेरिकेला काही वर्ष शिकागोला असतांना मी व माझी पत्नी त्यांच्याकडे दोन अडीच महिन्यासाठी गेलो होतो. तिथे व्हीलींग म्हणून एका भागात आम्ही राहायचो. मोठी कॉलनी होती. बहुतांशी भाड्याने राहणारे भारतीय होते. तेथे समोर मोठे बगीचे होते. मेंटेनन्स चे काम एक वेगळं ऑफिस पाहायचं. तेही तिथेच होतं. मी रोज सकाळी फिरून आल्यावर घरासमोरच्या बागेत अर्धा तास तरी बसायचो. अगदी वेल मेंटेनड असा तो गार्डन होता. दर रविवारी सकाळी साडेसात आठलाच त्या गार्डन मध्ये दोन वर्कस यायचे. आले की ताबडतोब आपले कपडे वगैरे बदलायचे. अँप्रन, हातमोजे वगैरे घालून तयार व्हायचे. मग ते आणलेले गार्डन टूल्स काढायचे. आणलेले लॉन मुव्हर सुरू करायचे.

साधारण दोन अडीच तासात झाडांचं, रोपांचं, मेहंदीच कटिंग वगैरे करायचे.लॉन वरून मशीन फिरवायचे आणि नंतर तो झालेला कचरा मोठ्या बॅगजमध्ये भरून त्या बॅगज त्यांवच्या व्हॅनमध्ये लोड करून घेऊन जायचे. काम इतकं व्यवस्थित आणि तन्मयतेनं, भराभर करायचे की विचारू नका. सगळयात महत्त्वाचं म्हणजे, हे काम करताना त्यांच्यावर देखरेख करणारा माणूस किंवा मुकादम मी कधीच पाहिला नाही. ती माणसं पूर्ण जबाबदारीने विदाऊट एनी सुपर्विजन दर रविवारी ही कामं करायची. मी नेहमी पाहत राहायचो. आणि मग मला माझ्याच कॉलनीतला अमरावतीचा देखावा आठवायचा. मी अमरावतीला कॅम्पमध्ये मधुबन कॉलनीत राहतो. वसुधाताई देशमुख (माजी मंत्री) यांच्या घरासमोरच. आणि आमच्या घरासमोरच एक छोटा गार्डन आहे. आता वसुधाताईच तिथं राहत असल्यामुळे आणि त्या भूतपूर्व मंत्री असल्यामुळे, त्या गार्डन चा मेंटेनन्स बर्यापैकी आहे. पण रोजचा सीन मजेदार असतो. सकाळी साफसफाईला दोन बाया येतात. त्यांच्या हातात टोपली झाडू असतात. मग त्या गार्डनच्या कोपऱ्यावर बसून थोडावेळ तंबाखू खातात, मग त्या येऊन झाल्यानंतर थोड्या वेळानं एक सायकल वरून त्यांचा मुकादम येतो. मग तोही त्यांच्यात मिसळून दहा-पंधरा मिनिटं गप्पा मारतो. मग त्यांच्या सगळयांचा वरिष्ठ येतो, आणि म्हणतो “अरे ऐसे बैठे क्या हो? उठो. जल्दी से सफाई करो. और कचरा जमा करके मत रखना उसको जला दिया करो या फेक के आया करो.

ह्याच्या सूचना झाल्या की मग हळूच त्या बाया कामाला सुरुवात करतात. मग ते काम त्या त्यांच्या पद्धतीने करतात. हा सीन मी बरेच वेळा पाहिलेला आहे. आणि मग मला वाटतं त्या अमेरिकन एक्सपर्ट चा शेरा काही चुकीचा नव्हता. हे ह्याच लेव्हलंला नाही तर याच्या पुढच्या लेव्हलला व त्यांच्या ही पुढच्या लेव्हलला लागू पडतं. कोणीतरी आपल्या डोक्यावर बसल्या शिवाय आपण काम व्यवस्थित करत नाही. आपल्याकडे बहुतांशी ऑफिसेस मध्ये प्रत्येकाची आपली वेगळी जागा असते. तीही आजूबाजूला कपाट लावून किंवा पार्टिशन लावून किंवा क्युबिकल्स बनवून केलेली असते. हेतू हा की काम करताना एकमेकांशी बोलत किंवा गप्पा मारत बसू नये. त्यामुळे कामाला विलंब होईल. मी याच वर्षी सहा महिन्यापूर्वी परत कॅलिफोर्नियामध्ये काही महिने राहून आलो. तिथे फेसबुक या मोठ्या कंपनीमध्ये माझ्या पुतणीच्या मुलगा सर्विस ला आहे. एक दिवस त्याने मला व माझ्या मुलाला व त्याच्या कुटुंबाला फेसबुक कंपनी पाहण्यासाठी बोलावलं. चिकार मोठं, अनंत सोयी असलेलं, सुविधा असलेलं ते फेसबूकचं ऑफिस आणि तो परिसर होता. त्यांचे वेगवेगळे डिव्हिजन्स होते. त्या मुलाच्या बसण्याच्या जागी तो आम्हाला घेऊन गेला. प्रचंड मोठं ऑफिस होतं त्याच्या विभागाचं.शंभर-दीडशे कम्प्युटर, आय टी इंजिनियरस, छोट्या-मोठ्या पदांवरचे तिथे काम करत होते. पण एका प्रचंड हॉल मध्ये या दीडशे लोकांमध्ये कुठलंही पार्टिशन नव्हतं. कोणाचेही वेगळं

क्युबिकल नव्हतं.कोणाची वेगळी खोली नव्हती. जागा भरपूर, पण सगळे आपापल्या टेबलावर व कॉम्प्युटर वर खुले बसलेले. आणि एवढं असूनही कोणीही कोणाशी बोलत नव्हतं. अगदी समोरासमोर बसलेले दोघेही न बोलता आपापलं काम करत होते. आपल्याकडे असं होऊ शकेल काय? इतकी मोकळीक कामाला दिली तर अर्धा वेळ आमचा पान तंबाखू खाण्यात,अन आज राजकमल चौकात कुठला मोर्चा होता, गांधी चौकात काय गडबड झाली, ह्याच्या वर गप्पा मारण्यात जाईल. मग पुढचं सुपर्विजन, वर्क वेळेवर झालं की नाही पाहणारा, आलाच. नथिंग इज विदाऊट सुपर विजन.

अमेरिकेतील माझ्या दोन वेळच्या दोन वेगवेगळया ठिकाणी अडीच अडीच महिन्यांच्या वास्तव्यात मला आपल्या अन अमेरिकेतल्या तरुण पिढीतला फरक प्रकर्षाने जाणवला.हा फरक डिग्निटी ऑफ वर्क बद्दलचा, त्याच्याबद्दल तिथे खऱ्या अर्थानं तिथल्या तरूणांना कळलेलं आहे की कोणतंही काम हे हलकं नसतं. प्रत्येक काम महत्त्वाचं असतं. वर्क इज वर्शिप. हा त्यांचा कामाबद्दल समज. आपल्याकडे असं नाही. अशी हलकी कामं मी करणार नाही, ही काम मी करत बसलो तर लोक काय म्हणतील, लोक हसतील असे एक ना अनेक गैरसमज आमची तरुण मंडळी बाळगून आहेत. साधी बाजारातून भाजी आणायचं सांगितलं किंवा पिठाच्या चक्की वरून दळण आणायला सांगितलं तर आपल्या मुलांना लाज वाटते. अन

तेही आपल्याच घरची ती काम असून सुद्धा. आपण नाही गेलो तर आपल्या वडिलांना जावे लागेल हे माहित असून सुद्धा, ही मुलं काम करत नाहीत. याउलट अमेरिकेत चांगल्या चांगल्या कुटुंबातली मुलं आपला पॉकेटमनी मिळवण्यासाठी सांगाल ती काम करतात. उदाहरणं द्यायची झाली तर आठवड्याच्या शेवटी शनिवारी किंवा रविवारी तरुण मुलं हातात बागकामाची अवजारं किंवा कटर्स वगैरे घेऊन कॉलनीत ज्यांच्या ज्यांच्या घरी झाडं,रोपटी, छोटी बाग असेल तेथे जाऊन कटिंग करून किंवा कुंड्यांची उकरी करून 5-7 डॉलर्स मिळतात. एकदा मी नातवंडा बरोबर स्विमिंग पूल वर गेलो. तिथे काठावर एक तरुण, सारख्या फेऱ्या मारुन पोहणाऱ्या लहान मुलांकडे लक्ष ठेवत होता. चांगला विद्यार्थी वगैरे असावा. मी त्याच्याशी बोललो. म्हटलं "युव आर वर्किंग अँज गार्ड?" तो म्हणाला "येस. बट आय एम नॉट रेगुलर गार्ड. ओन्ली ऑन थ्री डेज ऑफ विक आय कम अंड वर्क हिअर फॉर टू आवर्स एव्हरी डे. आय गेट टेन डॉलरस" अशी छोटी-मोठी कामं करण्यात त्यांना मुळीच हलकेपणा वाटत नाही, लाज वाटत नाही. उलट ते आपल्या खर्चाचे पैसे स्वतः मिळतात. असे कित्येक तरुण पार्टटाईम टॅक्सी वगैरे चालून आपलं स्नातकोत्तर शिक्षणही चालू ठेवतात.

ह्या डिग्निटी ऑफ वर्क वरून एक मजेदार किस्सा आठवतो. मी आयआयटी मुंबईत पीएच.डी.करत असताना तिथल्या संगणक विभागातले

डॉक्टर सारडा यांच्याशी माझी चांगली मैत्री झाली. ते विदर्भातले. एकदा सहज ओळख झाली आणि तिचं रुपांतर घट्ट मैत्रीत झालं. ती अजूनही टिकून आहे. 1984 ला मी पीएच. डी. पूर्ण करून परत अमरावतीला आलो. त्याच वर्षी डॉक्टर सारडा ह्यांना कॅनडातील सेंट जॉन येथे न्यू ब्रूनस्विक विद्यापीठात दोन वर्षासाठी प्रोफेसर म्हणून बोलावलं. त्यांनी आय आय टी मधून दोन वर्षाची सबँटिकल सुट्टी घेतली व ते कॅनडाला सहकुटुंब गेले. त्यावेळी व्हाट्सँप वगैरे सोडाच पण साधी इमेल करणंही शक्य नव्हतं. तरी आम्ही दोघं एकमेकांना महिन्यातून निदान एक तरी पत्र पाठवायचो. मग तिथल्या एक-एका गोष्टीचं वर्णन करून ते मला पाठवायचे. त्यांच्या एका पत्रात त्यांनी मला लिहिलं होतं----

“ जाजूजी, क्या आप सोच सकते हैं की हमारे यूनिवर्सिटी की टॉयलेट लेट्रिन बाथरूम कौन साफ करता है? यह सब काम हमारे ही यूनिवर्सिटी के विद्यार्थी करते हैं. हमारे यहां हर साल जुलाई महिने में यह सफाई के काम के लिए यूनिवर्सिटी टेंडर्स बुलाती है. या, यह काम का ऑक्शन होता है. हमारे 25-30 विद्यार्थियों का एक ग्रुप भी यह टेंडर भरता है, या ऑक्शन में हिस्सा लेता है. वह काम करने के लिए. हमारे विद्यार्थियों के ग्रुप में अंडर ग्रेजुएट, पोस्ट ग्रेजुएट सभी प्रकार के विद्यार्थी रहते हैं.आमतौर पर प्रिफरंशियल बेसिस पर यह काम हमारे विद्यार्थियों को ही दिया जाता है. फिर रोज शाम, क्लासेस खत्म होने पर, इस ग्रुप के लड़के

अपने अपने सफाई के कपड़े पहन कर और सँनेटरी मटेरियल लेकर 3-3 या 4-4 के ग्रुप में अलग-अलग विंग्स के सैनिटरी ब्लॉक की सफाई करते हैं. साधारण डेढ़ दो घंटे में यह काम पूरा कर लेते हैं. और ऐसा करके हर एक लड़का ढाई, तिनसो डॉलर् हर महीने कमा लेता है. “ हे वाचून मला आश्चर्य वाटलं..आपल्याकडे जर विद्यार्थ्यांना ही कामं करायची सांगितली तर निषेधार्थ मोर्चे निघतील. आम्ही काय सफाई कामगारांची काम करायची का, असं मुलं म्हणतील. खऱ्या अर्थानं आपल्याला डिग्निटी ऑफ वर्क किंवा डिग्निटी ऑफ लेबर कळलीच नाही. त्याची जाणीव झाली अन आपण कोणतंही काम करायला मनाची तयारी ठेवली तर, मनानं आपण सशक्त होतो. कामातला व मेहनतीच्या आनंद काय आहे हेही आपल्याला अनुभवता येतं. आमच्या इंजिनीरिंगला आलेल्या प्रथम वर्ष इंजिनिअरिंगच्या सर्व शाखांच्या विद्यार्थ्यांना वर्कशॉप प्रॅक्टिकल हे अनिवार्य असतात. बरेच वेळा मला अनेक पालकांनी विचारलं की आमचचा मुलगा किंवा मुलगी तर कॉम्प्युटर किंवा इलेक्ट्रॉनिक्स किंवा सिविल इंजीनियरिंग ला आहे. त्याला पुढे वर्कशॉप काय कामाचं आहे? मग त्यांना वर्कशॉप अनिवार्य का करता? त्यातल्या त्यात मुलींना? वर्कशॉपमध्ये ते फिटिंग, कारपेंटरिंग, लोहारकाम वगैरे करताना त्रास होतो मग त्यांना हे अनिवार्य कशाला? मी बरेचदा ह्या प्रश्नांची उत्तरं दिलेली आहेत. एक तर प्रत्येक इंजिनीयरला छोटे-मोठे रिपेरिंग चं काम करता आलं

पाहिजे. नाहीतर त्यांना साधा पेंचीस किंवा स्क्रू ड्रायव्हर कसा धरायचा हे कळणार नाही, म्हणून हे आवश्यक आहे.अन अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ह्या वर्कशॉप प्रॅक्टिकल्स मधूनच त्यांना डिग्निटी ऑफ लेबर शिकवण्याचा आमचा प्रयत्न असतो.

अशी ही अनेक छोटी-मोठी निरीक्षणं आहेत. खऱ्या अर्थानं या सगळ्या, वर चर्चा केलेल्या गोष्टी, समजावून घेतल्या तर सर्व कसं सुरळीत व शिस्तीत होईल. आपण कुठलेही नोकरी किंवा काम हे आपल्या बॉस साठी, संस्थेसाठी किंवा मॅनेजमेंट साठी करतो आहे, ही भावना ठेवून केलं तर मग सुपरविजन ची आवश्यकता पडणारच. पण तेच काम जर आपण आपल्यासाठी करतो, आपलं ते काम आहे, त्याचाच आपल्याला मोबदला मिळतो, पगार मिळतो, अशी भावना व जाणीव ठेवून ते केलं, तर मग त्याला सुपरविजन ची गरजच भासणार नाही.

# तू असायला हवी होतीस

माझ्या तिन महिन्याच्या अमेरिकेतिल वास्तव्यानंतर गेल्या 12 ऑक्टोबरला मी पुण्याला परत आलो. माझा मुलगा पराग, तिन वर्षासाठी इन्फोसिसच्या एका प्रोजेक्टवर कॅलिफोर्निया ला गेला आहे. त्याच्याकडे राहायला म्हणून मी थोड्या दिवसांसाठी कॅलिफोर्नियाला गेलो. तिथलं हवामान, हिरवळ, मोठे पार्क्स आणि ह्या वयातही चालला फिरायला, रोड क्रॉस करताना, सोपं अन नियमबद्ध असल्यामुळे, नातवंडा च्या सहवासात अडीच-तीन महिने कसे गेले, कसे संपले, हे कळलं देखिल नाही. पण विशेष म्हणजे गेल्या सप्टेंबर मधले दोन प्रसंग माझ्या कायम आठवणीत राहतील. एक म्हणजे, पाच सप्टेंबरला माझ्या पंचवीस वर्षापूर्वीच्या विद्यार्थ्यांनी लॉसएंजलिस ला केलेला माझा सत्कार आणि 27 सप्टेंबरला माझ्या मुलगा, सुन अन नातवंडांनी साजरा केलेला माझा 75 वा वाढदिवस. मी कॅलिफोर्नियात प्लेझंटन इथं राहिलो. अत्यंत आनंदाची गोष्ट म्हणजे अमेरिकेत असलेल्या माझ्या बऱ्याच विद्यार्थ्यांपैकी बरेच जण त्या बे मध्ये राहतात. त्यापैकी जवळपास सगळेच माझे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती, येथील मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे मेरिटोरिअस

विद्यार्थी होते. त्यापैकी चार पाच जण तर मला माझ्या मुलाच्या घरी येऊन भेटले. त्यात माझा 1995चा विद्यार्थी अभिराम गुज्जेवार, 1993चा सुब्रमण्यम आणि मनोज राठी, 1995 चा प्रसन्न कुलकर्णी व 2004 चा आशिष कुलकर्णी हे आवर्जून लक्षात आहेत. यापैकी एक दोन जणांच्या घरी मी जाऊन आलो. पण माझी सगळ्यात महत्वाची भेट म्हणजे माझा 1994 चा विद्यार्थी प्रसन्न शानबाग याची. प्रसन्ना अमरावती विद्यापीठाचा 1994 चा मेकॅनिकल चा मेरिटचा प्रथम क्रमांकाचा विद्यार्थी. त्याने गेट च्या परीक्षेत 98.5 टक्के स्कोर करून बॉम्बे आयआयटी मधून डिझाईन मध्ये एम.टेक. केलं. पुढे त्यांनं तिन वर्ष पुण्याला एका कंपनीत काम केलं. गेली वीस वर्षे तो आपल्या कुटुंबासह अमेरिकेत लॉसएंजेलिस ला राहतो. तिथे तो डी. पी. सिस्टिम्स नावाच्या कंपनीत मोठ्या हुद्यावर काम करतो. तो माझा आवडता विद्यार्थी होता. गेली पंचवीस वर्षे तो माझ्या सतत संपर्कात आहे. मी जिथे राहत होतो ते प्लीझंट्न, लॉस एंजेलिस पासून पाचशे किलोमीटर अंतरावर आहे. मी मुलाकडे येणार हे कळल्यानंतर, मी,त्याच्याकडे यावं असा प्रसन्नाचा सारखा आग्रह होता. एवढंच नाही तर त्यांनी मला सांगितलं की सर तुम्ही माझ्याकडे फक्त एका दिवसासाठी आलेलं मला चालणार नाही. तुम्ही कमीत कमी चार पाच दिवस तरी माझ्या घरी राहिलं पाहिजे. त्याच्या आग्रहानं,अन प्रेमापोटी मी त्याच्याकडे 7 सप्टेंबरला रात्री राहायला गेलो अन 12 सप्टेंबरला सकाळी परत निघालो.

त्याने मला ह्या चार दिवसात सगळं लॉएंजलिस दाखवलं. सकाळी नऊ ते रात्री आठ नऊ पर्यंत आम्ही भटकायचो. घरी येऊन डिनर झालं की रात्री अकरा बारा वाजेपर्यंत आमच्या गप्पा सुरू असायच्या. प्रसन्न त्याची बायको नमिता आणि मुलं अनिष आणि आर्णव यांनी माझं इतकं आदरातिथ्य केलं की मी भारावून गेलो. विशेष म्हणजे आठ सप्टेंबर च्या सकाळी ब्रेकफास्ट वगैरे झाल्यानंतर त्यांच्या हॉलमध्ये मला त्यांनी सोफ्यावर बसवलं अन तो, नमिता आणि मुलं यांनी शिक्षक दिनानिमित्त माझा सत्कार केला. ते नवरा-बायको इंग्रजी हिंदी व मराठी तिन्ही भाषेत उत्तम कविता लिहितात. त्या दोघांनी माझ्यासाठी वेगवेगळ्या दोन कविता लिहिल्या होत्या. त्या एका आकर्षक फ्रेम मध्ये फ्रेम करून मला दिल्या. त्याशिवाय एक उत्कृष्ट शिक्षक असल्याचं स्मृतिचिन्ह, सहा प्रथितयश लेखकांची पुस्तकं, मला भेट म्हणून दिली. त्या सगळ्या सत्काराने माझ्या डोळ्यात पाणी आलं. मला गदगदून आलं. त्यांच्या कडचं, माझे चार दिवसाचं वास्तव्य माझ्या नेहमी लक्षात राहील.

12 सप्टेंबरला सकाळी बारा वाजता मी जेव्हा परत माझ्या मुलाकडे परतलो, तेव्हा मला भरभरून आलं. आणि त्याला व सुनेला सगळं सांगितलं. ती दोघंही दुपारी त्यांच्या कामाला लागल्यावर मला प्रकर्षानं अन तीव्रतेनं माझ्या बायकोची आठवण झाली. वाटलं आज ती हवी होती. माझ्या यशात तिचा खरा काय वाटा आहे हे पुरतं माझ्या मुलांना,

विद्यार्थ्यांना, नातेवाईकांना, कोणालाही माहीत नाही. गेल्या पंचवीस वर्षात मी महाराष्ट्रातल्या वेगवेगळया अभियांत्रिकी महाविद्यालयात जवळ जवळ 175 इन्व्हाईटेड टॉक्स दिली आहेत. ज्या ज्या वेळी मी टॉक ला जायचो त्या त्या वेळी तिथे माझ्या झालेल्या सत्काराची, कौतुकाची माझी बायको साक्षी होती. घरी आल्यावर माझी शाल, स्मृतिचिन्ह हातात घेऊन," क्यू कैसा रहा आज का कार्यक्रम?" हे ती नेहमी विचारायची. मग माझी सविस्तर कथा मी तिला सांगायचो. नंतर तिने माझं केलेलं कौतुक आणि दिलेलं प्रोत्साहन ह्या नेहमीच्या ठरलेल्या गोष्टी झाल्या होत्या.लॉसेंजलिहून प्रसन्ना कडून परत आल्या आल्या दुपारी मला भावना अनावर झाल्या. समोर पडलेला कागद-पेन हातात घेतला. आणि लिहिलं----

" How I miss you "

How I wish, you should have been there to see my eyes filled with tears,

on the gratitude respect and honours which my students bestowed on, with love showers. for my share in their accomplishment and the success in their life.

But they are unaware of the share of my wife.

To give them whatever little I had and to teach and preach

You had been woman behind curtain and the beacon on beach.

I rowed the boat and walked with your support to me,

I performed on stage with the costume you put on me. with the makeup you put on my face,

With the inspiration and energy and clap at every pace.

The script written by God and performed by me, could not have been successful without backstage support of thee.

Whatever I achieved, I owe it to you,

With my heart and soul, I dedicate it to you.

For, I know what was your share, perhaps, my children and students and all unaware.

You had been there and you are still nearby, though not on earth but like a star in the sky पेन खाली ठेवलं आणि डोळे पुसले.

आज तिचा मृत्यू होऊन चार वर्षे झालीत. गेली चार वर्षे मी जगतो आहे. व्यवहार अर्थानं सगळं मजेत चाललंय. पण व पु काळे यांनी म्हटल्याप्रमाणे संवाद हरवला आहे. आणि संवाद हरवण्याचं क्षणाक्षणाला

होणारं दुःख प्रकट करता येत नाही. ते भोगावंच लागतं. फक्त तेवढंच तुमच्या हातात असतं. आपल्या सर्व प्रकारच्या भावनांना अभिव्यक्त करण्याचं, आपलं अंतकरण सुख-दुःखात आनंदात अडचणीत हलकं करण्याचं एकमेव ठिकाण म्हणजे आपल्या बायकोचं किंवा नवऱ्याचं अंतकरण. तिथे कुठलाही पडदा नसतो. आणि म्हणून संवाद हरवला की रूढार्थानं नसलं, तरी सगळं संपलेलंच असतं.

तिच्या अनंत आठवणी बरोबर घेऊन आयुष्याच्या “ उम्र के इस चढाव का उतार “ मी पाहतो आहे. चालतो आहे. 27 सप्टेंबरला माझा मुलगा, सून, दोन्ही नातू आणि माझ्या सारखेच आपल्या मुलांकडे आलेले 13-14 भारतीय सीनियर सिटीझन (आणि तिथे माझे झाले मित्र) या सर्वांनी मिळून माझा 75 वा वाढदिवस थाटात साजरा केला. माझ्या नातवांनी तर तीन दिवस नेटवरून व डिक्शनरीतून माझं वर्णन करण्यासाठी 75 शब्द शोधून काढले. अर्थात त्यात, गूड हजबंड, नाइस पापा, केअरिंग दादा, असे शब्द होतेच. मी हसत हसत माझ्या मोठ्या नातवाला म्हणालो “अरे तुम्हारी दादी मुझे जो ॲडजेक्टिव्हज लगाति थी वह भी लिंख दो इस तुम्हारे पोस्टर पर. दादी मुझे जो ॲडजेक्टिव्हज लगती थी व ऐसे थे—मतलबी, निर्दयी,दुष्ट,ई. अगदी तिच्या तोंडून ही विशेषणं ऐकायला मला मजा यायची.

पण त्यादिवशी मला तिची अत्यंत आठवण येण्याचे कारण म्हणजे मला ती नेहमी म्हणायची की तुम्ही 75 वर्षाचे होईपर्यंत आणि मी सत्तर

वर्षाची होईपर्यंत मला काहीही होणार नाही. पण नियतीने आणि विधात्यानं वेगळंच काही ठरवून ठेवलं होतं. मला तिची नेहमी प्रकर्षाने आठवण होते ते तिच्या माणसं जोडण्याच्या हातोटीवरून. आयुष्यात ती माणसं जोडतच गेली. आम्ही अमरावती, औरंगाबाद, नागपूर, मुंबई, जळगाव अशा अनेक ठिकाणी राहिलो. प्रत्येक ठिकाणी तिनं माणसांचा गोतावळा जमा केलाच. शी हँड बीन अल्वेज व्हेरी मच ह्युमन टू एनीबडी, शी मेट. मला आठवतं, 1999 ते 2011 पर्यंत मी चार इंजिनीयरिंग कॉलेजचा प्राचार्य होतो. ह्या बारा वर्षात माझ्या गाडीवर 5 ड्रायव्हर्स झाले असतील. ती वारल्यानंतर या पाचही ड्रायव्हरचे मला फोन आले. ती नेहमी व्यक्तीश: आम्ही बाहेरगावी गेलो असताना, माझ्या ड्रायव्हरांची जेवणाची व्यवस्था पाहायची. सोय करायची. बऱ्याच वेळा स्वतःच्या ताटाला ताट लावून त्यांना जेवायला बसवल्याचं मी पाहिलेलं आहे. देण्यातला आनंद काय असतो हे मी तिच्याकडून शिकलो. माझ्या आधीच्या एका लेखात मी लिहिलं आहे की दारावर आलेल्या भाजीवाल्याशी ती कधीच भाव करायची नाही. रेल्वे स्टेशनवर मी हमाल ठरवतांना त्यांच्याशी बार्गेन केलेलं तिला आवडायचं नाही. नेहमी म्हणायची ये लोग 3-3 सुटकेस अपने सर पर लेकर ब्रिज चढकर प्लॅटफॉर्म से सामान लाते है, गाडी मे रखते है, या लाते है.ईसे क्या भाव करना? ईस तो सो-दोसो रुपये कम कीमत की मेरे लिये साडी लाया करो, या आपका शर्ट लाया करो. मग मला वाटायचं खरंच, इटालियन

हॉटेलमध्ये तीनशे रुपयाच्या सुपा वर आपण काही बोलत नाही. चुपचाप बिल देतो.अन गरिबांच्या, त्यांच्या मेहनतीनं मिळालेल्या पैशावर बार्गेन करतो. अशा अनंत आठवणी नेहमीच येत राहतात. पण त्या व्यक्त करता येत नाही. तिची पुण्यतिथी आली की वाटतं आज तरी मन मोकळं करावं. गेली चार वर्षे मी तिच्या पुण्यतिथीच्या दिवशी मन मोकळ करणारा लेख लिहितो, आणि अमरावतीच्या दैनिक हिंदुस्थान ला पाठवतो. मी त्यांना लिहतो की हा लेख माझ्या बायकोवर असल्यामुळे त्याला थोडा पर्सनल टच आहेच. तुम्ही वाचून पहा. तुम्हाला आवडला तर तो प्रकाशित करा. त्यात काही बदल करायचा असेल तर तो तुम्ही करू शकता. तो अधिकार तुम्हाला आहे. पण माझ्या सुदैवानं आमच्या दैनिक हिंदुस्थानाच्या मंडळीनं तो अधिकार कधी वापरला नाही. शेवटी एक इंग्रजी कवी डेव्हीड जॉन लव याच्या कवितेतिल काही ओळी आठवतात-------

Remember aii those happy days,
those times she called our own
in all those well loved places
where you now grieve alone.
But then there is that moment,
that time within the day,
When you feel she is beside you

In that old familiar way.
But as you turn to see her smile
or receive a tender touch,
There is only a dark shadow
of the one you loved so much.
And tears begin to fall in
that hole of deep despair,
And memories overwhelm you
more than your heart can bear.
But you smile and chat
amiably to family and friends
and hope they do not notice
your world is at the end.
( These are few lines from David John Loves poem, )

# मी बसवलेली नाटकं

जुलै 1966 रोजी मी अमरावतीच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात मेकॅनिकल डिपार्टमेंटमध्ये लेक्चरर म्हणून रुजू झालो त्याच दिवशी माझ्याबरोबर माझे चार-पाच मित्रही रुजू झाले. डिसेंबर महिन्यात होणाऱ्या आमच्या स्नेहसंमेलनासाठी नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात प्राचार्यांनी एक प्राध्यापकांची आणि विद्यार्थ्यांची बैठक बोलावली. त्यावर्षी आमच्या विभाग प्रमुखांना स्नेहसंमेलनाचा प्रभारी प्राध्यापक म्हणून नेमण्यात आलं. पण आमचे विभाग प्रमुख फार व्यस्त असल्यामुळे त्यांनी त्यांच्याबरोबर हे काम पाहण्यासाठी आमच्याच विभागातले प्राध्यापक एम. जी. देशपांडे यांना मुख्य सहकारी म्हणून निवडलं. मग त्या झालेल्या बैठकीत देशपांडे यांनी वेगवेगळ्या ऍक्टिव्हिटीज साठी प्रभारी प्राध्यापक निवडले. देशपांडे ही औरंगाबाद इंजिनिअरिंग कॉलेजचे विद्यार्थी होते व मला एक वर्ष सीनियर होते. त्यांनी औरंगाबादला मला दोन नाटकात काम करताना पाहिलं होतं. म्हणून इथे अमरावतीला स्नेहसंमेलन साठी त्यांनी नाटक माझ्याकडे सोपवलं. मग 1966- 67 च्या स्नेहसंमेलना पासून पुढील नऊ वर्ष मी अमरावतीच्या कॉलेजमध्ये नाटकं दिग्दर्शित केली, बसवली. ही नाटकं बसवताना मला जे अनुभव आले ज्या गमतीजमती मी

अनुभवल्या त्या मला अजूनही आठवतात. त्यांच्यापैकी थोडीसे अनुभव आणि गमती मी इथे लिहिणार आहे.

पहिल्याच वर्षी म्हणजे 1966- 1967 च्या स्नेहसंमेलन साठी मी पद्माकर डावरे यांच्या ’बदाम राणी चौकट गुलाम’ आणि ‘पांडव प्रताप’ ह्या दोन एकांकिका करण्याचं ठरवलं. त्या साठी आम्ही मुलांची निवड केली. आमच्या महाविद्यालयात मुलीं नसल्यामुळे आमच्या एका मॅडमच्या भाचीला आम्ही स्त्री पात्र करण्यासाठी विनंती केली. त्या दोन्ही एकांकिका चांगल्याच झाल्या. पुढे दुसऱ्या वर्षीच्या स्नेहसंमेलन साठी मी बाळ कोल्हटकर लिखित मुंबईची माणसं हे नाटक करायचं ठरवलं. ह्या नाटकात चार पुरुष पात्र आणि दोन स्त्री पात्र होती. त्यावेळी दिलीप लोथे हा आमचा नाट्य सचिव होता. तो फार उत्साही आणि खटपट्या होता. विदर्भ महाविद्यालयाचे प्राध्यापक लोथे यांचा तो मुलगा होता. आम्ही जेव्हा हे नाटक करायचं ठरवलं तेव्हा सगळयात पहिला प्रश्न हा पडला की आता ही दोन स्त्री पात्रं करण्यासाठी मुली कुठून आणायच्या? दिलीप म्हणाला “ सर माझी बहीण अल्का ही हिरोईन चं काम करेल. मी तशी माझ्या आई वडिलांची परवानगी घेतो. आणि तिचीच एक मैत्रीण म्हणजे, बापूसाहेब डोळयांची मुलगी अवंतिका डोळे आहे ती सारजा चं काम करेल. बापूसाहेबांना नाटकाची आवड आहे त्यामुळे ते नाही म्हणणार नाहीत. पण सर तुम्हाला माझ्याबरोबर त्यांच्या घरी येऊन त्यांना विनंती कराव‍ि लागेल.

“ मग दिलीपनं त्याच्या आईवडिलांची परवानगी घेतली आणि एक दिवस मला घेऊन तो बापूसाहेब डोळयांकडे गेला. तिथे आम्ही बापूसाहेबांना सगळं सांगून विनंती केली. बापूसाहेब म्हणाले " ठीक आहे, पण तुम्ही नाटकाच्या तालमी आमच्या बाजूलाच जे माई हर्षे यांचं बालमंदिर आहे तिथे घेतल्या पाहिजे." आम्ही म्हटलं आम्हाला तुम्ही माई हर्षे यांच्या बाल मंदिरासाठी परवानगी मिळवून द्या. ते म्हणाले ठीक आहे. मग आम्ही पुरुष पात्रांची निवड केली. आणि ठरल्याप्रमाणे आम्ही त्या बालक मंदिरात रोज संध्याकाळी सहा वाजता नाटकाच्या तालमी सुरू केल्या. दिलीप म्हणाला "सर ह्या वर्षी विदर्भ महाविद्यालयात परांजपे सर पु ल देशपांडे यांचे तुझ आहे तुझपाशी हे नाटक करणार आहेत. सर यावर्षी आपण त्यांच्या तोडीस तोड नाटक करून दाखवू. मी दिलीप ला म्हणालो " अरे परांजपे सर हे माझे प्राध्यापक होते व ते एक खूप चांगले नट व दिग्दर्शक आहेत. त्यांची बरोबरी करायचं आपण कशाला डोक्यात आणायचं? आपण आपल्या परीनं नाटक चांगलं बसवू आणि उत्तम रीतीने करू." आमच्या त्या नाटकासाठी दिलीप आणि अलका हे नाटकात सुद्धा भाऊ बहिणीचं काम करायला लागले. आमचा हिरो अगदी देखणा राम देसाई हा होता आणि अवंतिका ला मी सारजाचा रोल दिला. रामच्या वडिलांची भूमिका एक केशव मानवटकर म्हणून मुलाला तर रामच्या सासर्याची भूमिका श्याम लिमये ह्या मुलाला दिल्याचं मला अजूनही आठवतं.आमच्या सहाही पात्रांना अभिनयाची

जाण होती आणि त्यांना मनापासून ते नाटक करायचं होतं. म्हणून आम्ही रोज तीन तीन तास नाटकाच्या तालमी घेऊ लागलो. मुलं आणि मुली अगदी मन लावून पाठ करायच्या, अभिनय करायच्या, परत परत सांगितलं तर ते सांगितलेलं रिपीट करायच्या. साधारण महिनाभर आम्ही नाटकाच्या तालमी घेतल्या. आमच्या काही जणांचं ते संपूर्ण नाटक पाठ झालं. कोणीही कोणाचाही डायलॉग म्हणू शकत होतं परिणामी आम्हाला प्रॉम्टरची गरजच पडली नाही. ठरल्या दिवशी नाटकाला अमरावतीकरांची बरीच गर्दी आणि आमचे विद्यार्थी आणि प्राध्यापक यांची गर्दी होती. नाटक अतिशय उत्तम झालं आणि आमच्या एका महिन्याच्या मेहनतीचं चीज झालं.

आमचे त्यावेळचे प्राचार्य प्राध्यापक एम.व्ही. देशपांडे होते. त्यांनाही साहित्यात आणि नाटकात बराच इंटरेस्ट होता. विदर्भ महाविद्यालयाचे प्राध्यापक मधुकर आष्टीकर आणी त्यांची मैत्री होती. प्राध्यापक आष्टीकर यांनी बरीच नाटकं लिहिलेली आहेत. त्यापैकी काही पुस्तकं त्यांनी आमच्या देशपांडे साहेबांना वाचायला दिली. ती वाचून झाल्यानंतर देशपांडे साहेबांना ही आपणही नाटक लिहावं असं वाटायला लागलं. आणि त्यांनी खरंच एक एकांकिका " हृदय पालट " आणि एक तिन अंकी नाटक " देवाघरची वाट " लिहून काढलं. ज्या वर्षी आम्ही मुंबईची माणसं बसवलं त्याच वर्षी माझ्या एका मित्रानं देशपांडे साहेबांची एकांकिका बसवली. पण त्याच्या पुढच्या वर्षी देशपांडे साहेबांनी मला बोलावलं

आणि हे तीन अंकी नाटक तुम्हीच बसवा, असं त्यांनी मला सांगितलं. त्यांनी एकदा आमच्या सगळ्या विभागप्रमुखांना व मला त्यांच्या बंगल्यावर बोलून सर्वांसमोर त्या तीन अंकी नाटकाचं वाचन केलं. ते नाटक, देशपांडे साहेब साहित्यिक नसले तरी त्यांनी त्यांच्या परीने चांगलं लिहिलं होतं. त्या नाटकाची थीम थोडी वेगळीच होती. अपोलो म्हणून एक शास्त्रज्ञ होता आणि तो प्रयोग करून आपल्या यानाला घेऊन स्वर्गात जाणार होता, आणि आपल्याबरोबर तो आपली प्रेयसी तिची बहीण आणि तिचे आई वडील यांनाही त्या यानात घेऊन जाणार होता. मग त्याने केलेले प्रयोग, त्यांचं एकमेकांवर असलेले प्रेम, त्यांची ती स्वर्गाची वारी, ह्या सगळ्या गोष्टी नाटकात समाविष्ट होत्या. महत्त्वाचा भाग असा होता की त्या नाटकात एकेका अंकात 3- 3 प्रवेश आणि प्रत्येक प्रवेशासाठी वेगवेगळे सिन ऊभे करावे लागणार होते. उदाहरणार्थ पहिला प्रवेश शेठजीच्या दिवाणखान्यात तर इमिजेएटली दुसरा प्रवेश हा अपोलो च्या प्रयोगशाळेत, तर लागलीच तिसरा बगिच्यात किंवा बस स्टॉप वर. त्यामुळे आम्हाला फिरता रंगमंच लागणार होता. आमच्या देशपांडे साहेबांनी पुण्यात प्रभाकर पणशीकर यांची दोन-तीन नाटकं पाहून त्यात फिरता रंगमंच आणि सरकता रंगमंच कसा वापरला हे पाहिलं होतं. मग देशपांडे साहेब मला म्हणाले " जाजू तुम्हाला हे नाटक दिग्दर्शित करायचं आहे पण याच्या साठी लागणारा फिरता रंगमंचही तुम्हालाच आपल्या महाविद्यालयात तयार करायचा आहे.

कारण तुम्ही वर्कशॉप चे इंचार्ज अहात. आणि सर्व मंडळी तुमच्या हाताखाली आहे." मी त्यांना हो म्हटलं. आता माझी मोठी सर्कस सुरू झाली. आम्ही वर्कशॉप मध्ये एक, वीस फूट व्यास असलेली मोठी चक्री आणि त्यावर फळ्या लावून फिरता रंगमंच तयार करण्यासाठी डिझाईन तयार केलं. आणि वर्कशॉप मध्ये आमच्या वेल्डर, फिटर, कारपेंटर यांनी ते काम करायला घेतलं. तिकडे मी नाटकाची पात्र निवडली. त्यातही दो स्त्री पात्रं होतीच पण ती दोन्ही पात्र आमच्या देशपांडे साहेबांच्या मुलीच करणार होत्या, त्यामुळे स्त्री पात्राचं शोधन टळलं. पण ते देवा घरची वाट बसवताना मला खूप मेहनत घ्यावी लागणार होती, कारण त्यात काही गाणी, संगीत हे तर होतंच, पण प्रकाश योजना ही फार चॅलेंजिंग होती. उदाहरणार्थ स्वर्गात जेव्हा अपोलो, पोहचतो आणि त्याबरोबर असलेली हीरोइन आणि तीची बहिण आणि आईवडीलही पोहोचतात, त्यावेळी स्वर्गात त्यांना एकेका देवाच्या केबिन मध्ये जाऊन त्यांच्या भेटी घ्यायच्या असतात. जेव्हा ते प्रथमच चित्रगुप्त कडे जातात तेव्हा ते कोणत्या देवाचं केबिन आहे हे कळण्यासाठी देशपांडे साहेबांनी आम्हाला सांगितलं की, केबिनवर चित्रगुप्त असं न लिहता, एक चित्र लावायचं आणि एक उघडझाप होईल असा दिवा लावायचा. त्यांची आयडिया ही की जेव्हा अपोलो आणि त्याची मंडळी चित्रगुप्ताच्या केबिन समोर जाईल तेव्हा ते चित्र एकदा दिव्यानं दिसेल आणि दिवा विझला की गायब होईल. परत दिसेल परत गायब होईल. मग ती

हीरोइन ची बहीण म्हणेल, "अरेच्च्या चित्र आता होतं आणि झालं गुप्त. म्हणजे चित्र,गुप्त. चित्र,गुप्त असं म्हणत म्हणत अरेच्च्या हे चित्रगुप्ताचं ऑफिस आहे वाटतं." असे सगळे प्रकार होते. मग आमच्याच महाविद्यालयात संगीताचे ज्ञान असलेले, तबला- पेटीवाले प्राध्यापक यांनी संगीताची आणि गाणे बसवण्याची ची जबाबदारी घेतली. प्रकाश योजनेची जबाबदारी आमच्या विद्युत विभागाचे प्रमुख यांनी घेतली. आणि मी दिग्दर्शक म्हणून नाटक बसवू लागलो. वीस-पंचवीस दिवसात आमचं ते नाटक बऱ्यापैकी बसलं. मग आम्ही एक दिवस रंगीत तालीम घ्यायची ठरवली. पण तोपर्यंत आमचा फिरता रंगमंच तयार झाला नव्हता. आमच्या नाटकाचा दिवस उजाडला त्यादिवशी आमचा फिरता रंगमंच बनवून तयार झाला आणि आम्ही त्याला गॅदरिंग च्या स्टेजवर नेऊन फिट केलं. त्याच्यावर आमची काहीच तालीम झाली नव्हती. पण आमच्याकडचे ठेकेदार श्री विनायकराव जोशी यांनी त्या वीस फूट डायमीटर च्या स्टेजवर बरोबर सीन लावले. एका भागात शेठ्जीचा दिवाणखाना, एका भागात अपोलो ची प्रयोगशाळा आणि तिसऱ्या भागात एक बगीचा. नंतर त्या फिरत्या रंगमंचावर समोर एक फिक्सड स्टेज ही आम्ही ठेवलं होतं. ते त्याफिरत्यारंगमंचाच्या परिघाला लागूनच पुढे दोन फूट होतं. नाटकात एक रस्त्यावरचा सीन होता. आणि त्यासाठी ते आम्हाला लागणार होतं. त्या रस्त्यावर पंढरपूरचा रस्ता अशी एक पार्टी आम्हाला ठेवायची होती म्हणून

मी एक चार फूट उंचीचा स्टॅन्ड तयार करून त्याच्यावर 'पंढरपूरचा रस्ता' अशी पाटी लावून ती त्या सीनच्या वेळा फिरत्या रंगमंचाच्या पुढे फिक्सड रंगमंचावर ठेवण्याचं ठरवलं. रात्री नाटक सुरू झालं तेव्हा अंधार करून आम्ही ते फिरतं रंगमंच फिरवून सिन बदलायचो. ज्यावेळी रस्त्यावरचा प्रसंग दाखवला तेव्हा त्याच्यावर पंढरपूरचा रस्ता असं लिहिलेलं ते स्टँड आम्ही ठेवलं. तो सीन संपल्यानंतर ताबडतोब दुसरा सीन रंगमंच फिरवून आम्हाला आणायचा होता. आणि तो होता शेठजी चा दिवाणखाना. आता जसा रंगमंच फिरला शेठजी चा दिवाणखाना समोर आला. आमचे लाईट लागले. आणि फिक्सड स्टेजवर तो पंढरपूरचा रस्ता हा स्टॅन्ड तसाच राहिला. सगळं ऑडियन्स हसायला लागलं. मग मी धावत स्टेज च्या मागे जाऊन विंगेतून हात लांब करून तो स्टॅन्ड विंगेत त ओढला. अशा बऱ्याच गमती जमती त्या नाटकात घडल्या. पण अमरावतीत पहिला फिरता रंगमंच तयार करून यशस्वीरित्या वापरण्याचं क्रेडिट मात्र आम्हाला मिळालं.

मला आठवतं 1973 ला आम्ही डिसेंबर महिन्यात स्नेहसंमेलन साजर केलं. त्या स्नेहसंमेलना मध्ये आम्ही विश्राम बेडेकर यांचं " वाजे पाऊल आपुले " हे नाटक करायचं ठरवलं होतं. ते नाटक ठरवण्यापूर्वी आम्ही रीतसर विश्राम बेडेकर यांची परवानगी घेतली. नंतर आम्ही पाच पुरुष पात्रांसाठी आमच्या पाच चांगल्या विद्यार्थ्यांची निवड केली. त्या नाटकात दोन स्त्री पात्रं होती. पण एक स्त्री पात्र अगदी नगण्य आणि फार

थोड्या वेळासाठी नाटकात होतं. त्यामुळे आम्ही नाटकाचा तेवढा भाग गाळून टाकला. त्यांनी नाटकाच्या मूळ थीम वर काही मोठा परिणाम होणार नव्हता. मग राहिलं मुख्य स्त्री पात्र. त्याच्यासाठी आम्ही अमरावतीत स्त्री पात्र करणारी एक नाटकांमधली प्रोफेशनल मुलगी निवडली. ही मुलगी अतिशय जाणकार आणि चांगला अभिनय करणारी होती. ह्याच नाटकात तिनं एका वर्षापूर्वी कामगार कल्याण मंडळाच्या नाट्यस्पर्धेत हेच काम केलं होतं. आणि तिला त्यात राज्यस्तरावर रौप्य पदक अभिनयासाठी मिळाला होता. ह्या नाटकाची तालीम सुद्धा आम्ही अमरावती च्या मध्यभागी असलेल्या वनिता समाजात घ्यायचो, त्यामुळे त्या मुलीला यायला जायला फार सोपं झालं. मी रोज संध्याकाळी सहा ते दहा अशी नाटकाची तालीम घ्यायचचो. आमची मुलं फार उत्साही आणि अभिनयात कसलेली होती. थोडंसं सुद्धा काही चुकलं तर आम्ही ते पाच पाच सहा वेळा रिपीट करायचो. त्यामुळे आमच्या, रोज दोन अंकाच्याच तालमी व्हायच्या. कधी पहिला दुसरा तर कधी दुसरा तिसरा तर कधी पहिला तिसरा असे. त्या वर्षीचा आमच्या नाट्य सचिव हा सुरेश मगरकर हा होता. नागपूरचे प्रसिद्ध रंगभूषाकार श्री शंकरराव मगरकर यांचा तो मुलगा. आदल्या वर्षी त्यांनी 'काका किशाचा' या माझ्या नाटकात काकांची भूमिका खूपच छान केली होती." वाजे पाऊल आपुले" या नाटकात तो प्राध्यापक भगवंत यांची भूमिका करणार होता. आमची मुलं खूप मेहनतीने तालीम करीत होती. मी

वेळोवेळी त्यांना मला हव्या तश्या मुव्हमेंट्स आणि अभिनय करायला सांगायचो.काहीही कंटाळा न करता मुलं आणि ती मुलगी ते करायची. एकूण आमचं नाटक पंचवीस तीस दिवसात अगदी चांगलं बसलं. रंगीत तालीम ज्यादिवशी होती त्यादिवशी आम्ही ती कॉलेजच्या रंगमंचावर घ्यायची ठरवलं.आणि आमचे प्राचार्य आणि सगळे विभाग प्रमुख यांना रंगीत तालमीसाठी आमंत्रित केलं रंगीत तालमीच्या दिवशी आमचे मुलांनी आणि त्या मुलींनी पण अगदी उत्कृष्ट काम केलं आणि आमची रंगीत तालीम चांगली झाली आमचे प्राचार्यांनी आणि विचार विभागप्रमुखांनी आमच्या मुलांची खूप तारीफ केली मला आठवतं रंगीत तालीम संपून आमची प्राध्यापक मंडळी परत गेल्यानंतर आम्ही रंगमंचावरच आणखी काय काय दुरुस्त करायचं याचा विचार करायला लागलो चर्चा करायला लागलो त्यावेळी आमची हीरोइन चक्क माझ्या पाया पडून मला म्हणाली सर मला आणखी काहीतरी चांगल्या सूचना द्या सर. तुमची ही पाचही मुलं इतकं चांगलं काम करतात आहे की मी यांच्यापुढे फिकी पडते की काय असं मला वाटायला लागलं. सर तुम्ही मला आणखी मार्गदर्शन केले नाही तर तुमची ही पाचही मुलं मला अभिनयात खाऊन टाकतील असं म्हणून तिच्या डोळ्यात पाणी आलं. मी म्हणालो अग तू चांगलंच करतेस आणि तू तर याच नाटकात ह्याच कामासाठी कामगार कल्याण स्पर्धेत रोप्य पदक मिळवला आहेस मग मी तिला आणखी थोडे सूचना दिल्या

आमची एकूण सगळी टीम फार चांगली होती अमरावतीचे आताचे प्रसिद्ध समाजसेवी गोविंद कासट हे माझे त्याच बॅचचे मेकॅनिकल चेंज विद्यार्थी. गोविंद माझ्याच प्रोजेक्ट च्या बँच मध्ये असल्यामुळे तो मला अतिशय जवळचा होता. तो उत्साही होता. मग मी त्याला आमच्या नाटकाचं प्रॉपर्टी मॅनेजर केलं. आम्हाला नाटका साठी बरीच प्रॉपर्टी बाहेरून आणायची होती उदाहरणार्थ व्हील चेअर वगैरे. ती सर्व प्रॉपर्टी आमचे गोविंदनं नाटकाच्या दोन दिवसा अगोदर कॉलेजमध्ये आणून ठेवली आणि विंगेत अशा तऱ्हेने अरेंज केली की नाटकाच्या वेळी आम्हाला त्या त्या वस्तू अगदी जागच्या जागी मिळाल्या.ज्या दिवशी नाटक झालं त्यादिवशी आमची भट्टी खूप छान जमली आणि आमच्या प्राध्यापकांना विद्यार्थ्यांना आणि जे अमरावतीचे रसिक नाटक पाहायला आले होते त्यांना ते नाटक अतिशय आवडलं. एवढेच नव्हे तर आमच्या रंगभूषेत साठी खास नागपूरहून जे शंकरराव मगरकर आले होते व त्यांच्याबरोबर नागपूरची मातब्बर मंडळी पण म्हणजे गणेश नायडू रमेश आंबेकर मदन गडकरी हे लोकही आमचे नाटक पाहिला आले होते ह्या सर्वांनी अगदी मनापासून आमची तारीफ केली. हे नाटक आम्ही विदर्भ स्तरावर होणाऱ्या खोलकुटे ढाल स्पर्धेसाठी सुद्धा सादर खेळणार होतो. शेवटी जेव्हा ह्या स्पर्धेचा निकाल आम्हाला कळला तेव्हा आमच्या आनंदाला पारावार राहिला

नाही. आम्हाला विदर्भ स्तरावर या स्पर्धेत नाटकाला दुसरे बक्षीस आणि अभिनयाचं पहिलं आणि तिसरे बक्षीस आमच्या दोन मुलांना म्हणजे सुरेश मगरकर आणि विनोद नागोरी ज्यांनी व्यंकू च काम केलं होतं त्यांना मिळाली. त्यामुळे आमच्या सर्व विद्यार्थ्यांनाही खूप आनंद झाला मी बराच वेळा बऱ्याच प्लॅटफॉर्मवर माझं भाषण देताना नेहमी सांगतो की आमचे इंजिनिअरिंगचे विद्यार्थी कलेत मागे नाहीत मग ते साहित्य असो नाटक असो गायन असो वादन असो ह्या सगळ्याला कलांमध्ये आमच्या इंजिनिअरिंग च्या मुलांचा नेहमी सहभाग असतो एवढच नव्हे तर अनेक स्पर्धांमध्ये आमची मुलं त्यांचाच अगदी उत्कृष्ट परफॉर्मन्स देऊन बक्षीस मिळवतात.मी जवळ जवळ नऊ वर्ष अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती मध्ये नाटकं दिग्दर्शित केली आणि माझी सर्वच नाटकं लोकांना खूप आवडली. पुढं अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद ला माझी बदली झाल्यानंतर तिथेही मी तिन वर्ष नाटकं दिग्दर्शित केली. तिथेही माझ्या नाटकांना माननीय साहित्यिक वसंत कुंभोजकर यांच्यासारख्यांनी उत्तम दाद दिली. अशीही माझ्या बसवलेल्या नाटकाची यशस्वी कहाणी आहे.

# अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अतिरेक

आमच्या देशात बोलण्याच्या आणि अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याला मर्यादा नाही. कोणीही काहीही बोलू शकतो. व्यक्त करू शकतो. ह्या स्वातंत्र्याला मर्यादा घालायची, मर्यादा पाळायची आता वेळ आली आहे. कारण कुणीही उठसुठ बेछूट बोलायला लागला आहे. ह्या विषयावर मी का लिहितो आहे आणि काय लिहितो आहे, त्याच्याशी माझा काय संबंध आहे हे लिहिण्याआधी मी माझ्या बद्दल थोडसं लिहतो आहे. मी कुठल्याही राजकीय पक्षाचा नाही. कोणत्याही पक्षाशि माझी बांधीलकी नाही. माझ्या 75 वर्षांच्या आयुष्यात मी सहादा मतदान केलं. ते पाच वेगवेगळ्या पक्षांच्या उमेदवारांना केलं. तो उमेदवार चांगला आहे, समाजासाठी, देशासाठी काहीतरी करेल अशी मनाची समजूत पटल्यावर मी ते मतदान केलं. ह्यावरून हे स्पष्ट व्हावं. माझ्या या लेखामागे कुठलाही राजकीय हेतू नाही. गेली एकावन्न वर्षे मी तांत्रिक शिक्षणाशी निगडित आहेत. दोन गव्हर्मेंट आणि दोन खाजगी अशा चार इंजिनीरिंग कॉलेजचा मी प्राचार्य म्हणून काम केलं आहे. इंजिनिअरींगच्या विद्यार्थ्यांना शिकवलं आहे. त्यामुळे वयाने जरी मी वृद्ध होत गेलो तरी कायम विद्यार्थ्यांच्या अन

तरुणांच्या संपर्कात मी होतो. अन आजही आहे. तेव्हा ह्य माझ्या विद्यार्थ्यांसमोर, तरुणांसमोर आपण सर्वांनी कुठले आदर्श ठेवले पाहिजेत आणि हल्ली आपण कुठले आदर्श ठेवतो आहे हा आजच्या संदर्भात माझ्यासाठी फार महत्त्वाचा विषय आहे.

गेली दोन वर्षे जर आपण मागे वळून पाहिलं,अन गेल्या तिन-चार महिन्यातल्या इलेक्शनच्या रणधुमाळी कडे गांभीर्याने पाहिलं तर आपल्या लक्षात येईल की बोलण्याच्या आणि अभिव्यक्तीच्या अमर्याद स्वातंत्र्याचा आपल्याकडील बरीच मंडळी दुरुपयोग करीत आहे, अतिरेक करीत आहेत. त्यात राजकारणी लोक तर आलेच पण दुर्दैवानं लेखक, कवी, कलाकार, भरकटलेले तरुण लीडर्स, इलेक्ट्रॉनिक सोशल मीडिया आणि काही अशी प्रिंट मिडिया असे सगळेच सहभागी आहेत. प्रत्येकाला आपली मतं असतात. आणि ती असावीत. ती त्यांनी व्यक्त ही करावीत.पण ज्या हलक्या, खालच्या,हीन पातळीच्या भाषेत ते बोललं जातं, व्यक्त केलं जातं ते सामान्य माणसांना अतिशय क्लेशकारक वाटतं. ते चुकीचा पायंडा पाडणारं वाटतं आणि तस ते ठरतंय. त्यामुळे आजच्या तरुण पिढीचं अतोनात नुकसान होणार आहे. त्यांच्या आदर्शांना, मूल्यांना जबरदस्त धक्का पोहोचतो आहे. त्यांना हे सगळे आदर्श हिंन, दिशाहिन करणारं ठरत आहे, याचा सर्वांनी गांभीर्यानं विचार केला पाहिजे. आपण बोलतांना, टीका करतांना कुठले शब्द वापरतो आहे, कुठली भाषा बोलतो आहे किंवा

लिहितो आहे, कोणाबद्दल बोलतो आहे ह्याचं तारतम्य ठेवूणं अतिशय महत्त्वाचं आहे. उदाहरणच द्यायचं झालं तर हे असले हलक्या दर्जाचे शब्द म्हणजे चोर, खोटारडे, चारित्रहीन, फेकू, औरंगजेब, देश बुडवे आणि आणखी काही लिहिता न येण्यासारखे शब्द. किंवा ' इस देश के टुकडे टुकडे कर देंगे ' 'खून खराबा होगा' ' या संस्था देश बुडव्या आहेत ' अशी वाक्यं, अशी भाषा ही या देशाच्या सर्वोच्च न्यायालया बद्दल, न्यायाधिशां याबद्दल, देशाच्या पंतप्रधानां बद्दल,रिसर्व बँक व निर्वाचन आयोग, वरिष्ठ निर्वाचन अधिकारी यांच्या बद्दल, सीबीआय बद्दल बोलली जाते. ज्या निर्वाचन आयोगाची इतर देश तोंडभरून स्तुती करत आहेत त्यांना शिव्या द्यायच्या, हे कितपत योग्य आहे याचा गांभीर्याने विचार झाला पाहिजे. ही पद्, ह्या संस्था यांची गरीमा सांभाळली पाहिजे. त्यांचा मान राखलाच पाहिजे. ही आपली श्रद्धास्थानं आहेत हे लक्षात ठेवले पाहिजे. उदाहरणच द्यायचं झालं तर देशाच्याच्या प्रंतप्रधानां बद्दल, मग ते मोदी असोत की मनमोहनसिंग असोत, राजीव गांधी असोत की देवेगौडा असोत, अशा व्यक्तींना किंवा आरबीआयचे गव्हर्नर यांना मग ते रघुरामन असोत की अर्जित पटेल असोत, सर्वोच्च न्यायाधीश यांना मग ते न्यायमूर्ती मिश्रा असोत की गोगई असोत, ह्यांना शिव्या देणं म्हणजे त्या सन्माननीय पदाला किंवा संस्थेला शिव्या देण्यासारखं आहे. जो पर्यंत ती व्यक्ती त्या पदावर आहे तोपर्यंत व्यक्ती आणि पद वेगळं करून चालणार नाही. म्हणून वरील

सर्व आदाराच्या स्थानांवर असलेल्या व्यक्तींबद्दल खालच्या पातळीची भाषा बोलू नये, लिहू नये.चुकीचं बोलाण्या, लिहण्यामुळं माझ्या असंख्य तरुण मित्रांच्या, विद्यार्थ्यांच्या या पदा बद्दलच्या आदराला धक्का पोहोचतो. त्यांची मूल्यं व मूल्यां वरची श्रद्धा जपणं हे अतिशय महत्त्वाचे आहे. हे सर्व राजकारणी लोकांनी, साहित्यिक लोकांनी म्हणजे लेखक-कवी ह्यांनी, कलाकारांनी, प्रिंट मिडिया आणि इलेक्ट्रोनिक मिडिया आणि सर्व संबंधितांनी आवर्जून लक्षात ठेवलं पाहिजे. नाहीतर आम्ही या पिढीचं फार मोठं नुकसान करीत आहोत हे त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे.

गेल्या दहा-पंधरा वर्षात मी महाराष्ट्रातल्या अनेक इंजिनिअरिंग कॉलेजेस मध्ये संबोधन परत भाषण ज्याला आपण मोटिवेशनल भाषण म्हणतो अशी जवळजवळ शंभर तरी भाषणं दिली आहेत. त्यात व्हॅल्यूज अँड कॅरेक्टर बिल्डिंग ह्या भागावर मी आवर्जून बोलतो. हा संवाद साधताना मी अनेक वेळा ह्या तरुण पिढीला सांगत असतो की " I know that the values have cosiderabiy degraded in our society and country.You see rampant corruption all aroud you..Your young generation, is not able to decide what is right and what is wrong.You are totally confused.You are not able to decide your role models.You are desperately searching the feet on which you can bow down your head and offer your

salutations. But believe me, still the system is running.That does mean that still there are good people in our society,in our country who have shoulders, strong enough to carry the burden of this degraded system. And as long as they are there,the turn around will definitely take place and again we will see golden days. So,please believe in the system. मी पुढे जाऊन त्यांना म्हणतो की या गढूळ झालेल्या पाण्यात मातीचं आणखी एक ढेकूळ टाकून तुम्ही त्याला जास्त गढूळ करू नका. ऍट लिस्ट यू डोन्ट बी द पार्टी टू इट. तेही तुमचं मौलिक कॉन्ट्रीब्युशन होईल.

आणि हे तरुण, हे सगळं श्रद्धेनं, आदरानं ऐकतात. आजही. कृपा करून त्यांच्या मूल्यांना, श्रद्धेला आणि त्यांना हानी पोहचवू नका. ही असली हीन भाषा, असले नासलेले शब्द, लिहू- बोलू नका. आपला कुठलाही स्वार्थ साधण्यासाठी त्यांच्या मूल्यांची आहूती देऊ नका. एवढं बोलण्याचं आणि अभिव्यक्तीचं स्वातंत्र्य आपल्याला असून, ते उपभोगलं जात असून, त्याचा अतिरेक केला जात असून, वर पुन्हा टॉलरंस आणि इंटॉलरंस च्या बोंबा मारणाऱ्या सर्वांना कळकळीची विनंती आहे की देशाची तरुण पिढी, देशाचे भवितव्य, बिघडवू नका. हा भस्मासुर तुम्ही उभा केलात, तर तो तुमची ही उद्या राख करायला मागेपुढे पाहणार नाही. आपल्या आपल्याला विकास हवा की विनाश याचा तुम्ही गांभीर्याने विचार

करा. मला याची पुरेपूर जाणीव आहे की बोलण्याच्या आणि अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याला कायद्याने मर्यादा घालता येत नाहीत. ते फार कठीण आहे. पण आपण स्वतः, स्वतःवर मर्यादा घातल्या आणि सर्व संबंधितांनी हे डेकोरम ठेवण्याचं पथ्य पाळलं तर, निश्चितच त्याचे चांगले परिणाम होतील. मला वाटतं ही खंत अनेकांच्या मनात असेल. निदान माझ्या पिढीच्या ज्येष्ठ नागरिकांना तर निश्चितच असेल. हे शल्य त्यांना बोचत असेल. अस्वस्थ करीत असेल.

# गोल्डन जुबिली

आठ नोव्हेंबर 2019 ला माझ्या बायकोचे मृत्यूला पाच वर्षे पूर्ण झाली. पाच वर्ष माझ्या बायकोची मला आठवण आली नाही असा एकही दिवस गेला नाही..ह्या न त्या कारणाने मला तिची रोज आठवण होतेच. पण आठ नोवेंबर आला की तिची आठवण प्रकर्षाने होते. मनात विचारांचं, भावनांच काहूर माजतं इतक्या त्या दाटून येतात. अन मग वाटतं यांना वाट करून दिल्याशिवाय हलकं वाटणार नाही. म्हणून दर आठ नोव्हेंबरला मी हा प्रपंच करतो. खरंतर मनाची अवस्था अशी असते की माझ्याच "जखम" ह्या हिंदी कवितेत मी लिहलं आहे, "मत

मत कापते हाथो मे मेरे लेखनी दो,
मत शब्द दो,नि:शब्द गीतो करो मेरे,
मै खो चुका हू भावना को,चेतनाको,
स्वप्न सुंदर और मीतोको मेरे.
अब दर्द मेरी कल्पना खुद बन रही जब,
मत और मुझको जख्म दो
आख मे आसू नही जो घाव मेरे धो स् के,
मत और मुझको ज्ख्म दो.

तरीही मी परत उठतो. हातात लेखणी घेतो.मला आठवण होते गेल्या 17 मे ची. 17 मे 2019 ला आमच्या लग्नाला पन्नास वर्षे पूर्ण झाली. गोल्डन जुबिली. गेल्या एक मे ला माझ्या एका मित्राच्या लग्नाची गोल्डन ज्युबिली साजरी झाली. त्याच्या मुलानं त्यांना दोघांना पुण्याला बोलावून नातेवाईक अन काही मित्रांना बोलावून अतिशय उत्साहात साजरी केली. मी ही सहभागी होतो. आम्हा चार पाच मित्रांची लग्न आठ दहा दिवसांच्या अंतरानं 1969 मध्ये झाली आहेत. त्यादिवशी रात्री मी घरी आलो आणि मला भडभडून आलं. परत 17 मेला तर, मला माझा सर्व लग्न सोहळा समोर दिसायला लागला. एक एक दृश्य, दृश्य पटलावरून सरकत गेलं. चौदा महिन्यांच्या इंतजारानंतर आतुरतेने ज्या दिवसाची आम्ही दोघं वाट बघत होतो तो 17 मे 1969 उजाडला. आमचं लग्न ठरल्यानंतर 14 महिन्यांनी आमचे लग्न झालं. 17 मे 2019 ला वर मी म्हटल्याप्रमाणं त्याला पन्नास वर्षे पूर्ण झाली अन वाटलं की असच सेलिब्रेशन माझ्या मुला-मुलीनी आयोजित केलं असतं. साजर केलं असतं. आणि त्या धामधुमीतून रात्री निवांत वेळ मिळाल्यानंतर आम्ही नेहमी सारखं तास दोन तास बोलत बसलो असतो, अन त्या पन्नास वर्षाच्या आठवणींच्या साठवणीचं, पोतं रिकाम केलं असतं.” तुम्हे याद है हमने-------“ और तुम्हे वह यादहै-----“ असं म्हणत म्हणत वेळ गेला असता. विचारातून जागा झालो आणि भरभर ही कविता लिहिली 17 मे 2019 ला.

## ‘ Golden Jubilee “

*How I wish you should have been there,*
*To celebrate golden jubilee of the days we spent together.*
*Though not 50, I have nearly 46 years to cherish,*
*The imprints of those 16600 days,which will never perish.*
*A great feel of togetherness for which we waited for 400 and 15 days,*
*Exchanging those 61 letters and counting those days.*
*Through all ups and downs and moments of happiness,*
*we experienced the deep attachment and true bond of togetherness*
*In my moments of success and joy to cheer,.*
*And to encourage me in my moments of despair.*
*You had never been demanding and you never asked for anything for yourself,*
*For you never liked me stressed and worried myself.*
*I built my life from scratch to fulfillment,*
*But for your share I could not have seen that moment.*
*A friend you had always been to encourage and console,*
*The love, the respect and trust and Faith made me to reach every goal.*

*We argued, we quarelled like all other do sometimes in life,*
*But we always had the deep understanding between us as husband and wife.*
*Each and every thing we did, we did it together.*
*Never tried to hide anything from one another.*
*Had you been there today we would have cherished all those moments,*
*Saying 'you remember when we—', and waiting for one anothers comments.*
*That's what I miss today my dear Prem, as I miss you,*
*I pray god to take my greetings to heaven to you.*
*'Happy 50th marriage anniversary to you'*
*17th May 2019*

पेन खाली ठेवलं आणि डोळे पुसले.अंत:करण आणि डोळे भरून आले होते. पेन खाली ठेवलं आणि परत विचारांचे चक्र सुरू झालं. देवानं मांडलेली गणितं किती सोपी वाटतात. आयुष्यभर आपण ती सोडवण्याचा प्रयत्न करतो. कधी चुकतो कधी बरोबर असतो. पण आलेले उत्तर चूक की बरोबर हे पडताळून पाहिला उत्तराचं पानच नसतं पुस्तकात. ते पान देवानं स्वतः जवळच ठेवलेलं असतं. खरं म्हटलं तर त्यानं मांडलेली गणितं तोच

सोडवू जाणे.आपण फक्त सोडवायची केविलवाणी धडपड करत राहायचं. हाच खरा आयुष्याचा खेळ आहे

खेळावरून आठवण झाली, आम्ही अमरावती इंजिनीरिंग कॉलेजमध्ये असतांना मी, गोखले, बापट आणि हिवसे आम्हा चौघांची ब्रिजची टीम होती. पत्त्यांचा हा खेळ आम्ही विदर्भ स्तरावर अनेक ठिकाणी खेळूलो अन काही ठिकाणी बक्षीसही मिळवली. या खेळाची मजा म्हणजे प्रत्येक डाव झाल्यानंतर प्रत्येक टेबलावर होणारी त्या-त्या डावाची चिरफाड. मग भांडणं, विशेषत: आपल्याच पार्टनर बरोबर. आर्ग्युमेंट चालायचे. अकोल्याला बेरार ऑइल इंडस्ट्रीज ब्रिजच्या स्पर्धा होत्या. अमरावतीतून बऱ्याच चमू अकोल्याला गेल्या. आम्ही आमची टीम घेऊन त्या स्पर्धेसाठी गेलो. खेळता खेळता एका राउंड मध्ये आमच्या टेबलावर मी आणि माझा पार्टनर हिवसे अन प्रतिस्पर्धी, बेरार ऑइल मिलचे डॉक्टर नेने आणि त्यांचा पार्टनर होते. आमच्या मानानं डॉक्टर नेने फार वयस्कर आणि अनुभवी होते. एका डावा नंतर जेव्हा "तुझी चूक झाली, ‘तू चुकला’, अशी मी आणि माझ्या पार्टनरची खडाजंगी सुरू झाली, त्यावेळी डॉक्टर नेने यांनी म्हटलेलं एक वाक्य मला अजूनही आठवतं. त्यात असलेली फिलॉसॉफी आयुष्यभर डोक्यात आहे. डॉक्टर नेने म्हणाले "अरे प्रत्येक डाव वेगळा असतो. आयुष्यात हे चे हेच तेरा पत्ते, परत कधीच तुमच्या

हातात येणार नाहीत. हा डाव गेला तो कायमचा गेला. मग कशाला उगाच भंडता? "

किती खर आहे हे? आयुष्यात एक्झॅक्टली तीच सिच्युएशन परत कधीच येत नाही.तरी आपण वाद घालतो, चर्चा करतो, भांडतो.आपलं आपल्याला किंवा इतर कोणाला दोषी ठरवतो. पण हे तत्वज्ञान कधीच लक्षात ठेवत नाही. 8 नोवेंबर 2014 ला डायलिसिस चालू असताना हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन दवाखान्यात माझ्या डोळयासमोर माझ्या बायकोचा बोलता-बोलता दोन मिनिटात मृत्यू झाला. सगळी क्रियाकर्म झाल्यानंतर, सगल्याच सामान्यांच्या डोक्यात जे प्रश्न येतात, ते माझ्या डोक्यातही आले. " त्या दिवशी आपलं काही चुकलं असेल का? डॉक्टरांचं काही चुकलं असेल का? नर्सची तर काही चूक झाली नसेल? असं केलं असतं तर---" वगैरे वगैरे. आणि ह्या सर्व प्रश्नांची उत्तरं मीच मला दिली. शेवटी एकाच उतारावर थांबलो. " हे असच होणार होतं. काहीही केलं असतं तरी हे असंच झालं असतं " कारण ते देवानं तसंच लिहून ठेवलं होतं. परमेश्वरानें ते तसंच मांडलं होतं. ते गणित तसंच सुटणार होतं की कसं, ते माहीत नाही. पण त्याचं उत्तर ठरलेलं होतं. " हम सब कटपुतलीयां है. डोर उपरवाले के हाथ मे है " आनंद सिनेमा मधला हा डायलॉग आठवतो.

परवा लग्नाच्या त्या गोल्डन गोल्डन जुबिली च्या दिवशी हेच सर्व विचार डोक्यात दाटून आले.’’तुम्ही 75 वर्षाचे आणि मी 70 वर्षाची

होईपर्यंत मला काही होणार नाही" असा वादा करणारी ती, अपने वादे से मुखर गयी. आता उरला फक्त एकाकी प्रवास तो गेली पाच वर्षे चालूच आहे आणि शेवटपर्यंत चालतच राहणार आहे. "तेरी याद मे" ह्या या माझ्याच एका कवितेत मी म्हटलं आहे,

*तुम बिन मैं सरिता बिन सागर ज्योति बिन दीपक जल बिन गागर*
*मुरझाया फूल बिन परिमल का कलरव खोया बहता निरर्झर*
*बिन मंजिल की सूनी सड़क में चलता राह पर नहीं है डगर*
*पथअंधियारा नहीं है मगर भरी है आंखें धुंदलाई नजर*
*तन्हा तन्हा घोर अंधेरा अमावस का उदास सागर*
*चांद रात की चुभती शांति और यादों का चलता कहर*
*नींद हो गई जुदा आंख से पल-पल भारी दूर है सहर*
*पावर नहीं अब उठते मेरे पर करना है पूरा सफर*
*मुखर गई वादों से अपने मुझको छोड़ा सुनि सडक पर*
*फिर भी रहना हम सायेसी, जैसी साथ रही जीवन भर*
*17 मे ला भावपूर्ण श्रद्धांजलि*

# नामजोशी सर

माझं सातवी पर्यन्तच शिक्षण खेड्यात झालं.फक्त सातवी पर्यंतच शाळा होती. पुढे आठव्या वर्गात शिकायला मी बुलढाण्याला एडेड हायस्कूल मध्ये प्रवेश घेतला.माझा मोठा भाऊही त्याच शाळेतून मॅट्रिक झाला होता.तो त्या शाळेतला नावाजलेला विद्यार्थी होता आणि मी ही अभ्यासात चांगला होतो,म्हणून एडेड हायस्कूल मध्ये प्रवेश मिळायला फार कठीण गेलं नाही. त्यावेळी एडेड हायस्कूल ही जिल्हयातली एक नावाजलेली शाळा म्हणून ओळखल्या जायची. त्यावेळी आमच्या शाळेचे मुख्याध्यापक श्री.गो.दि.नामजोशी सर होते.ते अत्यंत कडक शिस्तीचे होते.त्यामुळे सर्व विद्यार्थीच काय पण शिक्षक वर्गही त्यांना वचकून असायचा. रोज शाळा सुरू होण्यापूर्वी आमची सर्व विद्यार्थी व शिक्ष्कांची प्रार्थना व्हायची. ह्या प्रार्थनेला हजर राहणं सर्वांसाठी अनिवार्य होतं॰कोणाला एक मिनिटही उशिर झाला तर त्याला वेगळ्या रांगेतउभं राहावं लागे. अशा विद्यार्थ्यांना मग शिक्षा व्हायची आणि क्षिक्क्षकांना स्पष्टीकरण द्यावं लागायचं. वर्ग चालू असतांना दिवसभर,प्रत्येक वर्गासामोरून नामजोशी सरांच्या दिवसातून दोन-तिन तरी फेऱ्या व्हायच्या.

कुठल्या वर्गात काय चाललय,हयाकडे त्यांचं कटाक्शानं लक्ष असायचं.ते स्वत:,दहाव्या वर्गाला आणि त्या आधी अकराव्या वर्गालाही इंग्रजी हा विषय शिकवायचे. ते जुन्याकाळचे इंग्लिश मध्ये बी. ए.ऑनर्स होते.त्यांचं वाचनही खूप दांडगं होतं.इंग्लिश वर तर त्यांचं खूप प्रभुत्व होतं.वर्गातही ते उत्तम शिकवायचे. मला दहाव्या वर्गात त्यांनीच इंग्लिश शिकवलं. एखादा धडा किंवा कविता शिकवतांना ते अतिशय समरस होऊन शिकवायचे. त्यातल्या कठिण शब्दांचे अर्थ अनेक रित्या समजावून सांगायचे. वाक्य रचनेकडे लक्ष वेधायचे. त्या लेखकाबद्दल किंवा कवि बद्दल व त्याच्या/तिच्या इतर साहित्या बद्दल माहिती सांगायचे. साहजिकच त्यामुळे आम्हाला वाचनाची गोडीलागली. आताही ७७ व्या वर्षी मी,मराठी, हिन्दी, इंग्रजी ह्या भाषेमधिल साहित्य,रोज किमान दोन-तिन तास तरी वाचतो. ह्या माझ्या वाचनाच्या आवडीची बिजं नामजोशी सरांनी रुजवलेली आहेत. मला आठवतं,आम्हाला दहावित, ‘All About a Dog “ हा A.G. Gardiner ह्यांचा धडा होता.तो तर त्यांनी अतिशय मनोरंजकपणे शिकवलाच, पण ए.जी.गार्डीनर हे किती उत्तम लेखक होते,त्यांचं आणखी लिखाण कोणतं,त्यांना “Alpha of the Plough “ का म्हणायचे,हे सर्व त्यांनी आम्हाला सांगितलं. तसंच “ Uncle Podger Hangs a Picture “शिकवतांना “P.G.Woodhouse “बद्दल सर्व सांगितलं.‘ A Village Song ‘ ही कविता शिकवतांना सरोजिनी नायडू ची सर्व माहिती

सांगिततली. मला त्या कवितेतल्या काहि ओळी अन फोड करून संगितलेले शब्द व भावार्थ अजूनही आठवतो. “ Why o why was I tempted to tarry, lured by the boatman’s song”, हयातले,Tarry and Lured, ह्या शब्दांचे त्यांनी संगीतलेले अर्थ अजूनही माझ्या लक्षात आहेत. त्यांच्या शिकवण्यानं मला इंग्लिश हा विषय खूप आवडू लागला.मी चांगलं लिहू वाचू लागलो.इतकं,की सहा माही,नऊ माही परीक्षेत त्यांनी मला इंग्रजी ह्या विषयात बऱ्याचवेळी 50 पैकी 45,46 मार्क्स दिल्याचं मला अजूनही आठवतं.मला एस.एस.सी.त बोर्डाच्या परिक्षेतही इंग्रजी ह्या विषयात डिस्टिंकशन मिळालं.

त्यांच्या कडक शिस्ती बद्दलचा एक प्रसंग मला आठवतो.आम्ही दहाव्या वर्गात असतांना दहावी-अ वर्गात आम्ही फक्त चारच मुलं होतो आणि बाकीच्या सर्व मुली होत्या.तिथे दहावि-अ मध्ये नेहमी आर्ट्स,सायन्स च्या सर्व मुली अन चार-सहा हुषार मुलं असत. बाकी,दहावी –ब मध्ये सर्व सायन्सची अन दहावी-क मध्ये सर्व आर्ट्सची मुलं असायची. आमचा गणिताचा किंवा सायन्सचा पीरियड असला की आम्हा सर्व सायन्स वाल्यांना सायन्स च्या प्रयोगशाळे जवळच्या एका क्लासरूम मध्ये जावं लागायचं.नेहमी,आमच्या आधि तिथे नववीचा सायन्स क्लास असायचा व एक मॅडम तो शिकवायच्या.आम्हाला तुलंगीकर सर गणित-सायन्स शिकवायचे. आधिचा पीरियड संपला की दहावी-ब आणि आम्ही

चार मुलं अन सायन्स च्या तिन मुली त्या सायन्स रूम कडे धाव घ्यायचो. समोर बसण्यासाठी ही धडपड असायची.

एक दिवस,अगोदरचा नववीचा पीरियड थोडा उशिरा सुटला. त्या वर्गाची मुलं आणि मॅडम बाहेर निघण्याआधिच आम्ही,म्हणजे, मी आणि माझ्या वर्गातले तिन मित्र,रूम मध्ये घुसलो.त्या मॅडम रागावल्या,पण आम्ही काही ऐकलं नाही.त्या मॅडमनि जाऊन,नामजोशीसरांना आमची नावं सांगितली.सरांनी आम्हा चौघांनाही त्यांच्या ऑफिस मध्ये बोलावलं.खरं म्हणजे आम्ही चारही विद्यार्थि मेरीटचे होतो वं त्यांचे अतिशय आवडते होतो. पण त्याचा काहिही विचार न करता त्यांनी आम्हाला दाटलं ; एवढंच नव्हे तर हात पुढे करायला सांगून प्रत्येकाला दोन-दोन छाडया मारल्या.आम्हीखूप खजिल झालो.त्यांनी आम्हाला वार्निंग देऊन बाहेर केलं. त्यांच्या शिस्तीपुढे ते कशाचाही मुलाहिजा ठेवायचे नाही.

विद्यार्थांच्या सर्वांगीण विकासा कडेही त्यांचं नेहमी लक्ष्य असायचं.फूटबॉल आणि खो-खो च्या खेळात तर आमच्या शाळेचं नाव अग्रगण्य होतं. जिल्हा स्तरीय मॅचेस मध्ये तर एडेड हायस्कूल,नेहमी पहिली-दुसरी असायची. तसंच, वक्तृत्व स्पर्धा, भावगित स्पर्धा, नाटकं हे सांस्कृतिक कार्यक्रम तर नेहमी शाळेत व्हायचे. बुलडण्यात इतर कुठल्याही ठिकाणी ह्या स्पर्धा असल्यातर तिथे आमच्या शाळेचा सहभाग हा असायचाच.अन आम्ही त्यात बक्षिसं ही मिळवायचो. ह्या स्पर्धांसाठी ते

नेहमी स्वत:च्या देखरेखीखाली शाळेतील मुलं-मुलिनिवडायचे. त्यांना मार्गदर्शन करायचे.

शाळेत मी सलग दोन वर्ष स्नेहसम्मेलन सचिव होतो.आमच्या शाळेच्या सम्मेलनाच्या उद्घाटनासाठी चांगले-चांगले साहित्यिक व वक्ते ह्यांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलवण्यात यायचं.तिन वर्षात मी प्रा.राम शेवाळकर, प्रा.वामन चोरघडे,प्रा. पद्माकर डावरे ह्यांची उत्कृष्ठ भाषण ऐकली आहेत. प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून देण्याचं काम नेहमी संमेलन सचिवाकडे असायचं.मी दोन वर्ष प्रा.शेवाळकर आणि प्रा. चोरघडे ह्यांचा परिचय करून दिल्याचं मला अजून आठवतं. नामजोशी सर तो परिचय लिहून द्यायचे.मग आमच्याकडून पाठकरून नंतर ते नैसर्गिक बोलल्यासारखं वाटावं म्हणून,त्याच्या दोन-तिन तालमी घ्यायचे.ह्या सर्व गोष्टींचा,मला पुढे माझ्या आयुष्यात फार फायदा झाला.

विद्यार्थ्यांमध्ये ते कधीही भेदभाव करित नसत.मग तो श्रीमंत असोकी गरीब असो,शहरी असोकी खेडतातून आलेला असो,सुशिक्षित कुटुंबातला असो,की अशिक्षित कुटुंबातला असो.त्या त्या विद्यार्थ्याच्या गुणवत्तेनुसार त्याला ते संधि द्यायचे.मग ते खेळ असो की सांस्कृतिक कार्यक्रम असो.मला आठवतं,मी आठव्या वर्गात दाखल झाल्यानंतरच्या हिवाळयात आमच्या शाळेचं स्नेहसम्मेलन होतं.आमच्या सममेलनाचे सर्व कार्यक्रम पहायला बुलडण्यातिल बरेच पालक व निमंत्रित यायचे.दरवर्षी

आमच्या शाळेचं नाटक हे एक आकर्षणच असायचं.ह्या नाटकासाठी पात्रांची निवड करून,साधारणत: महिनाभर तालमी व्हायच्या. मी खेड्यातून सातवी पास करून बुलडण्याला आलो होतो.मला नाटकात काम करायची खूप हौस होती.माझा आवाज चांगला व अभिनयही बऱ्या पैकी करायचो.मी आठवीत असतांना जेव्हा नाटकाच्या पात्रांची निवड होण्यासाठी नोटिस लागली,तेव्हा मीही त्यासाठी जायचं ठरविलं. माझे वर्गमित्र व काही सिनियर्सम्हणाले तू जाऊन काही फायदा होणार नाही०त्यांची मुलं ठरलेली असतात.काही मागच्या वर्षी काम केलेली तर काही हुशार सिनियर्स त्यात असतात आपल्याला काही घेत नाहित.तरीही मी त्या ट्रायल साठी गेलो.आमचे नाटकाचे प्राध्यापक व बरेच विद्यार्थी तर होतेच,पण स्वत: नामजोशीसर ही होते.नाट्यवचांनासाठी थोडं-थोडं,वेगवेगळया पात्रांचं संभाषण काही मुलांकाडून वाचून घेण्यात आलं.जवळपास आठ-दहा जणांचं झाल्यावर मी म्हणालो,‘सर मला वाचू देता का?’ ते म्हणाले,’तुझं नाव काय आणि तू कोणत्या वर्गात आहेस?‘मी त्यांना सर्व सांगितलं. ‘शंभुराजे ‘हे नाटक होतं.त्यातल्या दोन पात्रांचं त्यांनी मला वाचायला सांगितलं. नामजोशीसर म्हणाले ‘चांगलं वाचलं हयानं.ह्याला ‘ निवृत्तीच्या ‘ पात्रासाठी पक्कं करा. ‘,अन अशि त्यांनी मला संधि दिली. त्यानंतर तर मी नववी आणि दहावितही नाटकात काम केलं.मी नववीत असतांनाचं,आमचं नाटक शालेय विभागीय स्पर्धेसाठी निवडण्यात

आलं.आम्ही त्या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आणि मला अभिनयसाठी रौप्य पदक मिळालं. पुढे मी महाविद्यालयात ही नाटकात कामं केली.औरंगाबादला अन्य वर्ष अभियांत्रिकीला असतांना तर मी प्रसिद्ध लेखक रणजित देसाई ह्यांच्या समोर एकपात्री नाटक केलं. त्यांनीही मला शाबासकी दिली.ह्या सगळ्याचा पाया नामजोशीसरांनी रचला. शाळेचं शिक्षण आणि शिक्षकही उत्तम होते. आमच्या दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेत आम्ही तिन विद्यार्थी मेरीटमध्ये आलो.

आम्ही शाळा सोडून जातांना त्यांनी आम्हा दोन-चार जणांना बोलाऊन शाळेबद्दल आम्हाला काय वाटतं,ह्यावर दोन-दोन पानी लेख लिहून द्यायला सांगितलं. नामजोशी सरांचा वचक, धाक,शिस्त ह्यांनी तर आम्हाला घडवलंच,पण त्यांनी आम्हाला जे शिकवलं,जे प्रोत्साहन दिलं,त्यामुळे आम्ही खऱ्या अर्थानं यशस्वि झालो.ते अगदी रोज शाळेच्या वेळेआधी शाळेत यायचे आणि सर्व शाळा बंद झाल्यानंतर घरी जायचे.शाळेत एक छोटीसी बाग होती.तिथे कृष्णा म्हणून एक माळी काम करायचा.बागेत जाऊन ते स्वत: त्याला मार्गदर्शन करायचे.स्वत:ची शाळा म्हणजे एक प्रकल्प आहे,एक मिशन आहे,असा ध्यास घेऊन अहोरात्र तळमळीनं आणि शिस्तीनं काम करणारे नामजोशी सरांसारखे शिक्षक विरळाच सापडतील.सरांचा माझं जीवन घडविण्यात फार मोठा वाटा

आहे.मीच नाही, माझ्या सारखे असंख्य विद्यार्थी सरांना कधिच विसरू शकणार नाहीत. संस्कृतात एक सुभाषित आहे :

*“आचार्यात पादमादत्ते, पादं शिष्य स्वमेधय:*

*पादं स्वब्रम्ह चारिभ्यम, पादं कालक्रमणेच “*

आचार्यां कडून शिष्य पंचविस टक्के शिकतो असं त्यात म्हटलं आहे. मी मात्र नामजोशी सरांकडून त्यापेक्षा कितितरी जास्त शिकलो.

# व्हायवा

आमच्या इंजिनिअरिंगच्या शिक्षण पद्धतित, थेअरी इतकंच प्रात्यक्षिकांना महत्त्व असतं.एका वर्षाच्या असलेल्या पूर्ण विषयांच्या थेअरीला जितके मार्क्स असतात जवळ-जवळ तितकेच मार्क्स त्या विषयाच्या प्रात्यक्षिकांना असतात.पूर्ण टेर्मभर ही वेगवेगळया विषयांची प्रात्यक्षिकं आम्ही प्रयोगशाळेत विद्यार्थ्यांकडून करून घेतो.प्रत्येक प्रात्यक्षिकचं रेकॉर्ड बुक ( जरनल ) हे विद्यार्थ्यांना लिहावं लागतं व विद्यपिठ परीक्षा सुरू होण्यापूर्वी टर्मवर्क म्हणून ते त्यांना सबमिट करावं लागतं.ह्या टर्मवर्कला प्रात्यक्षिकासाठी असलेल्या मार्क्स पैकी निम्मे मार्क्स असतात.आणि निम्मे प्रात्यक्षिक परीक्षेला आणि त्यावेळी घेण्यात होणाऱ्या व्हायवाला असतात.हे टर्मवर्क सबमीट केलं की संबंधित प्राध्यापक ते तपासतो वेळ पडल्यास इंटर्नलव्हायवाही घेतों वं त्याप्रमाणे टर्मवर्कचे मार्क्स देतो.हे टर्मवर्क लिहतांना व व्हायवा च्या वेळी विद्यार्थी अनेक युक्त्या करतात अन मग खूप गमतिजमति होतात.असेच काही प्रसंग मला आठवतात.त्यापैकी काही इथे लिहतो आहे. बऱ्याचवेळी विद्यार्थी मागच्या वर्षीच्या जरनलची कॉपी करून न समजताच जरनल सबमिट करतात.त्यांना असं वाटतं की प्राध्यापकांना काय माहित पडणार आहे.खपून जाईल.पण

प्राध्यापक ही त्यांचे गुरु असतात आणि तेही त्या प्रोसेस मधून गेलेले असतात,हे त्यांच्या लक्षात येत नाही.प्राध्यापक अशा चोऱ्या शिताफीनं पकडतात.मग विद्यार्थी अडचणीत येतात.आमच्याकडे फायनलयिअर ला प्रत्येक विद्यर्थ्याला प्रोजेक्ट बरोबर एक सेमिनारही असतो.ह्या सेमिनारसाठी त्याला एखाद्या तांत्रिक विषयावर 25-30 पानाचा रीपोर्ट सबमिट करावा लागतो.मग तो सेमिनार त्याला परीक्षकांसमोर वं बाकी विद्यार्थ्यांनसमोर सादर करावा लागतो. विद्यार्थ्यांनी टेक्निकल वाचावं,ते व्यवस्थित लिहावं, वं त्याच्यावर आटोपशिर बोलावं हा खरा ह्या सेमिनारचा उद्देश असतो.पण काहीकाहि विद्यार्थी काहिही न वाचता मागच्याच कुठल्या तरी सेमिनारची अक्षरश: कॉपी करतात व तो सबमिट करतात.

मला आठवतं,1989 च्या उन्हाळी परीक्षेसाठी,ह्या सेमिनराच्याच साठी मी अमरावतीहून पुण्याला एका कॉलेज मध्ये एक्सटर्नल एक्झामिनर म्हणून गेलो.फायनल यिअर मेकॅनिकल च्या विद्यार्थ्यांचे. सेमिनार सुरू झाले. ४-५ विद्यार्थि झाल्या नंतर,सहावा आला.आमच्या समोर सेमिनार च्या प्रती ठेवल्या आणि स्टेजवर जाऊन तो सादर करायला लागला.त्याचं सादरिकरण संपल्या नंतर मी त्याला प्रश्न विचारायला सुरवात केली.मी पहिलाच प्रश्न विचारला—

‘Have you written this seminar yourself? Have you read the literature written in this seminar? तो विश्वासानं म्हणाला ‘ yes sir. ‘

‘ Are you sure? ‘ तो म्हणाला ‘ yes.’मग मी त्याला म्हणालो ‘ Gentleman,this is word to word copy of the seminar report which, one of my students had submitted two years ago at Govt. College of Engineering Amravati. All, write up, figures, sketches,graphs, you have copied as it is from that. You have only changed the first page by writing your details. ‘

त्यानं डोकं वर केलंच नाही.मग मी त्याला सेमिनारचा उद्देश काय आहे वगैरे समजाऊन सांगितलं. त्याला म्हटलं,दुसऱ्याच्या सेमिनारची कॉपी करून तू तुझ्या शिक्षकांना आणि परीक्षकांना नव्हे तर,तू स्वत:लाच मूर्ख बनवतो आहेस. तो खजिल झाला.माफी मागायला लागला.मग वातावरण थोडं हलकं करण्यासाठी मी त्याला म्हणालो ‘ you can never fool your teachers. ( सेमिनारला आलेले इतर विद्यार्थिही हे ऐकत होते. ) मी म्हटलं ‘ तुमने, “ हाथ की सफाई “ ये हिंदी सिनेमा देखा है क्या? शायद नहीं देखा होगा,क्यूंकी यह सिनेमा 1971-72 मे आया था।तब तुम बच्चे होंगे।मै तुमको उसकी स्टोरी शॉर्ट मे सुनता हू. एक गाव मे एक मध्यमवर्गीय

परिवार रहता था—एक आदमी,उसकी पत्नी और दो लड़के,एक 8 सालका और दूसरा 11-12 सालका। अचानक एक दिन गाँवकी नदिमे जोरोकी बाढ़ आति है।गांवभरमे पानी सब घरोमे घुस जाता है।लोग गांवके बाहर तितर-बितर भागने लगते है०उस भागदौड़मे,जैसे हिंदी सिनेमामे हरदम होता है,माँ,बाप और बच्चे सब अलग-अलग होकर,एकदूजेसे बिछड़ जाते है। आगे वो दोनों बच्चे अलग-अलग ट्रेन-ट्रक से बंबई पहूच जाते है। वहा पहूचनेपर छोटा लड़का एक जेबकतरेके हाथ लगजता है और बड़ा एक अंडरवर्ल्ड डॉनके हाथ लगजाता है ।वह छोटे लड़केका जेबकतरा मास्टर,एक 20-25 लड़कोकी गैंग चलता है।उन सब जेबकतरे बच्चोंका वह एक होस्टेल भी चलाता है। वहा रोज वह मास्टर ( सत्येन कप्पुने वह रोल किया था ) उन बच्चो के हाथके सफाई के क्लासेस लेता है।उनकी सुबह की प्रार्थना तो बहूतही मजेदार थी। ‘ऊपरवाले तेरी दुनियामे,कभी जेब किसिकी न खाली मिले ‘ ( रफिसाहबने यह गाना गया है। )।धिरे- धिरे वह लड़का बड़ा होता है और एक सफाईदार –(एक्सपर्ट) जेबकतरा बन जाता है। रणधीर कपूर ने वह काम किया था।

इधर बड़ा लड़का अंडरवर्ल्ड के सब धंदे सिखलेता है और बड़ा होकर काले धंदे करने लगता है। यह रोल विनोद खन्नाने किया था।वह दोनों भाई बड़े हो जाते है,पर एकदुसरेको उन्होने न कभी देखा है न ही वह पहचानते है.एक दिन,विनोद खन्ना एक बड़े ऑफिस के सामने अपनी कार

पार्क करके एक काउंटर पर जाता है।वहा यह जेबकतरा रणधीर कपूर भी बाहर खड़ा रहता है।उसे लगता है,ये कारवाली आसामी बड़ी लगती है,आज इसपर हाथ साफ करते है. बड़ा माल मिलेगा।इसलिए वह विनोद खन्नाके पिछे जाकर खड़ा होजाता है, और मौका पातेही उसकी जेब मारनेकी कोशिश करता है। वह जैसेही सफाइसे पर्स को हाथ लगाता है,विनोद खन्ना उसका हाथ पकड़ लेता है और कहता है- ‘ बच्चे तुम जिस स्कूलमे पढ़ रहे हो,उसके हम हेड मास्टर रह चुके है । ‘ After I finished this story,I took a long pause. The entire class including that boy started laughing loudly. नंतर मी म्हणालो – ‘ हे असं आहे बेटा, त्यामुळे,तू आपल्या प्राध्यापकांना बनविण्याचा प्रयत्न करू नको. ‘

कॉपी करण्यावरून आणखी एक मजेदार किस्सा आठवला. वर्षानुवर्ष इंजीनीरिंगचे काही आळशी विद्यार्थी प्रात्यक्षिक किंवा टर्मवर्कच्या जरनल्सची कॉपी करतात. मागच्या किंवा त्याच्याही मागच्या वर्षाच्या जरनल ची जशीच्यातशी कॉपी करतात.बऱ्याचवेळी, प्रयोगशाळेचा किंवा प्रयोगाचा सेटप बदललेला असतो. एखादं उपकरण बदललेल असतं. त्याची ते दखल घेत नाहीत. जरनल कॉपी करतांना समजून करत नाहीत. मागचं, जसंच्यातसं उतरवतात मग परीक्षेच्यावेळी व्हायवात फजिती होते,

मी अमरावती इंजीनीरिंग कॉलेज मध्ये प्राध्यापक असतांना, प्रा.सुजान हे आमचे विभाग प्रमुख होते.अत्यंत सज्जन व चांगले प्राध्यापक होते ते.ते पुण्याच्या इंजीनीरिंग कॉलेज मधून अमरावतीला बदलून आले होते. चार-पाच वर्ष,अमरावतीला राहिल्यानंतर त्यांची बदली पुन्हा पुण्याला झाली. ते परत पुण्याला गेल्यानंतर,दुसऱ्याच वर्षी मी काही कामानिमित्य पुण्याच्या कॉलेज मध्ये गेलो.मला वाटलं,आपण सुजान साहेबांना भेटावं.मी त्यांच्याकडे गेलो.त्यांनी आगत्यानं माझी विचारपूस केली.मी म्हणालो, ‘सर आता पुण्याला कुठले विषय शिकवता? ‘ते म्हणाले ‘ सेकंड,थर्ड आणि फोर्थ प्रत्येक वर्गाला एकेक विषय शिकवतो. त्यापैकि, सेकंड ईयरला मी Thermodynamics शिकवतो.अमरावतीला येण्यापूर्वी मी इथे सेकंड ईयरला तोच विषय शिकवायचो.आता परत आल्यानंतर पाच वर्षांनी तोच विषय घेतो.अन मग ते थोडे हसले आणि म्हणाले— ‘जाजू मै तुमको एक मजेकि बात बताता हू। अपने इंजीनियरिंग के कुछ-कुछ स्टूडेंट्स कितने ग्रेट होते है देखो। मैने यहा Thermodynamics पढाना शुरू किया। उसका टर्मवर्क भी मै ही लेता हू। पिछले टर्म एण्ड मे,विद्यार्थियोने जरनल्स सबमिट किये। फिर एकदिन मैने उनका व्हायवा लिया। जोडीजोडिसे स्टूडेंट्स को अंदर बुलाता रहा। हर-एकके जरनल देखे। वॉटर-ट्यूब बॉयलर का सबने स्केच निकाला था। और काफी लड़कोने वो स्केच के बिचमे एक छोटा सर्कल निकालकर,उसके अंदर GHS ऐसा लिखा था।बॉयलर के और पार्ट्स

के नाम भी लिखे थे। मैने उन सबसे पुछा,ये GHS क्या है? ये किस पार्ट का नाम है? कोईभी नहीं बता सका। आखिरमे जब आखरी जोडी भी नहीं बता सकी,तब मैने कहा अब मै तुमको बताता हू,GHS क्या है?। तुम बाहर जाकर सब को बता देना। फिर मैने कहा की पिछले पाच साल मै अमरावती था। उसके पहले पुनामे मै यही सब्जेक्ट पढाता था तब मै जब जरनल्स जाचता था, तो आखरीमे,उस बॉयलर पर मेरे initials करके राउंड मारता था।वह GHS, ये मेरे initials है। मेरा नाम गोपाल होलाराम सुजान है। पिछले पाच साल मै पुनामे नहीं था। फिरभि जर्नल कॉपी करते समय पाच साल तक स्टूडेंट्स और अब तुमभी मेरे initials एक शानदार छोटा सर्कल बनाकर उसमे लिख रहे हो।कॉपी कर रहे हो। वाह,वाह क्या बात है । ‘ एवढं मला सांगून ते हसायला लागले.म्हणाले. ‘ ऐसे कॉपी मास्टर है अपने स्टूडेंट्स।‘

हे तर काहीच नाही.मी 1964-65 ला,शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद चा सेकंड ईयरचा विद्यार्थी असतांना आमच्या Hydraulics Machines ह्या विषयाच्या प्राक्टिकल परीक्षेसाठी पुण्याच्या इंजिनियरिंग कॉलेजचे एक प्राध्यापक एक्सटर्नल एक्समिनर म्हणून आले होते. आम्ही प्रत्येकजण आपापलं जरनल घेऊन त्यांच्या समोर व्हायवा साठी जात होतो.जरनल मध्ये सुरवातिलाच आमच्या Hydraulics Machines च्या लॅबोरेटरीचं लेआऊट काढून लावलेलं होतं.माझा एक देशमुख म्हणून वर्गमित्र होता.तो वर्षभर टर्मवर्क वेळच्यावेळी करत नसे.मग

शेवटि घाई-गर्दीत मागचे जरनल्स आणून कॉपी करायचा. तसंच त्यानं ह्या विषयाचंही केलं. ह्या व्हायवाला जेव्हा देशमुखचा नंबर आला, तेव्हा, पुण्याच्या त्या परीक्षकानं देशमुखच्या जरनल मधलं लॅबोरेटरीचं लेआऊट पहिलं अन त्याला विचारलं –‘ हे लेआऊट तू काढलं आहेस? ‘ तो म्हणाला ‘ हो सर ‘. ते सर म्हणाले-‘ ह्या मशिन्स तुमच्या लॅबोरेटरीतं आहेत? अन,त्या ह्या लेआऊट प्रमाणे लावलेल्या आहेत?

तो म्हणाला ‘ हो सर. ‘

ते सर जागेवरून उठले अन म्हणाले ‘ चल तुमच्या प्रयोगशाळेत अन दाखव मला. ‘ देशमुख पार गोंधळून गेला. त्याला कळेना काय झालय ते. प्रयोग शाळेत गेले तर तिथे वेगळ्याच मशिन्स अन वेगळंच लेआऊट. मग ते सर म्हणाले- ‘अरे मूर्खा, कॉपी करायचीच होती तर, मागच्या वर्षिच्या, निदान तुमच्या कॉलेज च्या जरनलची तरी करायची होती. हे लेआऊट पुण्याच्या कॉलेज च्या माझ्या लॅबोरेटरीचं आहे. आता तूच सांग, तुला पास करू की नापास? ‘

असे अनेक मजेदार किस्से आहेत. आणि हे आमच्या वेळेपासून, पिढ्यांपिढ्या चाललेलं आहे. आहे की नाही मजा?पण फार थोडे विद्यार्थी अशि बनवाबनवी करतात.सगळेच विद्यार्थी असे नसतात. नाहीतर खेळखंडोबाच झाला असता।

# सिनेसंगिताचे काही रोचक किस्से

दोन वर्षापूर्वी जुलैच्या महिन्यात मी,तिनेक महिन्यासाठी मुलाकडे कॅलिफोर्नियाला गेलो.तो सांफ्रान्सिको जवळ प्लीजंटन येथे राहत होता. पोहचलो त्याच्या दुसऱ्याच दिवशी सकाळी माझी सून आणि नातू मला मॉर्निंगवॉक ला घेऊन गेले. मी रोज सकाळी फिरायला जातो हे त्यांना चांगलं माहीत आहे.घरापासून साधारणत: २०-२५ मिनिटांच्या अंतरावर एक ‘ Creekside पार्क ‘ म्हणून मोठा पार्क आहे. सून म्हणाली हा खूप चांगला पार्क आहे.रोज सकाळी इकडे फिरायला येत जा तुम्ही.एवढंच नाही,संध्याकाळी तर इथे बरीच इंडियन मुलं, बायका अन बरेच सिनियर सिटीजन्स ही येतात.खेळतात,बसतात.ती म्हणाली, ‘मी संध्याकाळी परत तुमच्या बरोबर येईन अन जेष्ठ नागरिकांचा एक १०-१२ जणांचा ग्रूप आहे,त्यांच्याशी तुमची ओळख करून देईन.मग रोज संध्याकाळीही तुम्ही इथे येऊ शकता. ‘मग आम्ही त्या दिवशी संध्याकाळी ही पार्क मध्ये गेलो.तिथे त्या ग्रुपशी तिनं माझी ओळख करून दिली.माझ्याच सारखे,आपापल्या मुला-मुली कडे आलेले, बरेच भारतीय जेष्ठ नागरिक तिथे होते.सर्वांशी परिचय झाला.त्यात, दिल्ली,मुंबई, गुजरात,धंनबाद पुणे

येथून आलेली मंडळी होती.पुण्याचे तर आम्ही चार-पाच जण होतो.चांगला ग्रूप होता. वेगवेगळ्या क्षेत्रातून रिटायर झालेलीही मंडळी होती.संगित,साहित्य,नाटक,सिनेमा,पर्यटन अशा सर्व क्षेत्रात आवड असलेले अन जाणकार लोक होते.रोज संध्याकाळी साधारणत: सहा ते साडेसात आम्ही तेथे बसत असू. आमचे मुंबईचे एक मित्र श्री.शेखर ह्यांनी तर आमचा एक व्हाट्स्याप ग्रुपही बनवला.आम्ही त्या ग्रूप द्वारे भारतातही अजून संपर्कात आहोत.आमच्या ह्या ग्रुप मध्येच,पुण्याचे डॉ.देशपांडे असे एक आमचे मित्र आहेत. ते संगिताचे खूप जाणकार,व्यासंगी आणि दर्दी आहेत.त्यांची रेंज म्हणजे,शास्त्रीय संगितापासून,नाट्यगित,भाव आणि भक्तिगित, सिनेसंगित ते गझल कव्वाली पर्यन्त आहे.विषेशत:,जुन्या सिनेमातली गाणी,संगितकार,गीतकार,गायक हे सगळं त्यांना खोलवर माहित आहे. तसे ते आमच्या मेळाव्यात जास्त बोलायचे नाहीत,पण Whatsapp वर आम्हाला बरीच उत्तम उत्तम गाणी,त्या गाण्याच्या मागचे अनेक मनोरंजक किस्से आम्हाला पाठवायचे. (अजूनही पाठवतात )आम्हा सर्वांना त्या पोस्ट्स खूप आवडायच्या अन आम्ही त्यांना यथोचित दादही द्यायचो.त्यांनी सिनेसंगिताबद्दल सांगितलेल्या काही किस्यांचा मी आवर्जून येथे उल्लेख करतो आहे.काही बाकीच्या संगिताबद्दलही आहेत.आम्ही कुठलाही संबंधित प्रश्न विचारला,की दुसऱ्या दिवशी त्यांचं उत्तर तय्यार

असायचं.साधारणत: हे सर्व,ते Whatsapp च्या मोठमोठ्या मेसेजेस मध्ये पाठवायचे.

एकदा त्यांनी लिहलं होतं : ‘बैजू बावरा ह्या सिनेमातिल अकबराच्या दरबारातिल शेवटच्या जुगलबंदि बद्दल. तानसेन आणि बैजू बावरा ह्यांच्या मध्ये, अकबरसमोर,भर दरबारात तो मुकाबला होणार असतो.समोर एका काचेच्या पात्रात संगमरवरी दगड ठेवण्यात आलेला असतो,अन आपआपल्या संगिताच्या,रागदारीनं,गायनाच्या करामतीनं त्या पत्थराला पाझर पाडायचा असतो. त्यात जो जिंकेल तो श्रेष्ठ गायक असं ठरलेलं असतं.त्या चित्रपटात, अभिनेता सुरेन्द्र हयानं तानसेनची,तर अभिनेता भारतभूषण हयानं बैजू बावरा ची भूमिका केली होती. ह्या जुगलबंदित शेवटी तानसेनची हार होते अन बैजू बावरा जिंकतो.

विजय भट ह्यांनी दिग्दर्शित केलेला व प्रकाश पिक्चर्स ने निर्मिती केलेला हा 1952 चा सिनेमा आहे.ह्या सिनेमाला हिन्दी सिनेमातिल म्यूजिकल मेगा हिट असं म्हटलं जातं.ह्या सिनेमाचं संगित प्रसिद्ध संगितकार नौशाद ह्यांनी दिलं होतं.ह्या सिनेमातली बरीच गाणी शास्त्रीय रागांवर बसवलेली होती.जसे, पुरीयाधनाश्री, तोडी, मालकंस,दरबारी,देसी ह्या रागांवर आधारित होती.ही जवळजवळ सर्व गाणी शकिल बदायूनी ह्यांनी लिहली होती.त्यांना उर्दूला बाजूला ठेवून ही सर्व गाणी हिंदीत

लिहायची होती.ती बदायूनी ह्यांनी इतकी उत्तम लिहली की ती सारी अजरामर झाली.

ह्या सिंनेमातिल वर उल्लेख केलेल्या स्पर्धेच्या जुगलबंदी साठी दोन दिग्गज गायक होते ; पंडित दिगंबर विष्णु पळूसकर,आणि उस्ताद अमिरखा साहेब. बैजू बावराचं म्हणजे भारत भूषणचं प्लेबॅक,पंडित पळूसकर देणार होते.आता सुरेन्द्र,म्हणजे तानसेन साठी प्लेबॅक द्यायला,उस्ताद अमीरखा ह्यांची विनंती करण्यासाठी नौशाद त्यांच्याकडे गेले.नौशादनी,ही जुगलबंदी दरबारात होणार अन त्यात शेवटी तानसेन हारणार आहे असं अमीरखा साहेबांना सांगितलं. अमिरखा साहेबांनी ताबडतोब विचारलं –‘ मूझे तुम जिससे हरा रहे हो,उस बैजू बावराको कौन गा रहा है? ‘नौशाद नम्रपणे म्हणाले ‘ पंडित पलूसकरजी। “

‘ तो फिर चलेगा। मै पंडितजी के सामने हारनेको तैयार हू। ‘

अन मग ती चीर स्मरणीय जुगलबंदी –‘ आज गावत मन मेरो झुमके, तेरी तान भगवान ‘। गायली गेली.त्या जुगलबंदीचा एकेक शब्द ऐकावा अन पंडितजी आणि अमिर्खासाहेबांची ती गायकी अन ताना ऐकाव्या. स्वर्ग सुखाचा आनंद हयापेक्षा काय वेगळा असणार?

आणखी एक मजेदार निरीक्षण डॉ. देशपांडेंनी आम्हाला पाठविल्याचं मला आठवतं.त्यांनी लिहलं होतं की सुमन कल्याणपूर सुद्धा

एक पट्टीच्या गायिका होत्या.दैवानं साथ दिली असति तर लतादीदी,आशाताईंच्या ओळीतच बसल्या असत्या.जाणकारांना,तशा त्या आहेतच.पुढे,देशपांडे साहेबांनी दोन,जवळ जवळ सारख्या लिहलेल्या अन सारख्या गायिलेल्या गाण्यांबद्दल लिहलं होतं.ही दोन गाणी 1964 च्या दोन वेगवेगळ्या सिनेमातली.दोन्हीच्या गायिका वेगळ्या,संगितकार वेगळे,गितकार वेगळे.ते येणेप्रमाणे-

सिनेमा--------फरीयाद

गायिका------ सुमन कल्याणपूर

सांगित--------स्नेहल भाटकर

गितकार-------केदार शर्मा

आणि गाणे----‘ हालेदिल उनको सुनाना था,सुनाया ना गया,

जो जुबापर मुझे लाना था, लाया ना गया। ‘

आता दुसर गाण-------

सिनेमा -------जहाँआरा

गायिका--------लता मंगेशकर

सांगित---------मदन मोहन

गितकार-------राजेंद्र किशन

आणि गाणे---‘-हालेदिल यूँ उन्हे सूनाया गया,

आँख ही को जुबां बनाया गया। ‘

त्यांनी पुढे लिहलं होतं की,बहुदा सुमन कल्याणपुरचं गाण आधीच होतं.ते त्यांनी इतक़ उत्तम गायिलं की तसंच एक गाण आपण गावं,असं लतादीदीना वाटलं असावं.त्यांनी जहाआरा मध्ये जे गाण गायिलं,ते त्यांनी सुमनताईसारखं गायील्या सारखं वाटतं. मी तो मेसेज वाचल्या नंतर यू ट्यूब वर ती दोन्ही गाणी मन लाऊन ऐकली. अन खरंच त्यांच्या रचनेत आणि गायकीत खुप साम्य आहे असं मलाही वाटलं.

1963 मध्ये आलेला सिनेमा, ‘ मेरी सुरत तेरी आंखे ‘,ह्या सिनेमातलं एक गाण ‘नाचे मन मोरा मगन तिकदा धिगी-धिगी ‘ हे अतिशय लोकप्रिय झालं.सिनेमात हे गाण अशोककुमार गातात अन आशा पारेखांनी त्यावर नृत्य केलं आहे. (हे माझ्या आयुष्यातलं सर्वात उत्तम नृत्य होतं, असं आशा पारेखांनी एका ठिकाणी म्हटलं आहे.) ते गाण स्वर-सुरांचे बादशहा महमद रफी साहेबांनी गायिलं आहे अन प्रसिद्ध संगीतकार एस.डी.बर्मन,ह्यांनी त्याचं संगित दिलं आहे.ह्या गाण्याच्या संगीतात जो तबला वाजवला आहे,तो वाजवण्यासाठी भारताचे प्रसिद्ध तबला वादक पंडित सामताप्रसाद ह्यांना बर्मनदांनी बोलावलं होतं.ज्या दिवशी रेकॉर्डिंग होणार होतं,त्यादिवशी सामताप्रसाद बनारस की कलकत्त्यावरून सकाळी

मुंबईला पोहचणार होते। पण असं म्हणतात की त्यादिवशी ती गाडी फार लेट झाली होती. ते उशिरा पोहचणार होते.इकडे रेकॉर्डिंगची सर्व तयारी झालेली होती.रफिसाहेब,बर्मनदा ह्यांचा आर्केस्ट्रा सगळं तयार होतं.पण जेंव्हा बर्मनदांना कळलं की गाडी खूप लेट येणार आहे,तेंव्हा त्यांनी काही ही पर्यायी व्यवस्था न करता,ह्या गाण्याचं,त्या दिवशीचं रेकॉर्डिंग रद्द केलं.त्यांना ठामपणे ह्या गाण्याच्या तबल्यासाठी पंडित सामता प्रसादच हवे होते.पुढे खरंच सामता प्रसाद ह्यांनीच तो तबला वाजवला.कान देऊन तो तबला ऐकला नसेल त्यांनी पुन्हा तो ऐकावा.परत परत ऐकला तरी कान तृप्त होणार नाहीत.

बर्मनदांना एकदा कोणीतरी विचारलं की, त्यांचं आवडतं पार्श्व-संगित त्यांच्या कोणत्या सिनेमाचं? बर्मनदा म्हणाले ‘ गाईड. ‘ ह्या गाईड सिनेमातल्या महमद रफी ह्यांनी गायिलेल्या एका गाण्याचाही मजेदार किस्सा आहे. असं म्हणतात की ह्या सिनेमातलं ‘ दिन ढल जाये,हाये रात न जाय ‘ ह्या गाण्याचं रेकॉर्डिंग जेंव्हा चाललं होतं, तेंव्हा दोन-तिन टेक नंतरच बर्मनदांनी हे गाण ओ.के. केलं.पण रफी हे गाण,परत,परत म्हणतच राहिले. (जवळ जवळ 27 वेळा त्यांनी ते रिपीट केल्याचा उल्लेख आहे. ) दादा ओ.के. करायचे आणि रफि परत म्हणायचे.शेवटी रफि मनासारखं झाल्यावर थांबले, तेंव्हा,दादांनी विचारलं ‘ हे काय चालू होतं?’ असं म्हणतात, रफि नम्रपणे म्हणाले ‘ दादा,ह्या गाण्यातलं ‘ऐसे मे किसको कौन

मनाय ‘ह्या मधला ‘कौन ‘,तुम्ही ज्याप्रमाणे म्हणाले त्याप्रमाणे माझा येतच नव्हता. पण शेवटी मी तो तसा आणूनच थांबलो. ‘ग्रेट’. असे महान लोक होते हे.

1960 ला एक चित्रपट आला होता.तो खूप गाजला.त्यातली गाणी तर खूपच गाजली.तो चित्रपट होता ‘ काला बाजार‘ विजयानंद ने हा दिग्दर्शित केला होता.देवानन्द हीरो अन बरोबर वाहिदा रहमान होती.ह्या ही चित्रपटाचं संगित बर्मनदांनीच दिलं होतं.ह्या चित्रपटातलं एक गाण खूप गाजलं.60 वर्षांनंतर अजूनही ते सर्वांच्या तोंडी आहे. ‘ खोया खोया चाँद,खुला आसमान,आखोमे सारी रात जायेगी; तुमको भी कैसे निंद आयेगी ‘.असं म्हणतात की स्क्रीनप्ले वाल्यांनी आणि बर्मनदांनी ह्या सिंनेमातली एक सिचुएशन सांगून शैलेन्द्र ह्यांना एक गाण लिहायला सांगितलं.रेकॉर्डिंगची डेट ठरली होती.पण शैलेन्द्रनी काही गाण लिहून दिलं नाही,त्यामुळे दादांना रीहर्सल ही घेता येईना. अगदी रेकॉर्डिंगच्या एक दिवस आधी बर्मनदा शैलेन्द्र कडे गेले. वैतागानच गेले. ‘उद्यापर्यंत तरी गाण लिहाणार की नाही ‘असं म्हणाले. शैलेन्द्र म्हणाले ‘ दादा कुछ सुझ ही नही रहा,तो क्या लिखू? ‘ दादा नाराज होऊन परत गेले.त्या दिवशी रात्री चौपाटी वर फिरत असतांना चांदणी रात्र होती.आकाशात चंद्र ऊगवला होता.शैलेन्द्रना फिरत असतांना अचानक, ‘खोया खोया चाँद ‘ह्या ओळि सुचल्या.मग काय, त्यांनी खिशातून आपली लहान डायरी अन पेन बाहेर

काढलं अन एका दमात ते गाण लिहून काढलं,अन दुसऱ्या दिवशी सकाळीच बर्मन दा कडे जाऊन ते गाण त्यांना दिलं. ते दादांना खूप आवडलं अन बर्मनदांनी त्याला तेंव्हाच झकास चाल लावली. पुढे महमद रफीनी हे गाण,इतकं सुरेख गायिलं की आजही ते सर्वांच्या ओठा वर आहे.

दिलिपकुमार-मीनाकुमारीचा 'आजाद 'हा जुना चित्रपट ही खूप गाजला होता. कथानक, अभिनय, संगित,गाणी.नृत्य सगळंच उत्कृष्ट असलेलं हे रसायन होतं.त्यातली सर्व गाणी गाजली.ह्या चित्रपटाचं संगित,सी.रामचंद्र ह्यांनी दिलं होतं. ह्या सिनेमात दिलीपाकुमार-मिनाकुमारी वर चित्रित केलेलं एक सुंदर गाण आहे—'कितना हसी है मौसम,कितना हसी सफर है;साथी है खुबसुरत,ये मौसमकोभी खबर है. 'हे गाण लता मंगेशकर आणि तलत महमूद ह्यांनी गायचं,असं ठरलं होतं.पण ज्या दिवशि रेकोर्डिंग होणार होतं,त्यादिवशी तलत महमूद् काही कारणास्तव येऊ शकले नाही.मग लतादीदी सोबत ते गाण,सी.रामचंद्र साहेबांनी स्वत: गायचं ठरविलं.त्यांनी ते अगदी तलत महमुद गातिलं असं गायिलं.बऱ्याच लोकांना तर हे माहितच नव्हतं की हे गाण तलतचं नाही आहे म्हणून. मला स्वत:ला,ज्या दिवशी हे कळलं,माझा विश्वास बसेना.मी घरी जाऊन ' आजाद 'ची कॅसेट लाऊन मन लाऊन ऐकली आणि आश्चर्य चकित झालो.

बैजू बावरा ह्या सिनेमातल्या, 'ओ दुनियके रखवाले,सून दरद भरे मेरे नाले.'ह्या गाण्याच्या रेकॉर्डिंग च्या तालमिच्या वेळी,नौशाद साहेबांनी

रफीना सांगितलं की अगदी शेवटी ‘ रखवाले,रखवाले –फार उंच स्वरात म्हणायचं आहे.तुम्ही कुठपर्यंत वर जाऊ शकता ह्याचा आधी अंदाज घेऊन तशी सुरवात करा. रफीनी नौशाद साहेबांना विचारलं, की, तुम्हाला कुठपर्यंत वर जायला हवं आहे ते सांगा. मग नौशाद ह्यांनी रफीना ते वाजऊन दाखविलं,अन खरचं रफीनी ते तसं गाऊन दाखविलं.अन मग रेकॉर्डिंग झालं.ह्या गाण्यातलं ते शेवटचं ‘रखवाले-रखवाले ‘ऐकल्या शिवाय त्याची कल्पना येणार नाही.

‘ देख कबिरा रोया ‘ ह्या गाणी अन संगितासाठी अत्यंत नावाजलेल्या चित्रपटात तर संगितकार मदन मोहन ह्यांनी तिन पूर्ण गाण्यांच एक गाण केलं आहे.एकाच सिचुएशन मध्ये एका पाठोपाठ ही तिन गाणी तिन हेरोईंनावर चित्रित करण्यात आली आहेत.अन ती,ह्या चित्रपटात,आपल्या मधूर आवाजात, दोन लतादीदी अन मधलं एक,आशाताईंनी गायिली आहेत.त्यापैकि पहिलं ‘ मेरी वीणा तुमबिन रोये ‘हे चित्रपटात अभिनेत्री अनिता गाते. (लतादीदी), दुसरं अनितागुहा गाते.ते आहे. ‘अशकोसे तेरी हमने,तसवीर बनायी है ‘(आशाताई), आणि तिसरं, पाठोपाठ शुभा खोटेंच्या तोंडी आहे.ते म्हणजे, ‘तू प्यार करे या ठुकराये,हम तो है तेरे दिवानोमे ‘,हे परत लतादीदींनी गायिलं आहे.अन अगदी शेवटी ‘मेरी विना तुम बिन रोये ‘ह्या ओळीच चित्रिकरण तिनही हेरोईन वर केलं

आहे. ही तिनही गाणी अत्यंत उच्च दर्ज्याची आहेत,अन,मदन मोहन साहेबांचं संगित तर विचारायलाच नको.

असे अनेक किस्से मराठी सिनेमांच्या गाण्याचेही आहेत.हिन्दी सिनेमाचे तर खूप. हयातले बहूअंशी किस्से आम्हाला देशपांडे साहेबांकडून माहित झाले आहेत.त्यांची आवड त्यांचा व्यासंग दांडगा ० ते पुण्यातच राहतात,अन गेल्या पाच वर्षांपासून मी पुण्यातच रहातो,पण गंमत पहा,आमची ओळख झाली ती,हजारो कोसांवर असलेल्या अमेरीकेत.असे असतात योगायोग.

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष

# डॉ. बं. न. जाजू यांचं हे दुसरं पुस्तक.

डॉ. बंकटलाल जाजू हे इंजिनियरिंगचे प्राध्यापक.१९६६ पासून ते विविध इंजिनियरिंग कॉलेजांत प्राध्यापक व प्राचार्य होते. त्या काळचे ते IIT Doctorate. पण त्यांचा स्वभाव निगर्वी, मिळून मिसळून रहाण्याचा आणि सर्वांकडून जे जे मिळेल ते ते शिकण्याचा. इंजिनियरिंग आणि संगीतच नव्हे तर व्यवहारज्ञानही. यातून त्यांना मनुष्य स्वभावाचे व त्यातील गुंतागुंतीच्या व्यवहारांचे जे दर्शन घडले ते त्यांनी आपल्या समर्थ लेखणीतून अक्षरी आणले आणि अनेक नियतकालिकांतून प्रसिद्ध केले. त्याचे हे अमूल्य पुस्तक ई साहित्यच्या वाचकांसाठी ते विनामूल्य देत आहेत.

डॉ. बंकटलाल जाजू यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१३), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (३६), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी

देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(३३), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(२०), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(५) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(७), श्याम कुलकर्णी(५), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(२), मंगेश चौधरी, डॉ. बं न जाजू(२) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'इ'यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।